संगीत

आर्यकविजय नाटक.

अथवा

मृच्छकटिक नाटकाची रंगावृत्ति.

हें

गद्यपद्यात्मक पंचांकी नाटक

दत्तात्रय रामचंद्र तिळवे

यानें लिहिलें

तें

शहापूर येथें

'धुंडिराज' छापखान्यांत छापून प्रसिद्ध केलें.

सन १८९३.

[illegible]

प्रस्तावना.

प्रस्तुतकालीं संगीताची अभिरुचि लोकांत विशेष वाढत चालल्यामुळें दिवसेंदिवस संगीत नाटकांचा भरणा बराच होत आहे. या दुर्माचे उत्पादक आमचे आद्य गुरु जे कै. गं. रा. **अण्णा किर्लोसकर** त्यांना या आमच्या महाराष्ट्रभाषामालिकेंत हा एक मनोहर कौस्तुभमणीच गुंफिल्याचें सुयश देणें केवळ वाजवी [illegible]. ह्या त्या अण्णांच्या संशर्नाय कृत्याचें अनुकरण पुढें बरेच लोक करूं लागले त्यांपैकीं मीही एक त्या उल्हासास प्रवृत्त झालों. त्याचें कारण असें कीं, कांहीं महिन्यांपूर्वी बेळगांव शहरीं "**लक्ष्मीप्रसाद**" नामक कोणी नाटक मंडळी आली होती. त्या मंडळीच्या विनंतीवरून प्रसिद्ध कवि **शूद्रक** यांच्या **मृच्छकटिक** प्रकरणावर कांहीं पद्यें म्यां महाराष्ट्र भाषेंत करून त्यांस दिलीं व प्रयोगांतीं तीं बेळगांव धारवाडच्या रंगभूमीवर लोकांना आवडलीं असें आढळून आल्यामुळें त्या मंडळीनें हें प्रकरण संपूर्ण करण्याचा आग्रह धरिला. प्रथमतः हें काम हातीं धरण्याची छातीच होईना. कारण अशींच पुस्तकें कित्येकांनीं रचलीं असून तीं लोकप्रियही झालीं आहेत, व या कामीं माझी म्हणण्यासारखी गतीही नसून त्यांतून हा माझा प्रयत्नही पहिलाच, अर्थात् तो कसा पार पडणार ही मला भीति उत्पन्न झाली. तरी सदरहू गुरूंच्या कृपेनें व "ईशवराचा लेश मिळे तरि मूढ यत्न शेवटिं जातो" या त्यांच्याच वाक्यन्यायानें केलेला प्रयत्न एकदां कसा तरी शेवटास गेला. आतां दिलगिरीची गोष्ट ही कीं, हा संपूर्ण प्रयोग करण्यास ती दुराग्रही मंडळी जगली नाहीं. म्हणून लेखी प्रत तशीच टाकून देणें भाग पडलें, पण ती तशी पडूं न देतां छापून तरी प्रसिद्ध करण्याविषयीं कित्येक सहृदस्थांनीं व मित्रमंडळींनीं सूचना केल्यावरून तसें केलें आहे, व हा प्रयत्न कोठवर साधला गेला हें पहाणें रसिक जनांवर सोंपवितों.

मृच्छकटिक हें प्रकरण मूळचेंच चांगलें असून लोकमान्यही आहे,

तेव्हां कोणत्याही रीतीनें त्याच्या मूळस्थितींत रूपांतर झालें तरी मूळच्या सौंदर्यावर तें शोभलें जाणार आहे. हें मूळचें दशांकी आहे. तथापि होतां होईल तितकी छाटाछाट करून पंचकी, सप्तांकी किंवा अष्टांकी न करतां लांबलचक तर होऊं नये व मूळ कथानकालाही अंतर येऊं नये अशा तजविजीनें हें पंचांकांतच आटोपून म्हणण्यास सुलभ पडण्याजोग्या पद्यांत नटविलें आहे व हें " जातीच्या सुंदरांना काहींही शोभतें " या उक्तीप्रमाणें मनोरम होईल अशी उमेद आहे. यांत कित्येक ठिकाणीं याच नांवाच्या दुसऱ्यांनीं केलेल्या पुस्तकांतील बोल आढळतील, परंतु या प्रकरणाचे मूळ भाषांतरकार के. रा. रा. परशुरामपंत तात्या गोडबोले यांच्याच पुस्तकाचें बहुतेकांनीं अनुकरण केलें असल्यामुळें परस्परांच्या शब्दसादृश्याबद्दल नाइलाज आहे.

या पुस्तकास " आर्यकविजय " हें नांव ठेवण्याचें कारण पालक राजाचे कारकिर्दींत गोपाळ दारक आर्यक याची दैना झाली, परंतु मित्राच्या साहाय्यानें त्याची सुटका होऊन सिद्ध पुरुषाच्या भाकिताप्रमाणें त्याचा विजय झाला हें होय. आर्यकानें आपणावर चारुदत्तानें केलेल्या अप्रतिम उपकारांस स्मरून त्याला दुःखसागरांतून काढिलें, व तेणेंकरून आपलें खरें मित्रत्व व खरें औदार्य प्रगट केलें हा प्रकार प्रस्तुत प्रसंगांत त्याचा प्रवेश घालून दाखविला आहे. राजशालकाचें संभाषण शकारांत लिहून त्याचीं कित्येक पद्यें मूळचींच राखिलीं आहेत. चेटाचें शेवटल्या अंकांतील भाषण चुकून शुद्ध भाषेंत पडलें आहे तरी त्याबद्दल शुद्धिपत्र जोडलें आहे. तसेंच प्रूफ तपासण्याच्या कामीं निरपळीची यात्रा झाल्यामुळें भाषणांत व पद्यांत ऱ्हस्व दीर्घादिक अनेक चुका असतील, पण त्यांपैकीं ठळक तेवढ्या शुद्धिपत्रांत दिल्या आहेत.

प्रस्तुत विनंति एवढीच कीं यांत दोषस्थळें पुष्कळ असतील. परंतु ही माझी पहिलीच अल्पसेवा समजून रसिक सुज्ञ लोक नीरक्षीर न्यायानें हिचा प्रेमादर करीत म्हणजे झालें.

पुस्तक कर्ता.

नाटकांतील पात्रें.

सूत्रधार	नाट्याचार्य.
नटी.	त्याची स्त्री.
चारुदत्त	सावकार पुत्र.
विदूषक	त्याचा मित्र.
शकार	राजशालक
विट	त्याचा मित्र.
चेट (स्थावरक)	,, चाकर.
शर्विलक	एक चोर.
वीरक	शिपायांचा नाईक.
चंदनक	,, शर्विलकाचा मित्र.
संवाहक	चारुदत्ताचा अंग रगडणारा.
रोहसेन	,, मुलगा.
आर्यक	(गोपाल) राजा.
कुंभीलक	वसंतसेनेचा चाकर.
कर्णपूरक	,, पैलवान.
भिक्षु	संवाहक (जती)
वसंतसेना	नायकिणीची मुलगी
वृद्धा (म्हातारी)	वसंतसेनेची आई.
मदनिका	,, दासी.
चेटी	,, दासी.
धूता	चारुदत्ताची स्त्री.
रदनिका	,, दासी.

न्यायाधीश, कारकून, शिपाई, दास, दासी, चांडाळ वगैरे.

शुद्धिपत्र.

पान.	ओळ.	अशुद्ध	शुद्ध.
२	१८	उठाणं	उटाणं
३१	७	दुषित	दूषिति
५२	१९	अश्ववरी	अश्वसरी
७०	७	प्रावट्	प्रावृट्
७१	२१	टपकति	टपकत
,,	२२	निश्वसती	निश्वसतें
,,	,,	हांसति	हांसत
७२	२७	कां न	कां ग
७७	२०	ज्याचे	त्याचे
,,	[illegible]	कोणी जवळी नच	नच जवळी कोणी॰
११०	७	कसा तरी	कशाचा
१३१	१५	प्रिय कांतेला ॥	प्रियकांतेला ॥ १ ॥
,,	१६	स्नेहाला ॥ १ ॥	स्नेहाळा ॥
१४५	६	पावो	पावुं.

पा० १३८ **स्थावरक**—काय हें नवल. अपराधाबिगर या बिचाऱ्या चारुदत्ताला मारत्याती. मला जखडलया म्हुन उपाय न्हाई. पुन् लोकास्नी ऐकाया जाईल अस वरडून सांगाव. लोक व्ह वसंतसेना लागू व्हत् न्हाई म्हुन् राजशालकानं पुस्पकरंडक जीर्णोद्यानांत तिला बाहुपाश घालून् मारली. चारुदत्तान न्हाई मारली. (विचार करून) लोकास्नी न्हाई ऐकाया जात. आता करावं कसं. हं या मोडक्या खिडकी मदन उडी मारावी. मेलो तरी फिकीर न्हाई. पुन् चारुदत्त वाचुं दे. (तसें करतो) अर मी मेलों न्हाई. पन् पायांतली बिडी मातुर तुटलिया. आता त्ये चांडाळ त्येकाचं काय बोलत्याती त्ये ऐकूंया. लोकव्ह लांब व्हा, व्हा येका अंगाला. मशी जाऊं दे.

स्था०—मी स्थावरक चेट हाय चेट. माझ म्हंनन तर ऐकाल (लोकव्ह० इ० पूर्वोक्त.)

स्था०–आक्शी खरं होये. मी येचा बोभाट करीन म्हुनशान येनं माझ्या पायामदी बिडी ठोकून मास्नी तिमजल्यावर निकून ठेवलं व्हत.

पा० १३९ **स्था०**–अरे अनार्या, निर्दया, त्या वसंतसेनेचे परान घेऊनशी तू संतुष न होऊन सज्जन कल्पवृक्ष चारुदत्ताला मारवितु-यास ? तुला फुडल कायबी भय न्हाई अं ?

पा० १४० **स्था०**–(कडे घेऊन) बघाव्हं समद लोक. सोन्याची आशा दाऊन लबाड बोलयो सांगतो यो.

स्था०–थू: या चाकरीला. त्येचं खरं म्हंगनबी लुन औं. अहुद्या, देवाफुड कुनाचा विलाज हे. (गर्दिवरून चारुदत्ताच्या पायांवर डोकं ठेवून) आर्या चारुदत्ता. माझा यतुन काय तो हाच.

१६ पानांतील प्रदोष समयीं या पदा ऐवजीं खालील पद वाचावें.

प्रदोषतिमिरस्थितघनचपला । भाससि सुंदरि तसि
तूं मजला ॥ तथापि शिरिंचीं मधुर सुकुसुमें ।
निजगंधें सुचविति तुज सुरम ॥ नूपुरनाद मृदुल तो ।
सुगविल खासाचि चपल तुजला ॥ १ ॥

—— ००——

संगीत आर्यकविजय नाटक.

अथवा

मृच्छकटिक नाटकाची रंगावृत्ति

अंक १ ला.

नांदीः-

पद—राग भूप, ताल त्रिवट.

वंदुनिया श्री सांब पार्वती ॥ मग नमितो शुभदायक गणपति ॥ धृ० ॥ प्रसादें करी सुकवि जडां जी । स्तविली माता श्री सरस्वती ॥ १ ॥ गुरुचरणांबुज पूजुनि आर्ती । सन्मणि सत्कवि•या करि प्रणती ॥ २ ॥ कवनसुमांजलि अर्पण करितों । दत्तात्रय हा किंकर जडमती ॥ ३ ॥ उणें अधिक जें पडलें येथें । मान्य करुनि ध्या बुधहो विनती ॥ ४ ॥

पद—राग भूप कल्याण, ताल त्रिवट.

आत्मसमाधी त्या शंभूचा । रक्षक होवो सकल जनांचा ॥ धृ० ॥ रज्जु जसे का पर्यंकातें । भुजंगीं वेष्टित यज्जानू ते । प्राणनिरोधें तो शांतीतें । गेला सकलेंद्रियगण ज्याचा ॥ १ ॥ बाह्य उपाधी निरसुनि राहे । ब्रह्मतत्व तें चित्तीं पाहे । आत्म-रुपाविण कांहीं नोहे । ब्रह्मानंदीं निमग्न साचा ॥ १ ॥

पद—राग कल्याण, ताल त्रिवट.

श्यामांबुदसा वर्णचि नीळा । कंठ शिवाचा रक्षु

तुम्हांला ॥ धृ० ॥ गौरिभुजलता वेष्टण जेथें ।
सौदामिनिसम भूषवि ज्याला ॥ १ ॥

सूत्रधार–(मंगलाचरणानंतर पुढें येऊन) पुरे, पुरे, सभासदांच्या कौतुकाचा भंग करणारा इतका परिश्रम कशाला पाहिजे ? आता–

पद–राग आयानट, ताल त्रिवट.

हस्त जोडुनी सभासदांला । करीतसें मी विज्ञप्तीला
॥धृ०॥ संक्षेपानें शूद्रक कविचें । मृच्छकटिक हें
प्रकरण मूजेचें ॥ गानीं करुनी दावायाचें ।
योजिलें मनीं या लक्षाला ॥ १ ॥

(इकडे तिकडे फिरून) असो. फार वेळ गाण्याच्या परिश्रमामुळें माझीं गात्रं शुष्क झालीं आहेत. तर घरीं कांहीं फराळाचें असल्यास प्रियेला विचारून पहावें. (कांहींसें चालून व घरांत प्रवेश केल्यासें करून) काय हें आश्चर्य !

पद–नाहिं झाले० या चालीवर

काय पूर्वविहित छेत्र मला आज लाधतें ।
होत असें नवें कृत्य तरी सदनिं कोणतें ॥ १ ॥
कोणि युवति बसुनि इथें गंध हें उगाळितें ॥
कोणि गुंफि सुमनहार तशी उठणि वाटते ॥
कोणि भूमिदेशिं रम्यरंगवेलि काढिते ॥
नवल हेंचि वाटतें ॥ १ ॥

आज ही तयारी बघून तर बोवा माझी भूक जास्तच प्रदीप्त होते; पण हें आहे काय हें प्रियेला विचारावें. (पडद्याकडे पाहून) प्रिये अंमळ इकडे ये पाहूं.

नटी–(प्रवेश करून) प्राणनाथ, ही मी आलें.

पद- भजन तव भज० या चालीवर

कां प्रिया बाहियलें मजला ॥ आज्ञा आपुली
बोला ॥ धृ० ॥ वचना सादर दासि असे ही ॥
कवण हेतु वरिला ॥ १० ॥

सूत्रधार-प्रिये मी फार वेळ गात बसल्यामुळें माझीं गात्रें पहा कशीं सुकून गेलीं आहेत. तर घरांत कांहीं खावाला आहे का ?

नटी-हो; सर्व कांहीं आहे. आपला आवडता गूळभात, दहीं, मसाल्याचे तांबूळ, आमटी, वडे, खीर इत्यादि पदार्थ आहेत.

सूत्रधार-(आशेनें) खरंच कां प्रिये हे सर्व पदार्थ आमच्या घरीं आहेत ? कीं आपली थट्टा करितेस ?

नटी-(आपल्याशीं) थोडीशी [थट्टा] करण्यास हीच वेळ बरी. (उघड) हे सर्व पदार्थ फराळवाल्याच्या दुकानीं मिळतात.

सूत्रधार-(रागानें) हा दुष्टे ! मी खाण्याच्या आशेनें आलों असतां मातीच्या ढेकळाप्रमाणें तूं दूर झुगारावें हं ! तुझ्या आशेचाही असाच भंग होईल.

नटी-

पद-गाती हूं बजप्रति० या चालीवर

व्यर्थ कोप नका करूं मानसीं प्रिया ॥
विनवि तुम्हा क्षमा करा दासिलागिं या ॥ धृ ॥
केला हा विनोद परि सहज तुम्हांसी ॥
पदार्थ बहु असति सदनि आज खावया ॥ १ ॥

सूत्रधार-बरं तर; पण:-

पद-राग केदार ताल त्रिवट.

काय नवें हें तूं चालविलें । प्रिये सांग गे मजला
वहिलें ॥ धृ० ॥ गुंफी माळा युवती कोणी । गंध

उगाळी वाटी उटणीं ॥ पूजासाहित्य रंगित सुमनीं ।
भूमीभागा शोभित केलें ॥ १ ॥

नटी–प्राणनाथ, आज मी एक व्रत घेतलं आहे.

सूत्रधार–काय, व्रत घेतलं आहेस? कोणतं बरं तें?

नटी–अभिरूपपतिक. ह्मणजे त्याच्या योगानं विद्वान् पति मिळतो.

सूत्रधार–मग प्रिये परलोकचा, कीं या लोकचा?

नटी–प्राणनाथ, परलोकचा.

सूत्रधार–(रागानें) पहाहो सभासद, माझं भात खवून हो परलोकचा पति मिळवावयास पहाते!

नटी–प्राणनाथ, असं रागाऊं नका.

पद–जलभरन जात जमु० या चा०

परलोकीं पति आपणस्वामी। असवितहो जन्मोजन्मीं ॥ धृ० ॥
यास्तव मी हें व्रत आचरितें। भूवरि येणें धन्यचि हो मी ॥ १ ॥

सूत्रधार–बरं, असं हें व्रत तुला कोणीग सांगितलं!

नटी–आर्या, आपला प्रियमित्र चूर्णवृद्ध, त्यानं.

सूत्रधार–(रागानें) असं काय? अरे अधमा चूर्णवृद्धा!

पद–राग भूप, ताल तेवडा.

नववधूच्या केशपाशा। कापिजे त्या दैवें जैसा ॥ धृ० ॥
होउनीया कुपित राजा। कांपतांना कंठ तूझा ॥
पाहुनीया तुष्ट माझा। होइ आत्मा जाण खासा ॥ १ ॥

नटी–(हात जोडून) प्राणनाथ, असं रागाऊ नका. क्षमा करा. आपल्यात्र उद्देशानं हें पारलौकिकव्रत मी आरंभिलं आहे. (त्याच्या पायावर डोकें ठेवते.)

सूत्रधार–ऊठ ऊठ प्रिये. मलाग हें काय ठाऊक? बरं, आतां या व्रतास काय पाहिजे सांग पाहूं.

नटी–प्राणनाग,

पद—कामदावृत्ताच्या चालीवर.

सर्व सिद्धता जाहली असे । परी पंक्तिला विप्र तो नसे ॥
ह्मणुनि योग्यशा एक ब्राह्मणा । त्वरित गति अणा आज भोजना ॥ १ ॥

सूत्र०ः—बरं तर! तूं जा आपल्या कामास. मीही आपल्याकडे येण्याजोगा एक ब्राह्मण बोलावून आणितों.

नटी—बरं. (जाते)

सूत्र०—(इकडे तिकडे फिरून विचार करून) कसं करावं; हें उज्जनी शहर तर ब्राह्मणांनीं भरलं आहे, पण यांत आपल्या जोगता ब्राह्मण कोण पहावा? (पुढें पाहून) बरं झालं. हा चारुदत्ताचा मित्र मैत्रेय इकडेसच येतो आहे, त्याला विचारून पहावं. अरे मैत्रेया, आज तूं आमच्या इथं भोजनास येशील कां?

मैत्रेय—(पडद्यांत) बाबारे, तूं दुसऱ्या कोणाला बोलाव. मी सध्यां कामांत आहे. मला यायला बनायचं नाहीं.

सूत्र०—अरे, नाहीं कां ह्मणतोस? आजचं भोजन उत्तम प्रकारचं चमचमीत आहे व चांगली दक्षणाही मिळेल.

मैत्रेय—कायरे, मी तुला पहिल्यानंच नाहीं ह्मणून सांगितलंना, मग मलाच इतका आग्रह तो कां?

सू०—यानं तर मला धुडकावून लावलं. असो, दुसरा ब्राह्मण तरी पाहूं, चला. (निघून जातो.)

(ही प्रस्तावना झाली)

(इतक्यांत हातांत शेला घेऊन मैत्रेय येतो.)

मैत्रेय—("बाबारे, तूं दुसऱ्या कोणाला तरी बोलाव" इत्यादि पूर्वोक्त बोलून) मैत्रेयानं दुसऱ्यांचीं आमंत्रणं खावीं काय? हाय हाय!

कटाव.

काय दशा आली । दुर्दैवें किमत केली ॥ धृ ॥
दैवाची गति विलक्षण अति, सत्य वचन हें सकळ

भोगली, चारुदत्त तो प्रियसख माझा, तज्जीवावर मारुनि मौजा, आजवरी मी चडूस असें, विविध तऱ्हेच्यां तशीं पक्वान्नें, बुंदी मोतीचूर जिलेबी भात केसरी बेसन घीवर, खाउन मोदक मसाले-दार. बसत असें मी देतचि ढेंकर, येतां विट तो पक्वान्नांवर, बोटें लोटी दूरच्या दूर अशा रितिनें बहू बेफिकिर, सांप्रत परि तो झाला निर्धन, ह्मणुनि कुठेंतरि उदरंभरण, करुनी वसती पुरता जाउन, त्याच्या सदनीं करतों शयन, अशी दुस्थिती झाली। दुर्दैवें वेळ साधली ॥ १ ॥

असो; चारुदत्ता या प्रियमित्र चूर्णवृद्ध यानं जाईच्या फुलांनीं सुवासित केलेला हा शेला चारुदत्ताची स्नानसंध्या आटोपली ह्मणजे त्याला द्यावयास सांगितलं आहे, तेव्हां हा नेऊन त्याला द्यावा. (इकडे तिकडे फिरून पाहून) अरे, हा माझा मित्र स्नानसंध्यादि कर्म आटोपून गृह देवतांना बली देण्याकरितां इकडेसच येत आहे.

(इतक्यांत वर्णन केल्याप्रमाणें चारुदत्त येतो)

चारुदत्त-(आकाशाकडे पाहून दुःखाचा सुस्कारा टाकून.)

पद्--राग सारंग ताल त्रिवट.

मत्सदनांगणिं पुष्पबली ते । सारस हंसहि भक्षित होते ॥ धृ० ॥ होती पूर्वी जेथ देहली । तेथें झाडें तृणें उगवलीं ॥ सांप्रत ते स्थलिं ठेवितां बली । कीटक मुंग्या भक्षिति त्यातें ॥ १ ॥

(इकडेच खालीं बसतो.)

विदू०-हा आर्य चारुदत्त ! त्याच्याजवळ जावं. (जवळ जाऊन.) मित्रा तुला स्वस्ति असो ! तुझी अभिवृद्धि होवो !

चारु–हा सर्वकालमित्र मैत्रेय आला! (त्यास) सख्या मैत्रेया, आलास! ये बैस खालीं.

विदू०–मित्रा, बरं. (खालीं बसून) मित्रा, तुझ्या चूर्णवृद्ध प्रियमित्रानं जाईच्या फुलांनीं सुवासित केलेला हा शेला तुला देण्याकरितां मजबरोबर पाठविला आहे. तर हा घे आपला. (शेला देतो. चारुदत्त शेला घेऊन सचिंत बसतो.) मित्रा, तूं कशाचं चिंतन करितोस?

चारु०–मित्रा! काय सांगूं!

पद–स्फटिकाचे हे पद पथ० या चालीवर.

भोगुनि दुःखें सुख जें मिळतें । तोषवि तिमिरीं
दीपासम तें ॥ धृ० ॥ कुदशा येतां सौख्या पुढ-
तीं । जिवंत असुनी त्या मनजा ती । मृततन जगीं
श्वासाचि करितें ॥ १ ॥

विदू०–मित्रा, मरण आणि दारिद्र्य यांतून तुला कोणतं रुचतं?

चारु०–

पद–बघुनि वाटतें मन्मनीं० या चा०

मरण रुचते मन्मनीं । प्रिय मित्रारे ॥
दारिद्र्य मरण यामधुनी ॥ धृ० ॥
दारिद्र्यीं या यातना बहू पेटू घेति अंतःकरणीं ॥
परी तुला मी सत्य सांगतों, स्वल्प वसतिरे या मरणीं ॥ १ ॥

विदू०–मित्रा, या गोष्टीचा खेद मानून उगाच आपल्या जिवास संताप करून घेऊं नको. तुझं द्रव्य चोरांनी नेलं नाहीं कीं राजानं लुटलं नाहीं. आपल्या इष्टमित्रांस देतां देतां क्षीण झालं, तर देवांनीं अमृतकळा पीतां पीतां अवशिष्ट राहिलेल्या प्रतिपदेच्या चंद्राप्रमाणं तुझ्या वैभवाचा क्षय अधिकच शोभा देतो.

चारु०–मित्रा, धनक्षय झाल्याचं दुःख मला नाहीं. पण–

दिंडी.

सदन माझें मज तापदायि झालें ।
निर्धना मज अतिथिनीं वर्ज्य केलें ॥
सकुनि ज्याचा मद कालवशें गेला ।
भृंग त्यजिती त्या हस्तिच्या कटाला ॥ १ ॥

विदू०–मित्रा, जशीं गवळ्याचीं पोरें त्यांस जिकडे खात नाहींत, चावत नाहींत तिकडे जातात, तशीं हीं धनं त्यांस जिकडे कुणी खात नाहींत व खर्चीत नाहींत तिकडेसच जातात.

चारु०–मित्रा, खरं विचारशील तर–

पद–राग विलावल ताल त्रिवट. प्रतिकूल होइल० या चा०

विभव नाश जरि तो झाला दुःख नसे मातें ॥
दैवबळें मिळतें अथवा जाइ तें लयातें ॥ धृ०
नष्टवित्त झालों बघुनी सर्व दूर झाले ॥
मित्रपणा टाकुनि त्यांही मला वर्जियलें ॥
बहुत ताप याचा होई अंतरात्म पोळे ॥
काय करूं कांहिं सुचेना भ्रांत चित्त होतें ॥ १ ॥

आणखी असं आहे–

पद–उद्धवा शांतवन कर जा० या चालीवर.

दारिद्र्यें लज्जा येई । तेज लया लज्जा नेई ॥ धृ० ॥
निस्तेज पुरुष तो होता । अपमान पदोपदिं होई ॥
जीवित नलगेसें होई । शोकातें उठवी हृदयीं ॥
॥ चाल ॥ शोकें मति जाय लयासी । मतीनें
सोडिलें ज्यासी । नाश तो येतसे त्यासी ।
निर्धनता मूळ इतुक्याही ॥ १ ॥

विदू०–मित्रा, वारंवार याच गोष्टीचं स्मरण करून संताप करून घेऊं नको. पुरे कर.

चारु०–मित्रा,

पद–ताल दादरा. काय मला भूल० या चालीवर.

निर्धनता चिंतेचें गेह हें असें । अपमाना वैराला स्थान होतसें ॥ धृ० ॥ मित्रजनीं निंदेला बीज ही सदां । स्वजनजन दूषातें हीच पुष्टिदा । हृदयींचा शोकवन्हि होय तापदा । जाया दे बुद्धि वना प्रिया छळितसे ॥ १ ॥

असो, दैव आपलें. मित्रा, मी गृहदेवतांस बली दिला. आतां हा मातृदेवतांचा बली तूं चवाठ्यावर नेऊन ठेव.

विदू०–मी नाहीं बोवा जात. अरे, आराधना केली तरी देवता प्रसन्न होत नाहींत, मग त्यांना बली देऊन तरी काय करायचें?

चारु०–मित्रा, असें ह्मणूं नको. अरे, हा गृहस्थांचा नित्य विधि, तो तर केलाच पाहिजे. यानेंच गृहस्थांवर देवता प्रसन्न होतात. यासाठीं जा आणि हा बली देऊन ये.

विदू०–मी नाहीं बोवा जाणार, दुसरा कुणी पाठीव. कारण मी गरीब ब्राह्मण. मला सध्यां काल अनुकूल नाहीं. मी करावयास जातों एक तें आरशांतल्या प्रतिबिंबासारखें उजव्याचें डावें आणि डाव्याचें उजवें असें सारें उलट होतें. त्यांतून ही संध्याकाळची वेळ! रस्त्यांतून वेश्या, विट, चेट इत्यादि प्रजाच्या प्रीतींतलीं माणसें फिरत आहेत न जाणो, बेडूक खावयास टपून बसलेल्या कालसर्पाच्या तोंडांत उंदीर येऊन अचूक पडावा तशी माझी गत झाली तर मी फुकट मारला मात्र जाईन. मग तूं इथें बसून एकटा काय करशील?

चारु०–(दुःखानें) धिःकार असो माझ्या जीवितास! मित्रा,

पद–वसंतीं बघुनि० या चालीवर.

निर्धन ऐशा पुरुषातें । बांधवजनही कांब नच येती ह्याया साह्यातें ॥ धृ० ॥ त्याचे प्रियसख जे होते ।

कुदशा त्याची यापरि बघुनी सोडिति ते त्यातें ।
येणें सत्व लया जातें । शीलविधूची कांती लोपे
तत्सम गति होते । अन्यें केल्या पापातें । लोक
लाविती तयाकडे तें, विपरीतचि घडतें ॥ १ ॥

म्हणून

पद-राग विहाग, ताल त्रिवट.

निर्धनताही मजला वाटे । खासाचि साव्हें पातक
मोठें ॥ धृ० ॥ निर्धन संगत कोणि न करिती ।
धनि गृहिं जातां कोणि न पुसती । मान तयाला
न मिळे कोठें ॥ १ ॥

आणि हें पहा तूं माझ्या शरीरामध्यें खरोखर सौख्य मानून रहा-
तोस; परंतु मी दैववशात मेलों तर तुझी अवस्था काय होईल
याचीच मला खंत वाटते.

विट०-(वाईट वाटून) मित्रा, जर मी जावेंच असें तुझी इच्छा
असेल तर जातों; पण मजबरोबर रदनिकेस दे.

चारु०-(हाक मारून) रदनिके, अग रदनिके. (रदनिका येते
तिला) या मैत्रेया बरोबर जा. मित्रा, मीही आपला थोडा जप
राहिला आहे तो करतों (चारुदत्त जातो.)

विदू०-अग रदनिके, हा बळी मी घेतों आणि दिवा तूं घे चल.

(सर्व जातात.)

(इतक्यांत पडद्यांत " उभी रहा. वसंतसेने, उभी रहा. " असा
शब्द होतो. नंतर पुढें वसंतसेना आणि मागें विट, शकार व चेट येतात.)

विट-उभी रहा, वसंतसेने उभी रहा.

पद-राग हमीरकल्याण ताल त्रिवट.

कां तूं भीतीनें पळसी । कंपित होउनिया ऐसी ।
तुझिया मृदुला चरणांसी । नृत्य योग्य जे, पांवुळि

व्यर्थचि कां त्या शिणवीसी ॥ १ ॥ चकिता उ-
द्विग्ना दिससी । व्याधा पाहुनिया जैसी । धांवे
हरिणी तूं तैसी । आह्मांपासुनि थरथर कांपत
त्वरित गती जासी ॥ २ ॥

शकार-

श्लोक.

"कां धांवशि पडशि जाशि पळोनि कांगे।
हो शुभशन्न मरशील न तूं उभीगे ॥
कामाग्निनें हृदय हें जळतें प्रचंडे ।
अंगारराशी पतितें जशि मांश खंडें ॥ १ ॥"

चेट

लावणी-बालघाटी

मेनि पलून जाऊ नग । जरा न्हाम जरा न्हाम ॥
परतुन माग बग । अग परतुन माग बग ग ॥ धृ ॥
मोरिन जाई पलून । पुरुषा लागीं बगून ॥ ग ॥
कुड्यावानी धनी आमच धांवुन येती माग बग ॥ १ ॥

विट-वसंतसेने,

पद-राग वसंत ताल दादरा.

मम पुढती त्वरित चरण काय टाकिसी ।
काय जासी गरुडभयें सर्पिणी जशी ॥ धृ० ॥
टाकिन मी गति घेउनि मागें वायुसी ।
नच मागे तिळभरही धराया तुसी ॥ १ ॥

शकार-मित्रा विटा पाहिलंसना?

श्लोक.

"ईतें नाणक चोर कामकशणी, मत्स्यादनी नर्तकी ॥

नाकाची चपटी सुवंश बुडणी, शर्वत्र दुर्वतकी ॥
शृंगारोज्वलपेटिका शुवशना, वेषश्रिया हीं दहा ॥
नांवें देत अशीं तरी बश मला, ही होत नाहीं पहा ॥१॥"

विट–वसंतसेने,

पद–कर्नाटकी, ताल दादरा.

म्यालिम कां भयें असी। स्तनित भयें सारसि जसी ॥ धृ० ॥
तंतुवाद्यि तर्जनिसम, काप धांसि गालासी ॥ १ ॥

शकार–

श्लोक.

"विश्वावशूची भगिनी शुभद्रा।
नेली जशी मारुतितें शमुद्रा ॥
तशा तुला मी धरितों पहागे।
जातीश कोठें फिर शीघ्र मागें ॥ १ ॥"

चेट–अग वसंतसेने,

लावणी.

असि कां पळसि बाया ग। नग शिनवूं आपल्या
पायां ॥ ऱ्हाम ऱ्हाम ऱ्हाम राजवल्लभा भज-
ग या। मीप मास मामकीं खाया। देइल तुज हा
राया ग। नागिनी मग कां पळसि बाया ॥ १ ॥

विट–वसंतसेने, उगाच अशी कां पळतेस ?

शकार–रानांत कोल्हाच्या मागें लागलेल्या कुतऱ्यांशारखे आह्मी तुझ्यामागें लागलों आहों. माझं हृदय चोरून तूं पळतेश होय ? थांब. थांब.

वसंत०–अग पल्लविके, अग परभृतिके.

शकार–(भयानें) मित्रा विटा, कोणी माणशं आलींरे माणशं आलीं.

विट–भिऊं नको. भिऊं नको.

वसंत०—अग माधविके, माधविके !

शकार—वशंतसेने, शान्या वशंतमाशाला, हाक मार. मी मीच नाहीं.

वीट—(हांसून) मूर्खा, ही आपल्या दासींला हाका मारिते.

शकार—काय ही बायकांश हाका मारिते ? अं: मग एक शोहून शंभर बायका आल्या तरी त्यास मी या शेल्यानं ठार करीन.

वसंत०—(जवळ कोणा नाहींसें पाहून) काय!

पद—राग जोगी, ताल धुमाळी.

नवळी नसे कुणि दासी। मजला साह्य कराग्यासी ॥
कसें करूं ॥ काय सर्व चुकुनी गेल्या। कांहीं
कळेना मजसीं। कसें करूं। चाल। मीच आपुलें
रक्षण भलें। असें जाहलें। काय ह्मणूं यासी ॥
नडली भ्रांति हृदयासी। कसें करूं.॥ १ ॥

शकार—

श्लोक.

तो भीम कीं तो जमदग्नि पुत्र।
कीं येउ कुंती शुतपंक्तिवक्र ॥
तुझा पहा मी बुचडा धरीतों।
दुःशासनाची करणी करीतों ॥ १ ॥

वसंत०—आर्या विटा, मी अबला स्त्री आहें.

वीट—ह्मणूनच जिवंत राहिलीस

शकार—ह्मणूनच मारली गेली नाहींश.

वसंत०—(आपल्याशीं) याचं दयेचं भाषण दिलींल मजला भय देतं. (उघड) श्रेष्ठ तुमच्या कृतावरून तुह्मीं माझे दागिने घेऊं पहातांस दिसतं.

वीट—छे छे ! वसंतसेने, बागेस शोभा देणाऱ्या लतेचीं पुष्पं का कोणी खुडतो ? तुझे अलंकार आह्मांस काय करावयाचे आहेत.

वसंत०—मग तुमचं ह्मणणं तरी काय?

शकार—मी शांगतों. मी देव पुरुष, भगवान, वाशुदेव, मनुश्य, आहे शमजलीश. माझा मनोरथ पूर्ण करावा अशं माझं तुला हात जोडून मागणं आहे.

वसंत०—(रागानें) शिव शिव! काय हें अनुचित भाषण. चल हो एकीकडे.

शकार—(टाळी वाजवून) मित्रा विटा, पाहिलंश ही नायकिणीचीं पोरगी मजवर श्रुप्रशन्न होऊन ह्मणते एकीकडे चल. तूं दमला आहेश, भागला आहेश. पण कायरे मीं ग्रामांतर किंवा देशांतराश्र गेलों होतों? अग ए नायकिणीचे पोरी, खरोखर ह्मणशील तर तुझ्या मागं हिंडतां फिरतां दमलों भागलों आहें, शमजलीश.

वीटः—(आपल्याशीं) वः ही काय बोलली आणि हा मूर्ख काय समजला! (उघड वसंतसेनेस)

पद—कालंगडा, दीपचंदी.

वसंतसेने जें हें वदसी। उचित नसेगे वेश्यपणासीं ॥ धृ० ॥ सधन तरुण हे यावे घरासी ॥ मनिं धर सुंदर गणिका असती ॥ तनुविक्रय तूं धनार्थ करिसी। सम मग पाहीं प्रियाप्रियासी ॥ १ ॥

आणखी,

पद—राग लीलांबरी धुमाळी, गंगानदी ती सागर० या चा०

एका कूपीं विप्र शूद्रही। मूर्ख चतुर नर न्हाती ॥
द्विजमूरति ज्या नावीं बसले। त्यांत अन्यही बसती ॥
वरिली मयुरें लता तिजवरी। वायस ही गे बसती।
गणिका, वापी, नाव, लतेपरी। भोग्या सर्वां असती ॥ १ ॥

वसंत०—

ठुमरी—त्रिवट.

गुण कारण प्रीतीला ॥ जगीं या ॥ धृ० ॥

बलजोरीनें कदापि परि ती । वश नोहे अबला ॥१॥

शकार–विटा, कामदेवाच्या उत्साहाश बागेंत यात्रा मिळाली होती, त्या दिवशापाशून ही गर्भदाशी त्या भिकाऱ्या चारुदत्तावर फिदा झाली आहे. मला वश होत नाहीं. पण शंभाळ हो. त्या चारुदत्ताचं घर जवळच डाव्या हाताश आहे. तेव्हां ही तुझ्या माझ्या हातांतून शुटून न जाईल अशं कर.

वीट–(मनांत) वाहवा! मनांत ठेवावयाची गोष्ट हा मूर्ख उघडी करितो. याला काय म्हणावें. वसंतसेना चारुदत्तावर फिदा झाली आहे म्हणतो! योग्यच आहे! रत्नापाशीं रत्न असावें अशी म्हणच आहे (उघड) काणेली पुत्रा, खरंच कायरे डाव्या हातास जवळच चारुदत्ताचं घर आहे?

शकार–यांत काय शंशय? हें जवळच डाव्या हाताश त्याचं घर.

वसंत०–(आपल्याशीं) वाहवा! फार चांगलं झालं. डाव्या हातास त्या सज्जनाचं घर आहे म्हणतो, हें खरं असेल तर हा दुर्जन मजवर अपकार करीत असताही उपकारच करितो असं समजेन. कारण यानें तें घर दाखवून माझी व माझ्या प्रियाची गांठ घातली असं होईल.

शकार–विटा, उडदांच्या ढिगांत काजळाच्या गोळी प्रमाणं ह्या काळ्याकुट्ट अंधकारांत ही वशंतशेना दिशतां दिशतां नाहींशी झाली. आतां कशं?

वीट–खरंच! किती तरी हा अंधार!

पद

दृष्टि शक्ति तमें नेली । अंधता ही नेत्रिं आली ।
अंजनातें मेघ वर्षे । तिमिर लिंपी तनुस भासे ॥
कुजन सेवे परी होई । दृष्टि निष्फळ खचित पाहीं ॥१॥

शकारः–आतां मी वसंतसेनेला शोधून काढतों.

वीटः–काणेली पुत्रा, पण तिची कांहीं खूण?

शकारः–खूण? तीरे कशली?

वीट:-तिच्या आंगावरील भूषणांचा शब्द किंवा आंगावरील फुलांचा सुगंध.

शकार:-नाकाश फुलांचा वास ऐकू येतो; परंतु अंधःकारांत भरले-ल्या माझ्या कानांश भूषणांचा शब्द स्पष्ट दिशत नाहींरे.

वीट:-(त्याला नकळत वसंतसेनेस)

पद-राग काफी झोंटी, ताल दीपचंदी.

प्रदोष समयीं कुणासी । वसंतसेने जरि ना दिससी ॥
जलधर संधित अदृश्य चपला । वास शिरींच्या ये पुष्पाला ।
नूपुर नाद तसा तो । सुचविल खासचि सुंदरि तुजसीं ॥

माझं भाषण ऐकलंसना, वसंतसेने?

वसंत०:-(आपल्याशीं) ऐकलं आणि समजलंही. (नूपुरें काढून हातांत घेते. फुलें टाकून देते आणि अंमळ हातांनीं चांचपून) हें काय? भिंत चांचपतां चांचपतां हातांस हे परसदार लागलं वाटतं. हो मी ओळखलं. तेंच हें घराचं परसदार. पण हें बंद आहे. (इतक्यांत दरवाजा उघडतो) वाहवा! माझ्या सुदैवानं दार उघडलं. आतां आंत जावं. अरे हा दिवा आला, हें काय? (रदनिका दिवा घेऊन येते. विदूषक जवळ आहे, ती नकळत दिवा मालवून जाते.)

विदू०:-रदनिके दिवा मालविलास ना?

रद०:-दरवाजा उघडल्यावरोबर वाऱ्याचा झोत आला नि दिवा मालवला. त्याला मी काय करूं?

विदू०-बरं असो; तूं दाराच्या बाहेर हो. इतक्यांत मी चौकांतून दिवा लावून घेऊन येतों. (जातो.)

शकार:-विटा थांब, मी वशंतशेनेला शोधून काढतों.

वीट:-बरं शोध शोध.

शकार:-(सोधल्यासारखं करून) विटा, धरलीरे धरली.

वीट:-हा मूर्खा, मी तो वीट.

शकार:-तूं का! तर हो एकीकडे. (पुन्हा शोधूनं) विटा, धरलीरे धरली.

चेट:—महाराज मी हा आपला चेट नव्ह का?

शाकार:—काय तूं चेट? इकडे वीट तिकडे चेट, तिकडे चेट इकडे वीट, हें आहे तरी काय? आतां तुम्हीं दोघेही एकीकडे व्हा कशे. मी तिला आतां धरतों पहा, (पुन्हा शोधून रदनिकेची वेणी धरितो.) विटा, आतां बरिक वसंतशेना खचित शांपडली.

श्लोक.

होती काळोखांत दडाली । माला गंधें खूण दाविली ॥
केशीं धरिली त्या पव्यानें । रुक्मिणी जैशी दशकंठ्यानें ॥

वीट:—मित्रा, सांपडली कायरे? भलं झालं. पळून जात होती नाहीं कां?

साकी.

भाळलीस तूं यौवनदर्पे, सार्थवाहरायाला ।
पुष्पेंमंडित कच तव धरिले, तुज हरण करायाला ॥ १ ॥

शाकार:—(वसंतसेना समजून तिला)

श्लोक.

आतां कोठें पळशील पोरी । धरिली वेणी बुचडा दोरी ॥
ओरड मार हाक्रा देवातें । शंभू शंकर ईश्वर यातें ॥ १ ॥

रदनि०—(भय पावून) तुम्हीं थोरमाणूस असून असं हें काय करितां?

वीट—काणेली पुत्रा, हा शब्द वसंतसेनेचा नव्हे. निराळा दिसतो.

शाकार—विटा, तुला शमजलं नाहीं. दहींभात खाऊन शोकळल्या मांजरीचा जशा श्वर बदलतो, तशा हिणं आपला श्वर बदलला आहे.

वीट—काय? हिनें आपला स्वर बदलला हें मोठंच आश्चर्य! अथवा आश्चर्य तरी कशाचें!

पद.

स्वराचि आपुला हिणें फिरविला । यांत नवल हें न
गमे मजला ॥ धृ० ॥ कला कुशलता शिकली पू-
र्णा ॥ सदां करी जी नृत्य गायना ॥ परवंचनींही
आहे निपुणा । अशक्य नोहे कांहीं तिजला ॥ १ ॥

विदू०–(हातीं दिवा घेऊन येतो) ओ हो हो !!! प्रदोष कालच्या मंद वायूनं दिवा पहा कसा थरथर कांपतो आहे ! वधस्तंभापाशीं नेलेल्या बोकडाचं काळीज असंच कांपतं (दिवा घेऊन पुढें जातो आणि रदनिकेला पुरुषांनीं वेढिलेली पाहून) रदनिके हेंग काय ?

शकार–(भयानें) विटा, कोणी मनुश्य आलारे मनुश्य.

विदू०–अग हें काय ? चारुदत्ताच्या दरिद्रतेमुळं परका पुरुष घरांत आणणं चांगलं नव्हे बर चांगल नव्हे.

रदनि०–अहो, मैत्रेय भटजी, ही माझी दुर्दशा पहा अगोदर.

विदू०–काय तुझी दुर्दशा का आमची ?

रदनि०–हो हो खरं तुमचीच.

वि०– तर काय हा तुजवर बलात्कार आहे ?

रदनि०–यांत काय संशय.

वि०– (रागानें काठी उगारून) काय करतोस हें ? होरे एकीकडे. कुत्रा देखलि आपल्या धन्याच्या घरांत परक्यास येऊं देत नाहीं. मग मी तर मनुष्य. त्यांत ब्राह्मण आहें. उगाच कसा राहीन ? हें लांकूड पहा कसं वांकड आहे. जसं आह्मांसारख्या दरिद्र्याचं दैव किंवा तुह्मांसारख्या दुर्जनाचं हृदय. तर या लांकडानं तुझं डोकंच फोडून टाकतों पहा.

वीट–हे महा ब्राह्मणा, क्षमा कर, क्षमा कर.

वि०– (विटास पाहून) ह्याचा अपराध दिसत नाहीं. (शकारास पाहून) त्याचाच अपराध दिसतो, रे राजशालका, संस्थानका, दुर्जना, श्रेष्ठ चारुदत्त द्रव्यहीन झाला, ह्मणून त्याला तुच्छ लेखून

त्याच्या परिजनांशीं दांडगाई करून त्याचा उपमर्द करितोस हें नीट नव्हे समजलास?

वीट–(वाईट वाटून) महा ब्राह्मणा क्षमा कर, दुसऱ्या एका स्त्रीच्या भ्रांतीनं ही चूक झाली. केवळ दांडगेपणानं किंवा चारुदत्ताचा उपमर्द करावा म्हणून झाली असं नाहीं. जिचा डोळा आह्मांकडे तिलाच आह्मीं शोधितों.

विदू०–ही तशी आहे काय?

वीट–छे छे असं नाहीं. दुसरी कोणी तरुण स्त्री होती ती कुणीकडे पळाली. तिच्या शंकेनं ही अशी अमर्यादा घडली. याबद्दल क्षमा करावी हीच तुला प्रार्थना आहे. (हातांतील खड्ग खालीं टाकून त्याच्या पायावर डोकी ठेवितो.)

विदु०–हे भल्या माणसा ऊठ ऊठ, हें न कळून मी तुला बोललों, याबद्दल मीच तुला हात जोडतों.

वीटः–छी छी असं नाहीं. आह्माला तुझीच प्रार्थना करणं योग्य आहे. मला वचन देशील तर मी उठेन.

विदू०ः–कोणतं वचन पाहिजे, सांग.

वीटः–हें वर्तमान चारुदत्तास सांगणार नाहीं हेंच वचन.

विदूः–नाहीं सांगणार, हें घे वचन, ऊठ आतां.

वीटः–(उठून)

साकी.

त्वत्प्रसाद हा नम्रपणें मी विप्रा मस्तकिं धरिला।
गुणशस्त्रें तूं निगर्व केलें आमुच्या या शस्त्रांला॥
उपकृति बहु केली। न फिटे जरि तनु झिजविली॥ १॥

शकारः–(ईर्षेनें) अरे विटा, कशाकरितारे या म्हाताऱ्या भटोरग्यापुढं मोठ्या विनयानं हात जोडून त्याचे पायां पडलाश तो?

वीटः–मी भ्यालों म्हणून.

शकारः–तूं कोणाला भितोश!

वीटः–त्या श्रेष्ठ चारुदत्ताच्या गुणाला.

शकारः-अं! आतां कशाचे त्याचे गुण. त्याचे घरीं कोणाला खावयाश ख्रुबा मिळत नाहीं.

चोटः-अरे असं म्हणूं नको. पहा,

पद-राग आरबी, धुमाळी. शृंगा ताडोनी यां चा०

धन हा स्वजनाला ॥ देतां ॥ क्षीण बहु झाला ॥ देतां ॥
धन समर्थी कोणा ॥ यानें ॥ त्रास न तो दिधला ॥ यानें ॥
विमल जलीं डोहो ॥ रानीं ॥ हेमंतीं भरला ॥ जो तो ॥
होय निदाघीं । शुष्कचि वारुनि । बहु जन तृष्णेला ॥
तैसा ॥ होउनि हा गेला ॥ पहा ॥ १ ॥

शकारः-(रागानें) हा कोणरे रांडलेक? कोणत्या बटकीच्या पोटचा? ज्याची एवढी प्रतिष्ठा शांगतोश?

श्लोक.

हा काय राधाशुत कर्ण वीर ॥
जटायु कीं भार्गव राम धीर ॥
कीं राम हा रावण इंद्रदत्त ।
किंवा सहस्त्रार्जुन कुंतिजात ॥ १ ॥

चेटि-मूर्खा, तो नांवाचा श्रेष्ठ चारुदत्त आहे बरं. त्याची बरोबरी कोण करणार?

पद-राग खमाज ताल धुमाळी, जयश्री रमणा० या चा०

कल्पद्रुम जो दीनजनांला, सहायकारी सुजनांचा ॥
स्वगुण फलांच्या भारें लवला दर्पण शिक्षित लोकांचा ॥ धृ०
निकषचि केवळ सुचरितांना, कोषचि सद्गुणरत्नांचा ॥
मर्यादेचा सागर तैसा, आदरकर्त्ता सकलांचा ॥ १ ॥
अवमानीता नोहे कोणा, हर्षदायि जो सुहृदांचा ॥
ऐसा सद्गुण मंडित नर तो धन्य धन्य भुवारि साचा ॥ १

बरं चला आपण येथून जाऊं.

शकार–काय ? वशंतशेनेला घेतल्यावांचून ?

वीट–ती तर तुला सोडून केव्हांच गेली.

शकार–कशी बर ?

वीट–

पद–राग काफी, ताल दादरा.

दृष्टि जशी अंधाला । त्यजुनी गेली तशी ती तुजला ॥ धृ०
रुग्णाला ती पुष्टी जैशी । त्यजिते मूढा बुद्धी तैशी ॥
विद्या मतिमंदाला । सोडी सिद्धी ती आळशाला ॥ १ ॥

शकार–मी तर वशंतशेनेश घेतल्यावांचून कधींहा येणार नाहीं.

वीट–मूर्खा, तुला कसं कळत नाहीं ?

दिंडी.

हस्ति होतो वश स्तंभबंधनानें ।
तसा वाजी वश मुखीं लगामानें ॥
हृदयिं रामा वश होय सद्गुणानें ॥
परी नोहे आग्रहें न सामानें ॥ १ ॥

हें साधन तर तुजजवळ नाहीं ह्मणून चल.

शकार–तुला जायाचं असेल तर तूं जा. मी नाहीं जा येत.

वीट–हा चाललों पहा. (जातो)

शकार–अरे माझा मित्र वीट खरंच गेला. (विदूषकाकडे पाहून) अहो दुष्ट बटुक हो, बशा बशा खालीं बशा.

वि०–आम्हांला बसविलंच आहे.

शकार–कोणी ?

वि०–दुर्दैवानं.

शकार–बरं तर उठा आतां.

वि०–उठूं, कांहीं वेळानं.

शकार–केव्हां ?

वि०–जेव्हां फिरून दैव अनुकूल होईल तेव्हां.

शकार–अरे तर मग रडा रडा.

वि०–रडविलंच आहे आम्हांला.

शकार–कोणी ?

वि०–दारिद्र्यानं.

शकार–बरं हंशा हंशा.

वि०–येव्हां नाहीं. हंसूं पुढं.

शकार–केव्हां तर ?

वि०–पुन्हां आमच्या चारुदत्ताला संपत्ती येईल तेव्हां.

शकार–अरे दुष्ट बटुका, माझा एक निरोप त्या तुझ्या भिकारड्या चारुदत्ताला शांग कीं, शोनं, रुपं, धन पुष्कळ आहे अशी ती कलावंतिणीची पोरगी वशंतशेना कामदेवाच्या उत्शबापाशून तुजवर फिदा झाली अशून आम्हीं बलात्कारानं तिला वश करांत अशतां आतांच ती तुझ्या घरांत शिरली आहे. ती मुकाट्यानं माझ्या श्वाधीन होईलशं करशील तर चावडीवर गेल्यावांचून माझा खटला तूं उलगडलाश अशं शमजून मी तुझ्यावर पूर्ण प्रीति टेवीन. आणि अशं न करशील तर मरण पर्यंत तुझं माझं वैर राहील. मी राजशालक शंस्थानक आहें. माझ्यापुढं चांगलं बोलत जा, हळू बोलत जा, आणि मी आपल्या रंगमहालाच्या गच्चीवर बसलों अशतां ऐकूं येईल अशं बोलत जा. अशं जर बोलणार नाहींश तर कवाडाच्या शंधींत शुपारी चुरल्याप्रमाणं तुझं डोकं फोडून टाकीन, शमजलाश ?

वि०–सांगेन बरं.

शकार–चेटा. माझा मित्र वीट खरंच गेला कायरे !

चेट–तर त्यो काय अजून बसला हाये.

शकार–तर मग चल आपणही लवकर जाऊं.

चेट–बरं तर मंग ही घ्या आपली तलवार.

शकार–नको, नको. ही तुझ्याच हातीं असूंदे.

चेट–ही तुमची तुझीच घ्या. मला नम.

शकार–आण इकडे (उलटी तरवार खांद्यावर टाकून) ही मी केली पहा. कुतरीं भोंकत असतां कोल्हाशारखा घरांत घुसतो. आतां मी कसा दिसतोंरे ?

चेट–आपण व्हय लय नामी दिसतां सरकार.

लावणी.

पीळदार पगडी शिरावर, घातली तंग ईजार ॥
तंग अंगरखा अंगि घातला, भरजरि सेला कंबरपर ॥
समसेर हातामंदि नंगि, छोरा दिसतो गुल्जार ॥
ऐटदार ही भर्ति बघुनी, सोभत आमच सर्दार ॥ १ ॥

वि०– गेले ? एकदांची पीडा टळली. बरं रदनिके, त्यांनीं हा तुझा अपमान केला तो आपल्या चारुदत्तास सांगूं नको, कांकीं तो अगोदरच दारिद्र्यानं पिडला आहे, त्यांत हें कळलं तर त्यांस दुप्पट दुःख होईल.

रदनिका–मैत्रेय भटजी, मी नांवाची रदनिका आहे बरं. माझं तोंड माझ्या स्वाधीन आहे. तुम्हींच मात्र संभाळा.

वि०–खरंच. तूं तशीच आहेस. चल आतां. (जातात)

(चारुदत्त आसनस्थ प्रवेश करितो.)

चारु०–(रदनिका समजून वसंतसेनेस) रदनिके, हा रोहसेन इथं वाऱ्यावर निजला आहे. पण संध्याकाळच्या थंड वाऱ्यानं अगदीं काकडला आहे, यासाठीं ह्याला माजघरांत नेऊन निजीव आणि हा शेला त्याच्या अंगावर घाल. (शेला तिच्याकडे फेंकतो.)

वसंत०–(त्याचा वास घेऊन आपल्याशीं) काय ?

पद–राग बागेसरी बहार ताल त्रिवट.

समजुनि मजला आपुली दासी । कार्यभाग हा क-
थिला मजसी ॥ धृ० ॥ जाती कुसुमें वासित शेला ।

येणें वाटे मध्दृदयाला ॥ उदास यौवन नच हा झाला । भोगेच्छा दिसे तरुणाचि यासी ॥ १ ॥

(आपण शेला पांघरते.)

चारु०–रदनिके, रोहसेनाला घरांत घेऊन जा म्हटलं तें ऐकलंस कीं नाहीं ?

वसंत०–(मनांत) आपल्या अंतर्गृहांत जावं इतकं माझं भाग्य कुठं आहे !

चारु०–रदनिके, ह्याचं उत्तर देखील देत नाहींसना !

पद–शशिकुल भूषण० या चालीवर.

हर हर! काळचि हा फिरला । याचा दोष न तुझाला ॥ धृ० ॥ कुदशा दैवें ज्या येई । त्याची दुर्धर स्थिति होई । स्नेही होउनि वैरीही । त्यजिती त्यातें लवलाही । अनुरक्ताचि ते विरक्त होउनि, उपहासिति त्याला । बोलुनि भलत्या वचनाला ॥ १ ॥

(इतक्यांत विदूषक व रदनिका येतात)

वि०–मित्रा, ही आपली रदनिका संभाळ कशी ?

चारु०–काय ? ही रदनिका आली ह्मणतोस ? मग पहिल्यानं आली ती कोण ? कोणी परस्त्री होती काय ? शिव शिव ! नकळून माझ्या पांघरलेल्या वस्त्राचा तिला विटाळ होऊन ती विदूषिता झाली.

वसंत०–(मनांत) छे छे, विभूषिता असं ह्मणा.

चारु०–तरी ही शरदाभ्राच्छादित चंद्रासम झाली. अथवा परस्त्रीचं दर्शन घेणं योग्य नव्हे.

वि०– मित्रा, परस्त्रीची शंका इथं नकोच. कामदेवाच्या उत्सवापासून तुजवर अनुरक्त झालेली ही वसंतसेना.

चारु०–काय ही वसंतसेना ? (मनांत)

दिंडी.

हिनें माझ्या कामास जागवीलें ॥
जगीं माझें वैभव क्षीण झालें ॥
क्रोध होतो कुपुरुषीं व्यर्थ जैसा ॥
जिरे माझ्या देहांत काम तैसा ॥ १ ॥

विदू०—हे मित्रा, राजशालकानं तुला कांहींएक निरोप सांगू सांग-तला आहे.

चारु०—कोणता बरं निरोप ?

विदू०—" धनकनकसंपन्न अशी जी कलावंतिणीची पोरगी वसंतसेना कामदेवाच्या उत्सवापासून तुजवर फिदा झाली आहे. आम्हीं बल-त्कारानं तिला वश करीत असतां ती तुझ्या घरांत शिरली आहे. ती जर मुकाट्यानं मजकडे पाठवुन माझ्या स्वाधीन होईलसं कर-शील तर चावडीवर गेल्यावांचून माझा खटला तूं उलगडला असं समजून मी तुजवर पूर्ण प्रीति ठेवीन. आणि असं जर न करशील तर मरणपर्यंत तुझं माझं वैर राहील. "

चारु०—(धिःकारानें) अँः तो काय मूर्ख आहे. त्याचं काय घेऊन बसला आहेस. (आपणाशीं)

पद—राग झिंझोटी, ताल त्रिवट.

योग्यता इची किती वदावी। सुरयुवतीसम स्तुती करावी ॥ ध्रृ० ॥ जा म्हटलें मी इजला गेहीं।
बघुनि दुर्दशा गेली नाहीं। पर पुरुषाशीं सदां वदे ही। मजशीं न वदली एक शब्दही ॥ १ ॥

(उघड) वसंतसेने, मी न जाणतां सेवक जनांस काम सांगावं तसं तुला सांगितलं. हा मजकडून मोठा अपराध घडला तर त्याची क्षमा कर.

वसंत०—छे छे, हूं काय ?

पद–हजारा मोरा कानका या चा०

काय असें करितां । तुह्मी हो ॥ धृ० ॥
आज्ञेविण मी येथें आलें ॥ अपराधि खरी तेणें ठरलें ॥
क्षमा करावी विनवि तुह्मांतें ॥ चरणिं ठेवुनि माथा ॥ १ ॥

विदू०–अहो, तुम्हीं दोघेजणही सुखासुखी एकमेकांस नम्र होऊन शेतांतील साळीच्या लोंबांप्रमाणं एकमेकांकडे डोकीं लववितां हें काय? तर मीही उंटाच्या होंपरांप्रमाणं आपलं मस्तक लववून तुम्हां दोघांस विनंती करितों.

चारु०–असो. पायां पडणं राहूंदे आतां.

वसंत०–(आपल्याशीं)

पद–बासरी बजावे० या चालीवर.

वाणि किती मधुर तरी । रीत तशी सभ्य दिसे ॥ धृ० ॥
आजि इथें अशास्तवें । रहाणें हें योग्य नसे ॥ १ ॥

(उघड) आर्या,

पद–राग लीलांबरी, ताल दादरा.

तुमचि जरी पूर्ण कृपा असे मजवरी ॥ मान्य करा
विनती जी तुह्मां मी करी ॥ धृ० ॥ अलंकार या
सदनीं । ठेवावे आस मनीं । यद्भोभें दुष्टांनीं ।
माझी ती पाठ कशी पुरविली पुरी ॥ १ ॥

चारु०–ठेव ठेवण्यास हें घर प्रस्तुत अयोग्य आहे.

वसंत०–हें आपलं ह्मणणं उगीच. मनुष्य पाहून कुणी ठेव ठेवतो. घर पाहून ठेवीत नाहीं.

चारु०–आग्रह असेल तर ठेवा. (मैत्रेयास) मैत्रेया, तेवढे अलंकार घे पाहूं.

वसंत०–(अलंकार देऊन) यावेळीं आपण मजवर कृपा केली असं मी समजतें.

विदू०—(अलंकार घेऊन) वसंतसेने, तुझें कल्याण असो.

चारु०—छि मूर्खा, तिनं हा धर्म केला नाहीं. ठेव ठेविली आहे.

विदू०—(एकीकडे वळून) मग चोर कां नेईनात.

चारु०—ही थोडक्याच दिवसांनीं परत होईल. तर हे दिवसास वर्धमानकानं व रात्रीं तूं संभाळावे. लोकांचे आहेत. ठेव आहे. समजलास?

वसंत०—आर्या, आज्ञा होईल तर आतां मी ह्या मैत्रेयास बरोबर घेऊन आपल्या घरीं जाईन ह्मणतें.

चारु०—बरं आहे. मैत्रेया, जा हिला घरीं पोंचवून ये.

विदू०—छे बोवा, मी नाहीं जात. ह्या कलहंसगामिनीच्या मागं तुह्मी चाललां ह्मणजे राजहंसासारखे शोभाल. मी आपला गरीब ब्राह्मण. चवाठ्यावर टाकलेल्या भाकरीला जशीं कुत्रीं लकटतात तसे जिथं तिथं वाटेंत गांवचे टवाळ लोक माझ्या पाठीस लागून मला फाडून खातील. ह्मणून ह्मणतों तुह्मींच जावं.

चारु०—असं काय ? मीच स्वतः जातों तर. राजमार्गात मनुष्यांना स्पष्ट ओळख पटण्याजोगी चांगली दिवटी पेटवावयास सांग.

विदू०—अरे वर्धमानका, मोठी चांगली दिवटी पेटीव.

वर्धमा०—घरांत तेलाचा थेंबही नाहीं. मग दिवटी कसली पेटवूं ? (आपल्याशीं) अहो गणिका जशा स्नेहशून्य होऊन निर्धन पुरुषांचा अपमान करितात तद्वत् आमची दिवटीही स्नेहशून्य झाली.

चारु०—मैत्रेया. आतां दिवटी बिवटी नको. हा पहा,

पद—राग कानडा, ताल त्रिवट.

स्त्रीकपोलशुचि चंद्र उगवला । राजपथीं हा दीपचि झाला ॥ धृ० ॥ संनिभ मंगल शुक्र बृहस्पति । ज्यांचीं किरणें तिमिरीं दिसतीं । पंकामाजी जैशा पडती । दुग्धाच्या त्या धारा विमला ॥ १ ॥

(सर्व जातात.)

प्रवेश २ रा.

———0:0———

(वसंतसेना बसली आहे व रदनिका जवळ उभी आहे.)

वसंत०–(आपल्याशीं)

पद–जिल्हा घुमाळी, असतांना यति संनिध या० चा०

त्या मन्मथमूर्तीप्रति माझें मन वाहिलें ॥ ध्रु० ॥
कधिं अर्पिन त्या हा काय ऐसें मज जाहलं ॥ चाल ॥
मज न कळे दिसपरि केव्हां येइल तो पूर्ण सुखाचा ॥
येउनि मानसिं तद्रूण स्वरूप, मज झोंप नये शयनीं ॥
पडुनी व्यर्थ तळमळें ॥ १ ॥

बरं मदनिके, मग पुढंग काय झालं?

मद०–हें काय बाई! पूर्वी कांहीं भाषण नसतां "मग पुढंग काय झालं" ह्मणून विचारतां हें काय?

वसंत०–मी काय ह्मटलंग?

मदनि०–"मग पुढंग काय झालं" ह्मणून.

वसंत०–असं काय? (विचारांत बसते. इतक्यांत चेटी प्रवेश करिते.)

चेटी–ताई साहेब, आंग धुवून लवकर देवाची पूजा करा, असं आपणांस आईसाहेबांनीं सांगितलं आहे.

वसंत०–अग, मी आज आंग धूत नाहीं, ब्राम्हणाकडून पूजा करीव असं आईस सांग.

चेटी–आज्ञा ताईसाहेब. (निघून जाते.)

मदनि०–बाईसाहेब, मी स्नेहानं विचारतें. खरंच आपण मघां बोललां त्याचा आशय काय?

वसंत०–तुला कसं वाटलं ग?

मदनि०–तुमचें चित्त कालपासून थान्यावर नसून तुह्मी कुणी तरी उत्तम पुरुष मनांत आणून त्याची इच्छा करीत आहां वाटतें ?

वसंत०–(हांसून) खरं ताडलंस. तूं मदनिका, दुसऱ्याचे मनातील आशय जाणणारी कुशल खरी.

मदनि०–हें ठीकच ! भगवान कामदेव तरुण जनांचा मूर्तिमंत आनंदच आहे. तर सांगा पाहूं तुमचं मन ज्यावर गेलं आहे, तो कोण राजा कीं राजवल्लभ ?

वसंत०–राजा नव्हे नि राजवल्लभही नव्हे. कारण,

पद–राग झिंजोटी, ताल त्रिवट.

राज्यपदारुढ सौख्यविलासी । नयरित कसली नच
भूपांसीं ॥ धृ० ॥ धनाधिकारें प्रमत्त असती ।
स्वच्छंदानें जनीं वर्तती ॥ दया प्रजेची नाहीं
चित्तीं ॥ काय ह्मणुनि त्या आणुं मानसीं ॥ १ ॥

मदनि०–राजा नाहीं नि राजवल्लभही नाहीं. तर विद्याविभूषित असा एखादा तरुण रूपसंपन्न ब्राह्मण तरी ?

वसंत०–छे: छे; अग,

पद–राग काफी, ताल दीपचंदी.

विप्र सखे भूवरचे । देवासम गे पूज्यचि साचे ॥ धृ० ॥
नरजन्मीं जीं पापें घडतीं । निरसन करिती त्यांचें ।
धनदानें तीं ध्यायापुरते । ह्मणुनी नच कामाचे ॥ १ ॥

मदनि०–तर काय ? देशांतर करून संपन्न झालेला एखादा व्यापारी?

वसंत०–छे:,

पद–राग पूर्वी, ताल त्रिवट.

वणिजपुत्र तो योग्य न मजला । सर्व गुणें जरि
आहे भरला ॥ धृ० ॥ प्रिया सुंदरी कांता तरुणी ।

टाकुनि सदनीं वियोगदहनीं ॥ विपुल धनाची
आशा धरुनी । जाइ सदा जो परदेशाला ॥ १ ॥

मदनि०–मग याशिवाय दुसरा बाई कोण? माझा तर्क तर चालत नाहीं.

वसंत०–अग मदनिके, कामदेवाच्या यात्रेला मी गेलें होतें तेव्हां तूंचना बरोबर होतीस?

मदनि०–हो मीच होतें; मग?

वसंत०–मग असं नवख्या सारखं काय विचारतेस? तुला नाहीं का आठवत?

पद–लावणीचे चालीवर.

जो नर चंद्रचि महिवरती । गाजे उज्जनीभर कीर्ती ।
गाती सकलहि कवि दिनराती,
सद्गुणगण ज्याचा । रूपें पुतळा मदनाचा ॥ १ ॥
नियती फिरली ती ज्याची । औदार्य सरी धनदाची ॥
शरणागतजनिं उपकृति करणें,
धर्म जया चित्तीं । नयरित सोडि न कल्पांतीं ॥ २ ॥
मित्रचि केवळ जगताला । ह्मणुनि मानिति जन ज्याला ॥
त्दृदयमंदिरीं वास करी जो,
मी त्या सुजनाला । प्रेमें कायचि वाहियला ॥ ३ ॥

मदनि०–हं! हं! समजलें. तोचना. ज्याला तह्मीं प्रार्थना केली आणि ज्यानं तुम्हांला वचन दिलं?

वसंत०–तो कोण, त्याचं नांव सांग पाहूं.

मदनि०–तो आदितवार पेठेंत मोतिचौकांत रहातो तो.

वसंत०–अग मी त्याचं नांव विचारलं. ठिकाण नाहीं विचारलं.

मदनि०–श्रेष्ठ चारुदत्त होय ना? तो साऱ्या नगरांत प्रख्यात आहे.

वसंत०–(हर्षानें) शाबास, मदनिके शाबास, बरोबर सांगितलंस तूं बाई मोठी चतुर खरी.

मदनि०–(मनांत) ह्या पुरुषावर कां हिनं मन ठेविलं ? (उघड) अहो पण तो दरिद्री आहे असं ऐकतें.

वसंत०–

पद–राग भूप, ताल दीपचंदी.

निर्धन ऐसा प्रियजन झाला । ह्मणुनी प्रेमा त्याव-
रि जडला ॥ धृ० ॥ मजसम गणिका असती भुव-
नीं । त्यांहीं सेवितां सधना बघुनी । दूषित जन हे
लोभी ह्मणुनी । सहन करें तें होइल मजला ॥१॥

मदनि०–पण बाईसाहेब,

पद–दासी ऐसें मानुनियां० या चालीवर.

आम्रतरू कुसुमसमय संपुनियां जाय दुरी ॥
मधुकरि तो सेवन तें पुनः तया काय करी ? ॥ धृ० ॥
तुमचा प्रियजनचि तसा झाला धनहीन तरी ॥
सांगा मग प्रीति कशी जडली ती तयावरी ॥ १ ॥

वसंत०–त्यामुळेच त्याचं नांव मधुकरी पडलं आहे.

मदनि०–तुह्मांला जर तो इतका आवडला आहे, तर लागलेंच. त्याकडे उठून कां जात नाहीं ?

वसंत०–अग कां जात नाहीं हें तुला सांगू ?

पद–राग पिलू झिल्हा, ताल धुमाळी.

अवचित जरि मी त्याच्या सदना धांवुनियां गेलें ॥ सखे गे ॥
सांप्रत परि त्या उपकृति करण्या नाहीं बळ उरलें ॥
यास्तव पुनरपि दर्शन दुर्लभ होइल मज दिसलें ॥
तैसें नच तें व्हावें ह्मणुनी मन हें बावरलें ॥ १ ॥

मदनि०—हां तरीच त्याच्या घरीं अलंकार नेऊन ठेविलेत ते!

वसंत०—मदनिके, हें तुझ्या लक्षांत बरंच आलं. तूं तर बाई मोठी धूर्त आहेस.

पडद्यांत “ अरे धरा धरा. हा इकडून पळून चालला आहे ”
इतक्यांत संवाहक द्यूतकार धावऱ्या धावऱ्या येतो.

संवाहक—अरेरे! काय माझी ही दुर्दशा झाली. माझा प्रिय मित्र दर्दुरक इथं आला नसता तर आपली कांहीं धडगत नव्हती. धि:कार असो ह्या द्यूतकर्माला. या फंदांत जर मी पडलों नसतों तर आज माझी ही अवस्था झाली नसती. द्यूतानं आजवर किती लोकांची धूळधाण केली आहे! नकोरे बुवा त्याचं नांव (पळतां पळतां) हे पहा आले. अरे या घराचा दरवाजा उघडा दिसतो तर इथंच शिरावं. (आंत शिरून) नायकिणी मी तुला शरण आहे.

वसंत०—शरणागतास अभय असो. चेटी अगोदर दरवाजा लाव जा. (संवाहकास) बरं तुला कोणापासून भय आहे?

संवाहक—सावकारापासून.

वसंत०—मग चिंता नाहीं. अग चेटी दरवाजा उघड तर.

संवाहक—(आपल्याशीं) सावकाराचं भय कसं असतं तें हिला माहित आहे हें एक चांगलंच. माझी स्थिति हिनं खचित जाणली.

मदनि०—(वसंतसेनेनें खुणावल्यावर) तुम्ही कोण, काय ही सविस्तर हकिकत ऐकण्याचं आमच्या ताईसाहेबांच्या मनांत आहे.

संवाहक—ऐका सर्व सांगतों. पाटलीपुत्र नगरांत मी जन्मलों. माझ्या बापाचं नांव गृहपति. मी संवाहकाची वृत्ति म्हणजे अंग रगडण्याचं काम करून पोट भरीत असतों. ही मी पहिल्यानं सहज म्हणून कला शिकलों. पण तीच आतां माझ्या उपजीविकेस साधन झाली. पुढं फिरत फिरत मी या उज्जनी नगरींत आलों. तिथं मला एक यजमान मिळाला. तो फारच अलौकिक गुणवान आहे. तसाच देखणा आणि गोड बोलणाराही. आपण केलेला उपकार कधींही उच्चारित नाहीं व दुसऱ्यानं केलेले उपकार कधींही विसरत नाहीं.

मदनि०–(वसंतसेनेस) बाईसाहेब, तुमचा जो मूर्तिमंत मनोरथ त्याचे गुण चोरून उज्जनी नगरीस शोभविणारा हा कोण पुरुष असेल बरं?

वसंत०–शाबास, मदनिके शाबास, तूं चांगला तर्क केलास. माझ्याही मनांत हाच तर्क आला. पुढं काय सांगतो तें ऐकूं.

मदनि०–पुढं काय झालं?

संवाहक–पुढं काय सांगूं? तो सत्पुरुष दुसऱ्यांवर दया करून धनाचा व्यय करितां करितां–

वसंत०–काय निर्धन झाला म्हणतां?

संवाहक–मी न सांगतां तुम्हांला हें कसं समजलं?

वसंत०–यांत समजावयाचं तें काय?

पद–कानडी चालीवर.

वैभव गुण न मिळोनी। वसति कधींही एक ठिकाणीं॥
नवल न किमपि वसे तें, अपेय तडागिं विपुलचि पाणी॥१॥

मदनि०–अहो त्या सत्पुरुषाचं नांव काय बरं?

संवाहक–अहो पृथ्वीवरचा मनुष्यरूपी केवळ चंद्रच अशा त्या सत्पुरुषाचं नांव जाणत नाहीं असा कोण आहे? तो रविवार पेठेंत माणिक चौकांत रहाणारा श्रेष्ठ चारुदत्त.

वसंत०–(हर्ष पावून बैठकीवरून खालीं उतरते) महाराज, हें आपलं घर आहे. अग मदनिके, यांना बसावयास गालीचा दे. आणि पंख्यानं वारा घाल. यांस श्रम फार झाले आहेत. (ती सांगितल्याप्रमाणें करिते.)

संवाहक–(मनांत) कायहो हें आश्चर्य! त्या श्रेष्ठ चारुदत्ताचं नांव सांगतांच एवढा माझा आदर झाला! शाबास, चारुदत्ता शाबास! पृथ्वीच्या पाठीवर जिवंत असा तूंच. बाकीचे श्वास मात्र सोडणारे! (पायां पडून) असो नायकिणी तूंही पण आसनावर बैस.

वसंत०--श्रेष्ठी तुमचा धनिक कुठं आहे? आतां त्यापाशी कोणतं धन?

संवाहक--आतां त्यापाशीं कुठचं धन! तो निर्धन झाला तेव्हांपासून मी द्यूतकर्मात शिरलों; पण त्यांतही माझं दैव फिरलं. दहा मोहोरा हरलों, त्या द्यावयास मजपाशीं नाहींत; म्हणून जुगार खेळणाऱ्या मंडळीनें माझे हालहाल केले, कांहीं उपाय चालेना. तेव्हां मी पळून इकडे आलों.

(पडद्यांत) अरे यानच आम्हांस ठकविलं, यानच आम्हांस बुडविलं.

संवाहक--हेच ते द्युतकार. माझ्या मागं लागून आले आहेत, त्यांचं भाषण ऐकलंच असेल. ह्यावर आपली मर्जी असेल तसं करावं.

वसंत०--पाहिलंस मदनिके, वृक्ष पत्रपुष्पफलरहित झाला म्हणजे त्यावर राहणारे पक्षी चोहींकडे उडून जातात. तशी ह्यांची अवस्था झाली. असो, त्या द्युतकारांकडे जाऊन संवाहकानंच तुम्हांस दिलं आहे म्हणून हें सुवर्ण कंकण त्यांस दे. (हातांतून कंकण काढून दासीच्या स्वाधीन करिते)

मद०--(कंकण घेऊन) आज्ञा बाईसाहेब, (बाहेर जाते व वसंतसेनेकडे परत येऊन) बाईसाहेब ते द्युतकार कंकण घेऊन संतुष्ट होऊन गेले.

वसंत०--(संवाहकास) आर्या, आतां आपण आपल्या मनुष्यांस भेटावयास जावं.

संवाह०--आर्ये, तूं मजवर एवढा उपकार केलास, त्याचा कांहीं प्रत्युपकार व्हावा म्हणून मजपाशीं जी कला आहे ही मी तुझ्या परिजनास शिकवितों.

वसंत०--आर्या, ज्याकरितां ही कला शिकायाची त्याची शुश्रूषा आपण केली आहे. आणखीं पुढंही करावी म्हणजे झालं.

संवा०--(मनांत)हिनं तर मला अगदींच झिडकारिलं. आतां प्रत्युपकार कसा करावा? (उघड) आर्ये, माझा तूं असा अपमान केला त्याअर्थी आतां मी जती होतों. तर संवाहक द्युतकार जती झाला एवढ्या गोष्टीचं स्मरण ठेव बरं.

वसंत०--आर्या, असं साहस करूं नये.

संवाह०— आर्ये, निश्चय केला तो केलाच. आतां फिरावयाचा नाहीं. हा जती झालों पहा. (इकडे तिकडे फिरतो इतक्यांत पडद्यांत गलबला होतो तो ऐकून) काय ह्मणतां स्तंभभंजक नामा वसंतसेनेचा क्रीडा गज मस्त होऊन सुटला आहे? तर कसा आहे तो पाहूं. अथवा तो पाहून तरी मला काय करावयाचं आहे. निश्चय केला आहे त्या प्रमाणं करावें झालं (निघून जातो, इतक्यांत कर्णपूरक प्रवेश करितो.)

कर्णपू०—कुठं कुठं आहेत, आर्या वसंतसेना.

मद०—अरे दांडग्या, इतका बावरलास कां? ही तुझ्या समोर आर्या वसंतसेना असतां तुला दिसत नाहीं?

कर्णपू०—(वसंतसेनेस पाहून) आर्ये, प्रणाम करितों.

वसंत०—कर्णपूरका तुझ्या मुखश्रीवरून. तूं संतोषांत आहेस असा दिसतोस.

कर्ण०—(विस्मय करून) बाईसाहेब, आपण चुकलां. आज कर्णपूरकाचा पराक्रम आपण पाहिला नाहीं.

वसंत०—कर्णपूरका, असा कोणता बरं पराक्रम केलास?

कर्णपू०—ऐका. आपला खेळावयाचा स्तंभभंजक नामा दुष्ट हस्ति सांखळदंड तोडून माहाताला मारून उन्मत्त होऊन राजमार्गांत आला तेव्हं सारे लोक भयानं घाबरे होऊन ओरडूं लागले. दुष्ट हस्तीनं पायांतले पैंजण, तोरड्या, गळ्यांतील रत्नांच्या माळा तोडून रानोमाळ टाकल्या. आणि सोंड, दांत, पाय यांनीं प्रफुल्लित कमलवनाप्रमाणं नगरीचा विध्वंस करून मार्गांत जाणारा एक जती गांठला. त्याचा दंडकमंडलू फोडून, तोडून तोंडातल्या थुंकीनं त्याला भिजवून दांतांनीं तो वर उचलला हें पाहून लोक ओरडूं लागले कीं "अरे जती मेलारे, जती मेला."

वसंत०—(घाबरून) काय प्रमाद हा!

कर्ण०—बाईसाहेब घाबरूं नका. तो मत्तगज एका दांतावर तुटका सांखळदंड आणि एका दांतावर तो जती घेऊन चालला आहे, असं पाहून मी कर्णपूरकानं—नाहीं नाहीं आर्येच्या अन्नानं पुष्ट झा-

लेल्या या दासानें सत्वर जाऊन लोहाराच्या दुकानांतून पहार घेऊन त्या दुष्ट गजास हांक मारिली.

वसंत०—मग पुढं ?

कर्ण०—मग विंध्य पर्वताच्या शिखरासारखा अति उच्च जो गज त्याला पहारेचा प्रहार करून त्याच्या दांताच्या संधींत सांपडलेला जती सोडविला.

वसंत०—शाबास कर्णपूरका ! चांगलं काम केलंस.

कर्ण०—ते समयीं " शाबास कर्णपूरका शाबास " असं ह्मणत सारी उज्जनी माझ्या भोंवती मिळाली. त्यामुळं जशीं नावेंत गच्च माणसें भरावीं, तशी माणसांची एकत्र गर्दी झाली. इतक्यांत असा चमत्कार झाला कीं, त्या दाटींत एक पुरुष होता, त्यानं कर्ण, कंठ मनगट इत्यादि भूषणस्थानं चांचपून पाहिलीं; पण तिथं कांहीं नाहींसं पाहून तो खिन्न झाल्यासारखा झाला. व त्यानं आकाशाकडे पाहून दीर्घ श्वास सोडला, आणि आपल्या आंगावरचा शेला काढून माझ्या आंगावर फेंकून दिला. तो हा शेला पहा.

वसंत०—कर्णपूरका, त्या शेल्याला जाईच्या फुलांचा वास येतो काय पहा ?

कर्ण०—आर्ये माझ्या नाकांत हत्तीच्या मदाचा गंध शिरल्यामुळं फुलांचा वास मला समजत नाहीं.

वसंत०—बरं त्यावर नांव तरी कोणाचं ?

कर्ण०—हो आहे, पण मला तें वाचतां येत नाहीं. आपणच वाचावं. (शेला वसंतसेनेच्या हातीं देतो.)

वसंत०—(नांव वाचून) व: यावर आर्य चारुदत्ताचं नांव आहे. (तो पांघरून) अहाहा!

पद—राग परज, ताल त्रिताल.

सज्जन शेला मज मानवला । ह्मणुनी प्रेमें हा पांघरला ॥ ध्रु० ॥ जाति सुमांचा सुगंध याला ।

प्रमुदित करितों भारि मनाला ॥ शोभवितो अति माझ्या तनुला । भारी मनला हा आवडला ॥१॥

मदनि०—कर्णपूरका, हा शेला आर्येच्या आंगावर चांगला शोभतो नव्हे ?

कर्णपू०—आँ—काय ह्मणतेस ! आर्येच्या आंगावर चांगला शोभतो ? शेला कुणाचा ?

वसंत०—कर्णपूरका, या शेल्याबद्दल मी तुला दुसरं बक्षीस देतें, हें घे. (त्याला सुवर्ण भूषण देते)

कर्णपू०—(तें भूषण मस्तकीं वंदून व तिला प्रणाम करून) आतां आर्येच्या आंगावर शेला चांगला शोभतो खरा.

वसंत०—कर्णपूरका, या समयीं तो पुरुष कुठ असेल बरं ?

कर्णपू०—यान वाटेनं तो घराकडे गेला.

वसंत०—

पद—मज हरिला भेटवा या चालीवर.

चल सखये जाउं या । मन्मथमूर्ती मन्मनरंजक । माडिवरुनि पाहुंया ॥ धृ० ॥ हृदयमंदिरीं नित्य वसे तो । औदार्याब्धी सज्जनवर तो । अधिर दर्शना निव हा होतो । पाहुनि होइल सौख्य या ॥ १ ॥

(जातात.)

प्रवेश २ रा.

(चारुदत्त बिछान्यावर बसला आहे व जवळ मैत्रेय आहे.)

चारु०—मित्रा, हा गणिकेचा ठेवा तुजपाशींच ठेव. तिचा तिच्या स्वाधीन करीपर्यंत आपण त्याला फार जपलं पाहिजे. (झोंपेची गुंगी आल्यासारखें करून)

पद—राग अडाणा, ताल त्रिवट.

गायन सुस्वर मधुर मनोहर । श्रवण जाहले गार
खरोखर ॥ ध्रु० ॥ साधली कला उत्तम त्याला ।
असाध्य आहे ती इतरांला । श्रवणीं प्रतिध्वनि
जरि दुमदुमतो । तृप्त न झालें माझें अंतर ॥ १ ॥

विदू०—मित्रा, झोंप आली काय ?

चारु०—हो, आली तर काय झालं ?

अंजनीगीत.

नयनीं निद्रा शिरे भरारां ।
येइ ललाटा वरुनि झरारा ।
अदृश्य रूपा राहे न जरा ।
शरीर सत्व हरी ॥ १ ॥

विदू०—तर आपणही निजावं. (दोघे निजतात.)

(इतक्यांत शर्विलक नामा चोर सायुध येतो.)

शर्वि०—हें घर चोरी करण्यास बरं दिसतं. आतां आंत शिरण्यास वाट पाहली पाहिजे. (आकाशाकडे पाहून हर्षानें) अरे व: ! चंद्र

तर अस्तास गेला, आणि अंधकार पसरला. हें फार चांगलं झालं. ही रात्र तर मला आईसारखी संभाळते. बागेच्या बाहेरच्या भिंतीस भोंक पाडून आंत तर आलोंच. आतां वाड्यांत शिरण्यास कुठंतरी भोंक पाडलं पाहिजे. कुठं बरं भोंक पाडावं? (विचार केल्यावर भिंत चांचपून) हें हीच पाणी सांडण्याची जागा असल्यामुळं ओली झालेली आहे. तेव्हां भोंक पाडण्यास पाहिजे तसंच स्थळ सांपडलं. वाहवा! काय माझं नशीब! आतां कार्यसिद्धि निश्चित आहे. स्कंद पुत्रांनीं प्रथम सिद्धिलक्षण हेंच सांगितलं आहे. हं हं, (विचार करितो) पक्या विटांच्या भिंतीवर पूर्णकुंभ भोंक शोभेल, तेव्हां तसं करावं. (आरंभीं गुरूस वंदन करितो) हे वरदा कुमार कार्तिकेया, तुला नमस्कार असो. हे सकल देवतांनो तुम्हांला नमस्कार असो. हे योगाचार्या, तुला नमस्कार. आमचे गुरुजी योगाचार्य यांनीं प्रसन्न होऊन मला ही योगरचनाविद्या दिली आहे. तिचे योगानं कुणीं पाहिलं झणण्याची कीं, शस्त्राची मुळींच भिती नाहीं. (भोंक पाडूं लागतो.) अरेरे! प्रमाणसूत्र विस्मृतीनं घरीं राहिलं किंवा वाटेनं कुठं पडलं कोण जाणे. आतां कसं करावं? (चिंतन करितो) असो. कांहीं चिंता नाहीं. हें यज्ञोपवीतच आपलं प्रमाणसूत्र. हें ब्राह्मणाला सर्व ठिकाणीं उपयोगीं पडतं. (यज्ञोपवीतानें जागा मोजून भोंक बरेंच तयार करून व त्याकडे पाहून) आतां एवढी एक वीट काढिली कीं, भोंक तयार झालं. (इतक्यांत साप डसल्यासारखें करून) अरेरे! मला साप डसला. (यज्ञोपवीतानें बोट बांधून व औषधोपचार करून) विष उतरलं. आतां मी स्वस्थ झालों. अरे, आंत दिवा जळत आहे. पहा ही दिव्याची जोत अंधकारांत कसोटीवरील सुवर्णरेषेप्रमाणं शोभत आहे. (सर्व विटा काढून) भोंक तयार झालं. आतां आंत शिरावं. (तसें करून) अरे, इथं दोघे पुरुष निजले आहेत. असो. प्रसंग पडल्यास झटकर बाहेर पडण्यासाठीं दार उघडून ठेवावें. (दार उघडूं लागतो) अहो, हें घर जुनं झाल्यामुळं कवाड करकर

वाजतं. यावर घालावयास पाणी शोधून आणिलं पाहिजे. (शोधतो) अहाहा! पाणी सांपडलं. (पाणी घेऊन दारावर शिंपडतो व दार उघडतो.) ह्या दोघांची झोंप खरी किंवा कपटाची आहे याची अगोदर परीक्षा केली पाहिजे. (परीक्षा करून) यांचा श्वासोच्छ्वास कसा शांत व दीर्घ चालला आहे. पांपण्या कशा निश्चळ, आणि हे तर अस्ताव्यस्त पडले आहेत. तेव्हां हें ढोंग नव्हे. अगदीं गाढ झोंप आहे. (इकडे तिकडे पाहून) काय इथं हा मृदंग, पखवाज, ढोलका, वीणा, सारंगी, पोंवा, पुस्तकं! हें काय नाटकाचार्याचं घर? मी तर मोठा वाडा पाहून आंत शिरलों. इथं लभ्यांशाच्या नांवानं नकारघंटा! बडा घर पोकळ वांसा! कीं, हा खराखुरा दरिद्री आहे किंवा राजभयानं किंवा चोरभयानं आपलं द्रव्य यानं भूमींत पुरून ठेविलं आहे? (पाय आपटून पहातो.) पुरलेल्या धनाचं चिन्ह झांकत नाहीं. हा जातीचा दरिद्री आहे खरा. असो जावं आतां.

विदु०–(झोंपेंत बरळतो) अरे मित्रा, भिंतीला भोंक पाडून घरांत चोर आलासा वाटतो. तर हे घे सोन्याचे दागिने आपल्या जवळ.

शर्वि०–काय? हा जागा आहे? मी आंत शिरलों पाहून आपण दरिद्री म्हणून माझी थट्टा करतो? काय याला निजल्या जागीं ठार करूं? अथवा याला मारून काय फळ? हा झोंपेंत बरळत आहे. (त्याकडे पाहून) अरे हें कांहीं फाटक्या पंचांत बांधलेलं दिव्याच्या प्रकाशानं झळकत आहे. हें कांहीं तरी सुवर्ण भूषण असावं. मी जाऊन तें घेऊं? छे नको. हा मजसारखाच आहे. याला कुशाला पीडा द्या. नियून जावं हें बरं (जाऊं लागतो)

विदु०–अरे मित्रा, हा सुवर्णालंकार न घेशील तर तुला गाई ब्राह्मणाची शपथ आहे. घे हे लवकर आपल्या हातीं.

शर्वि०–गाई ब्राह्मणांची शपथ कोणी मोडावी! (ती गांठोडी घ्यावयास पुढें जातो.) अरे पण दिवा जवळ आहे. दिवा मालविण्यास मजपाशीं अग्निकीटक आहे, याला सोडून देतों म्हणजे झालं.

(तसें करतो.) हाच याचा देश आणि काळ. वाहवा! दिवा तर मालवला. (विचार करून) अरेरे! प्रतिग्रह न करणाऱ्या चतुर्वेदी ब्राह्मणाचा मी पुत्र असून मदनिका गणिकेच्या प्राप्तीस्तव हें अनुचित कर्म करितोंना! धिःकार असो मला. बरं यावेळेस ब्राह्मणाची प्रार्थना ऐकिली पाहिजे. (भूषणाची गांठोडी घ्यावयास हात पुढें करितो.)

विदू०–मित्रा तुझ्या हाताचीं बोटें गार कां लागतात ?

शर्वि०–(चपापून) अरेरे! काय वेडेपणा हा! कवाडावर पाणी शिंपडल्यामुळं माझ्या हातांचीं बोटें गार झालीं आहेत. असो. (कांखेंत हात गरम करून ती गांठोडी घेतो.)

विदू०–घेतलीस का ?

शर्वि०–ब्राह्मणाची प्रार्थना न मोडावी, म्हणून घेतली बरं.

वि०–माल ओपून मी वाण्यासारखा निश्चित झालों. आतां स्वस्थ सुखानं झोंप घेईन.

शर्वि०–महा ब्राह्मणा, आतां शंभर वर्षे खुशाल निजून रहा. (आपल्याशीं) ही फार वाईट गोष्ट झाली. त्या गणिकेसाठीं ब्राह्मणास दुःखांत घातलं. अथवा मीच आपला आत्मा दुःखांत घातला म्हटलं तरी चालेल. धिःकार असो माझ्या या दारिद्र्याला! (विचार करून) आतां मदनिकेला विकत घेण्याकरितां वसंतसेनेच्या घरीं जावं. (अंमळ पुढं जाऊन पाहून) बाहेर कोणाची चाहूल झाली. कोणी गस्तवाला आला वाटतं. अथवा मला गस्तवाला तरी काय करणार? (इतक्यांत रदनिका येते. तिला मारावयास जातो, पुन्हा तिजकडे पाहून) काय ही स्त्री आहे. जाऊं द्या. हिला काय मारायचं! पुरुष असता तर ठार केला असता. (निघून जातो.)

रदनि०–(आंत जाऊन भयानें) अग बाई बाई बाई! हें काय? आमच्या घरांतून भिंतीला भोंक पाडून चोर बाहेर आलला. आतां मैत्रेय भटजींना उठवावं. (मोठ्यानं) अहो मैत्रेय भटजी, अहो मैत्रे

भटजी, उठा उठा लवकर. आपल्या घरांत चार शिरून भितीला भोंक पाडून पळून जात आहे. उठा, उठा.

वि०–(घाबऱ्या घाबऱ्या उठून) अग म्हणतेस काय? भोंक पाडून चोर पळून गेला?

रदनि०–अहो हें भोंक दिसत नाहीं काय?

वि०–अबब. केवढं तरी हें भोंक! जणुं दुसरं दारच. मित्रा अरे निजलास काय? ऊठ ऊठ लवकर, आपल्या घरांत चो-चो-चो-चोर शिरला होता, तो भिंतीला भों-भों-भों-भोंक पाडून पळून गेला.

चारु०–बरं बरं जाऊंदे गेला तर. काय थट्टा करितोस?

वि०–अरे थट्टा नव्हे. हें प्रत्यक्ष पहा.

चारु०–कोणत्या ठिकाणीं भोंक पाडलं आहे.

वि०–अरे हें आपल्या उशाकडे.

चारु०–(तिकडे पाहून उठून बसून) वाहवा! काय हा बौलदार भोंसका तरी! अशा कर्मांत ही अशी कुशलता हें मोठं आश्चर्य!

वि०–मित्रा, बाहेरगांवच्या अथवा नव्या चोराचं हें कृत्य असावं. नाहींतर आपल्या घरांत वैभव कितीसं आहे हें या साऱ्या उज्जनी नगरीस विदित आहेच.

चारु०–तूं म्हणतोस ही गोष्ट खरी, पहा.

पद–बागेसरी धिमातिताल.

परगांवच्या वा नवचोराचें। कृत्य असें हें गमतें साचें॥ धृ०॥
पाहुनि आमुच्या भव्य गृहाला। आशेनें तो असेल शिरला॥
निराश होउनि निघुनी गेला। कांहिं न मिळतां तया येथचें॥ १॥

आतां तो आपल्या मित्रमंडळीला काय सांगेल बरं? कीं, सावकार पुत्राच्या घरांत शिरलों; परंतु कांहीच लाभलं नाहीं, हंच ना?

वि०–अरे, या दुष्ट चोराकरितां देखील हळहळतोसना? हें बर मोठं,

तेव्हां यांत शिरून जडावांचे किंवा सोन्यामोत्यांचे दागिने चोरून न्यावे असें त्याला वाटलं असेल. (स्मरण होऊन मनांत खिन्न होतो.) अरे मजपाशीं दागिने होते ते कुठं आहेत? (पुन्हा स्मरण करून मोध्यानें) मित्रा जेव्हां तेव्हां तूं म्हणत असतोस कीं, मैत्रेय मूर्ख आहे, मैत्रेय अज्ञान आहे. पण या वेळेस मी किती शहाणपण केलं बरं? कीं, त्या दागिन्यांची गांठोडी मीं तुझ्या स्वाधीन केली. नाहींतर त्यां रांडलेकानं उपटून नेली असतीना?

चारु०—मित्रा, पुरे आतां थट्टा!

वि०—तूं मला मूर्ख ठरविलंस तेव्हां थट्टा केव्हां करावी, कुठं करावी हें ज्ञान मला कुठचं?

चारु०—मित्रा, खरंच का माझ्या स्वाधीन केलीस?

वि०—तर मी काय खोटं सांगतों कीं काय?

चारु०—कोणत्या वेळेसरे माझ्या स्वाधीन केलीस?

वि०—तुझ्या हाताचीं बोटं गार लागतात म्हटलं तेव्हां.

चारु०—असं काय? कदाचित् तसं असेलही. (चोहोंकडे पाहून दागिने कोठें नाहींत असें जाणून हर्षानें) मित्रा, तर मी तुला आनंदाची गोष्ट सांगतों. आपलं दैव चांगलं.

वि०—काय दागिने आहेत, नेले नाहींत म्हणतोस?

चा०—आहेत कसचे. ते तर नेलेच.

वि०—मग आनंदाची गोष्ट कोणती?

चा०—हीच कीं, तो चोर आमच्या घरांतून कृतार्थ होऊन गेला.

वि०—अरे पण ती दुसऱ्याची ठेव होती ना?

चारु०—हो हो खरंच. (उद्विग्न होतो)

वि०—मित्रा, अरे दुसऱ्याची ठेव चोरांनीं नेली, त्याला आपण काय करायचं? त्याचा आपणाकडे काय दोष आहे? मग तूं इतका घाबरतोस कां?

चारु०—(सावध होऊन) मित्रा.

पद–इन इष्ट हतु मी० या चालीवर.

जन कुतर्क नाना करतिल रे ॥ धृ० ॥
कृत्य खरें हें घडलें असुनी, सत्य कुणीना मानिलरे ॥ १ ॥
द्रव्यहीन मी झालों याचा, संशय सगळे घेतिलरे ॥ १ ॥
दुर्दैवानें ठेवहि हरिली, मी केलें हें म्हणतिलरे ॥ ३ ॥

वि०–अरे तूं भिऊं नको. मी तिला उलट सांगेन कीं, दिलं घेतलं त्याला साक्षी कोण?

चारु०–काय मी या समयीं खोटं बोलूं?

साकी.

मागुनि भिक्षा ठेवीन्चें ऋण, फेडिन कसेंहि तीचें ॥
कीर्तिविघातक असत्य परि तें कधीं न काढिन वाचें ।
त्यजितां नीतिपथा ॥ दुर्गति येई ती खचिता ॥ १ ॥

रदनि०–आतां हें वर्तमान धूताबाईनां जाऊन सांगावं. (जाते व पुनः परत येऊन विदूषकाजवळ जाऊन) मैत्रेय भटजी, तुम्हाला धूताबाई बोलावतात.

वि०–मला कां धूताबाई बोलावते? चल आलों. मित्रा आंत जाऊन येतो बरं (जातात.)

चारु०–बरं पण लवकर येहो.

वि०– (परत येऊन आश्चर्यानें) कायहो हा तिचा थोरपणा!

चा०–मैत्रेयाला इतका उशीर कां लागला? या दुःखानें ती ब्राह्मणी काय भलतंच करील कीं काय नकळे. (हांक मारतो.) मैत्रेया, अरे मैत्रेया.

वि०–(जवळ जाऊन) हा मी आलों. अरे मित्रा हें घे. (रत्नमाळा पुढं करितो.)

चा०-अरे हें काय?

वि०-हें होय? तूं आपल्या स्वभावास अनुरूप अशी भार्या मिळविलीस त्याचें फळ.

चा०-काय ब्राह्मणी मजवर दया करिते! हरहर! काय संकट हें! मी दरिद्री खरा.

पद-राग माल्कंस, ताल त्रिवट

मम धन सारें जाय लयाला। स्त्रीद्रव्यें मज आश्रय दिधला ॥ धृ० ॥ स्त्री पुरुषाची पुरूष स्त्रीचा कारण धन हें असेंच याला ॥ १ ॥

अथवा मी दरिद्री नव्हे. कांकीं मजला,

पद-राग बिहाग, ताल दीपचंदी.

विभवानुगता भार्या पाही। सम दुःखसुखी सुमित्र तूंही ॥ धृ० ॥ सत्य कधींही ढळलें नाहीं ॥ असुनी मज या लक्ष्मीत्रयही ॥ मग मी कैसा निर्धन होई ॥ १ ॥

मैत्रेया, ही रत्नमाला घेऊन आताच वसंतसेनेकडे जा आणि तिला सांग कीं, तिच्या अलंकारांची ठेव मी माझीच समजून द्यूतांत हरविली, त्याच्या मोबदला ही माला दिली आहे. ती कृपा करून घे.

वि०-छि, मित्रा! हें काय करतोस? अरे ते अलंकार अल्प मोलाचे. त्यांचा तूं उपभोग घेतला नाहींस कीं, अभिलाषही केला नाहींस. ते चोरानें नेले, त्यांच्या करितां ही पृथ्वी मोलाची रत्नमाला तिला देतोस काय?

चा०–असं मनांत देखील आणूं नको. तिनें जी विश्वासानं ठेव ठेविली होती त्याचं हें मोल आहे समजलास? माझ्या गळ्याची शपथ आहे. ही घेऊन जा आणि तिच्याकडून घेवविल्याशिवाय येऊं नको. जा तर ऊठ लवकर. (वर्धमानकास) अरे वर्धमानका हें भोंक बेमालूम बुजवून टाक. लवकर आटप; आणि हें फडकंही फेंकून दे. (मैत्रेयास) तूं तिकडे गेल्यावर माझी दीनावस्था दाखवूं नकोहो.

वि०–जो दरिद्री आहे त्यांन उदारपणाची गोष्ट काय सांगावी?

चा०–मी दरिद्री नाहीं बरं! मघांच तुला सांगितलंना (" विभवानुगता इत्यादि " पूर्वोक्त) तर आतां तूं जा लवकर. मीही शौच मुखमार्जनविधि करून स्नानसंध्या करितों. (दोघे निघून जातात)

पहिला अंक समाप्त.

अंक २ रा.

प्रवेश १ ला.

(शर्विलक प्रवेश करतो.)

शर्वि०-(आपणाशीं)

पद-राग झिंझोटी, ताल धुमाळी. दिसली पुनरपि० या चा०

ऐशा कृतिनें लाज आणिली जिंकुनि निद्रा रजनीतें ।
राजदूत ते सावध असतां जुमानिलें मी नच त्यातें ॥
ऐशीं कर्में करितां गेली निशा सत्वरी ती सरुनी ॥
तेजोहिन मी शशिसम झालों उगवतां रवी तो गगनीं ॥ १ ॥

साकी

कोणी चालत येतां वाटे, धरावया मज आला ॥
धांवत येतां शीघ्र गतीनें लागलाचि पाठीला ॥
दूषित मच्चित्तीं ॥ शंका भीतीनें येती ॥ १ ॥

(पुढें पाहून) वाहवा ! ही पहा आली ! •

पद-लते लवीच० या चालीवर.

सखी मदनिका मनहरणी । लावण्यखना सुंदर युवती,
मूर्तिमंत ही स्मररमणी ॥ धृ० ॥ कामाग्नीनें तप्त
तनूतें । शीत करी जणुं चंदनसी । सुखवीत मशीं ।
सुगुणी तरुणी ॥ १ ॥

मदनिके, तुला मी फार वेळ शोधित आहें. भेटलीस बरं झालं.

मदनि०–(चपापून) अँ शर्विलका, इकडे कुणीकडून ?

शर्वि०–थांब, तुला सारं सांगतों. (उभयतां प्रीतीनें एकमेकांकडे पहातात.)

वसंत०–(आपणाशीं) मदनिकेला पखा घेऊन लवकर यायला सांगितलं असून ती अद्याप कां बरं आली नाहीं ? एवढा वेळ काय करिते कोण जाणे. (पुढें पाहून) अरे,

पद–राग कानडा ताल धुमाळी. सुवर्ण केतकी० या० चा०

बहु प्रेमानें वदत उभी ही कोणा परक्या पुरुषाशीं ॥
प्रणयदृष्टिनें एकसारखी पहात राहिलि कशि त्याशीं ॥
दास्यत्वांतुनि मुक्त कराया पहातसे जो नर इजसीं ॥
तोच पुरुष हा खास असावा वाटतसें हें मन्मतिसीं ॥ १ ॥

तर यांना बोलूं द्या. कुणाच्या सुखाचा भंग करूं नये. आतां मी हाकच मारीत नाहीं.

मदनि०–शर्विलका, सांग सांग काय तें ? (तो शंकित होऊन चोहों-कडे पहातो.) तूं असा शंकितसा कां दिसतोस ?

शर्वि०–तुला कांहीं गुह्य गोष्ट सांगावयाची आहे. पण आतां इथं कुणी ऐकत नाहीं ना ?

मदनि०–इथं कुणी नाहीं. सांग सांग, भिऊं नको.

वसंत०– ऐकून काय गुह्य गोष्ट आहे म्हणतो, तर ती आपण ऐकूं नये.

शर्वि०– कायग मदनिके, कांहीं मोल घेऊन तुला वसंतसेना सोडील का ?

वसंत०–काय ? माझ्या संबंधाच्या गोष्टी दिसतात, तर आड उभं रा-हून काय बोलतात तें ऐकण्याला काय नव ?

मदनि०-शर्विलका, हें मी एकवेळ त्यांना विचारिलं होतं तव्हा " मी स्वतंत्र असतं, तर द्रव्य घेतल्यावांचून सर्व दासिजनाला सोडलं असतं. पण काय करूं? धनीपणा आईकडे पडला " ह्मणून त्या ह्मणाल्या. पण शर्विलका, मला सोडविण्यापुरतं द्रव्य तुजपाशीं आहे कां?

शर्वि०-होय! पण मी तशीच कांहीं तजवीज केली आहे.

साकी

दारिद्र्यानें जरि मी पीडित मन्मन तुजवरि जडलें ।
यास्तव रात्रीं त्वदर्थ कांहीं साहस सखये केलें ॥
ह्मणुनी पुसतों हें । सखये कथ मज लवलाहें ॥ १ ॥

वसंत०-याची मुद्रा प्रसन्न असून साहस केल्यामुळं घाबरलेली दिसते.

मदनि०-शर्विलका, स्त्रियांच्या नादीं लागून तूं शरीर आणि लौकिक या दोन्हींची हानी करून घेतलीस.

शर्वि०-हा वेडे! साहस केल्यावांचून का संपत्ति मिळते?

मदनि०-एकून आपला दुर्लौकिक झाला नाहीं असं तुला वाटतं पण मजकरितां साहस करतांना कांहीं विपरित तर केलं नाहींस ना?

शर्वि०-छेः

पद-राग काफी ताल दिपचंदी.

जेवि लतेचीं सुमनें । तेवि न चोरी स्त्री आभरणें ॥ ध्रु० ॥
द्विजयज्ञ धना कधि ना हरिलें । धनार्थ नसतीं चोरिलिं बाळें ॥
चौर्यसमयीं सखेगे । वर्ततसें मी सुविचारानें ॥ १ ॥

आतां हे दागिने वसंतसेनेकडे नेऊन अशी विनंती कर कीं, हे दागिने अगदीं आपल्या आंगाच्याच बेताचे केले आहेत आपण आंगावर घालावे.

मदनि०-शर्विलका, जे उजागरीनं घालावयास योग्य नाहींत असे

अलंकार माझी धनीन कधीं आंगावर घालणार नाहीं. असो. पण आण पाहूं अलंकार कसे आहेत ते.

शर्वि०-हे पहा, (असें ह्मणून शंकितपणें इकडे तिकडे फिरून पाहून तिच्या हातीं देतो.)

मदनि०-(निरखून पाहून) अग बाई! हे अलंकार तर ओळखीचे दिसतात. हे तुला कुठरे मिळाले.

शर्वि०-तुलाग काय पंचाईत? मुकाट्यानं घे म्हणजे झालं.

मदनि०-(रागें भरून) तूं मजशीं इतकी प्रतारणा करितोस तेव्हां माझा विश्वास तुला नाहींसा दिसतो. मग मला द्रव्य देऊन सोडवून तरी नेतोस कशाला?

शर्वि०-खरं सांगूं. आज सकाळीं मला समजलं कीं, माणिकचौकांत जो चारुदत्तनामीं सत्वकार रहातो त्याच्या घरचे हे. (हें ऐकून तिकडे वसंतसेना आणि इकडे मदनिका मूर्च्छा पावतात.)

शर्वि०-मदनिके, सावध हो सावध हो.

मदनि०-(सावध होऊन) अरे साहसिका, निर्दया, मजकरितां हें अनुचित कर्म करितांना त्या घरांत कुणाचा जीव घेतला किंवा कणावर घाव तर घातला नाहींस ना?

शर्वि०-मदनिके, तुला ठाऊक असूंदे. हा शर्विलक भ्यालेल्यावर, झोंपलेल्यावर प्रहार करीत नसतो. मी कोणाचा जीव घेतला नाहीं किंवा कोणावर घावही घातला नाहीं. तूं भलती कल्पना करून भिऊं नको.

मदनि०-खरं ना हें पण?

शर्वि०-हो हो. खरं खरं ह्मणजे.

वसंत०-(शुद्धीवर येऊन) मी पुन्हां जीवंत झालें हें मोठेंच आश्चर्य.

मदनि०-आतां मला बरं वाटलं.

शर्वि०-(ईर्ष्येनें) कांग मदनिके, आतां मला बरं वाटलं म्हणतेस यांत तुला कायग बरं वाटलं? हं. ह.

पद-(त्या मदनमनोरम या चा०)

मी अकार्य ऐसें केलें । गुंतुनी तुझ्या स्नेहाला ॥
तुजसाठीं दूषित केलें । पूर्वज प्रथित कीर्तीला ॥ चाल ॥
नेत असें माने तुजला । निज सदनाला । प्रेमा मजला ।
दाउनि इच्छिसि अन्याला ॥ १ ॥

(मनांत विषाद आणून) हें कांहीं खोटें नव्हे. कुलीन धनवानाची संपत्ति वेश्याच हरण करितात. आणखीं पहा,

दिंडी.

काम वन्हीची मुरत असे ज्वाला ॥
प्रीति इंधन हें होतसे तयाला ॥
जयां माजी नर यौवना धनाची ॥
आहुती ती होतसे तरी साची ॥ १ ॥

वसंत०-हा व्यर्थ राग भरतो.
शार्वि०-बरोबर असं आहे,

पद-राग कानडा ताल सुरफाकता.

लक्ष्मीसम युवती । चंचल गति असती ॥
जे नर विश्वसती । मूढमती गमती ॥
करूंनये प्रीति । कधीं स्त्रियांवरती ॥
अनुरक्त नरां तृणसम त्या मानीती । अर्थ हरुनि त्यजिती । १ ।

एका कवीनं म्हटलं तं अगदीं खरं आहे.

पद-राग मुलतानी ताल त्रिवट.

स्मशानकुसुमा सम या वेश्या । कुलज रहाती

नच सहवासा ॥ धृ० ॥ वित्तासाठीं हांसति रडती ॥
विश्वास दाविति जणुं दृढ प्रीती ॥ मल्या नरातें मग
नागविती ॥ ह्मणुनि त्यजावें त्यांच्या वासा ॥ १ ॥

आणखीं असं आहे,--

पद—राग खमाज ताल त्रिताल.

सागरवीची वृत्ती धरिती । ऐशा चंचल वेश्या असती ॥ धृ ॥
अर्थ नराचा सर्व हरोनी । त्यजिती त्यातें दीन करोनी ।
जैसा घेउनि रंग पिळोनी । फेंकुनि अळिता तो देती ॥ १ ॥

स्त्रिया स्वभावतः चपळ खऱ्या, पहा.

पद

एका पुरुषा मानसिं धरिती । नेत्रें दुसऱ्या पाचारीती ॥ धृ०
प्रेम दाउनी एका वरतीं ॥ संगमसुख तें मल्त्या देती ॥ १ ॥

अरे दुष्टा चारुदत्ता, आतां होतास कीं नव्हतास असा करून टा-
कतों पहा. (अंमळ पुढें चालतो. ती जवळ येते तेव्हां)

पद—नच सुंदरी॰ या चालीवर.

हां चल जा फिर मार्गें । येउं नको मजमागें ॥
कपटपटू स्त्रीची ती संगत मज नलगे ॥ धृ० ॥
पर्वत शिखरावरती । कमलवल्लि नच रुजति ॥
अश्ववरी लंबश्रुति । करिल कधीं का परि ती ॥

हरिका पेरुनि शेतीं । शालि कधीं का मिळती ॥
पण्ययुवा सति पद तें कधि तरि पावे गे ? ॥ १ ॥

मदनि०–(त्याचा पदर धरून)

पद–एजि साहेब नथीजा० या चालीवर.

का उगीच करिशी कोप असा ॥ घडला नसता दोष कसा ॥ धृ० ॥ अशिवा वाणी नच वद सहसा ॥१॥

शर्वि०–कसा उगीच कोप ?–

मदनि०–

आपणासाठीं मदनिनीनें । करविलेरे हे दागिने ॥
यास्तव विकल्प नच घे ऐसा ॥ २ ॥

शर्वि०–मग काय म्हणतेस ?–

मदनि०–

चारूदत्ताजवळी तीनें । ठेव ठेविली होती
जाणें ॥ ठेउनि त्यावरि बहु विश्वासा ॥३॥

शर्वि०–त्याकडे कां बरं ठेविले होते ?

मदनि०–(त्याच्या कानांत सांगते) अशाकरितां.

शर्वि०–(मनांत विस्मय करून) तर मग गोष्ट वाईट झाली.

मदनि०–काय याला पश्चात्ताप झाला ! तर मग याने नकळून कर्म केलं हेंच खरं.

शर्वि०–मदनिके, आतां पुढं कसं काय करावं ?

मदनि०–तूं पंडित आहेस. तुला सांगावयास नको.

शर्वि०–असं कांहीं नाहीं.

दिंडी.

स्त्रिया असती पंडिता स्वभावानें ॥
बुद्धि तेथें ती वसे बहू जाणे ॥
शास्त्रपठणें पांडित्य नरा येई ॥
असे अनुभव हा सर्व जगा पाही ॥ १ ॥

मदनि०—शर्विलका, जर माझं ऐकशील तर हे दागिने त्या श्रेष्ठ चारुदत्ताच्या हातीं जातील असं कर.

शर्वि०—मदनिके, तूं ह्मणतेस तसं मी करीन; पण त्यानं मला चावडीवर नेलंन तर कसं?

मदनि०—चंद्रापासून ताप कधीं होत असतो का? मग अशी गोष्ट कशी होईल?

वसंत०—शाबास, मदनिके शाबास.

शर्वि०—मदनिके, मी त्याचं कांहींच भय बाळगीत नाहीं; पण माझं मन मला खातं. तथापि दुसरा उपाय सुचला तर सांग?

मदनि०—दुसरा उपाय असा.

शर्वि०—कोणता कोणता तो?

वसंत०—ही कोणता दुसरा उपाय सांगणार बरं?

मदनि०—त्याच श्रेष्ठ चारुदत्ताचा दूत होऊन हे दागिने त्यानं पाठविले आहेत, असं सांगून माझी धनीन वसंतसेना हिला नेऊन दे.

शर्वि०—असं केल्यानं काय होईल?

मदनि०—तूं चोर ठरणार नाहींस, तो गृहस्थ ऋणमुक्त होईल, आणि जिचे दागिने तिच्या हातीं गेले असं होईल.

शर्वि०—हें तर मोठंच साहस.

मदनि०—छत् न देशील तर मात्र मोठं साहस.

वसंत०—मदनिके शाबास. तूं दासी असून कुलिनाप्रमाणं मसलत दिलीस. तुला दासी असं कोण म्हणेल?

शर्वि०–बरें तर मी तसं करीन. पण तिची गांठ कशी पडेल?

मदनि०–तूं या मदनमंदिरांत अंमळ बैस. इतक्यांत मी वसंतसेनेला तूं आल्याचं वर्तमान कळवितें. (जातें)

श०–बरं तर जा. मी इथं बसतो. लवकर ये हो.

मदनि०–(वसंतसेनेकडे जाऊन) बाईसाहेब. श्रेष्ठ चारुदत्ताकडून एक ब्राह्मण आला आहे.

वसंत०–त्यांच्याकडूनच आला असं तूं कशावरूनग जाणलेंस?

मदनि०–हें जाणण्याचं काय बाई कठीण आहे?

वसंत०–(मान डोलवून हांसून मनांत) योग्य. (उघड) येऊंदे त्याला.

मदनि०–आज्ञा. (असें म्हणून शर्विलकाकडे येऊन त्याला) चल तुला वसंतसेनेकडे नेतें. (पुढें जाऊन) ती पहा वसंतसेना. जवळ जा.

वसंत०–(शर्विलकास पाहून) भटजीबुवा, मी वंदन करितें. या आसनावर बसावं.

शर्वि०–(खालीं बसून) श्रेष्ठ चारुदत्त यांची तुला अशी विनंती आहे कीं, आमचा वाडा जीर्ण होऊन मोडकळीस आला आहे. दागिने संभाळणं कठीण पडतं, यासाठीं हे आपले संभाळावे. (दागिन्यांची गांठोडी मदनिकेच्या हातीं देऊन मकाग्यानें जाऊं लागतो.)

वसंत०–भटजीबुवा, माझा उलट निरोप त्या श्रेष्ठाला घेऊन जा.

शर्वि०–(मनांत) तिकडे जातो कोण लेक? (उघडपणें) कोणता उलट निरोप बरं?

वसंत०–ही मदनिका आपण न्यावा.

शर्वि०–यांतील अभिप्राय मला समजला नाहीं.

वसंत०–मला समजला आहे.

शर्वि०–कसा बरं?

वसंत०–त्या श्रेष्ठ आर्यांनं मला असं सांगितलं आहे कीं, जो मनुष्य हे अलंकार आणून देईल त्यास तूं आपली दासी मदनिका द्यावी तर त्यानेंच ही तुह्मांला दिली असं समजावं.

शर्वि०–(मनांत) अरेरे ! हिनं मला ओळखलंच (उघड) शाबास ! चारुदत्ता शाबास ! ! तूंच गुणवान खरा.

वसंत०–गाडीवान कोणी आहे ? गाडी जोडून आण. (इतक्यांत गाडीवान गाडी घेऊन येतो.)

गाडीवान–बाईसाहेब, गाडी तयार आहे.

वसंत०–

पद–राग पिलु, ताल दीपचंदी.

ब्राह्मण करिं मी तुजला दिधलें । त्यांच्या संगें जावें झालें ॥ ध्रु० ॥ भेट एकदां तूं कडकडुनी ॥ रडूं नको गे सखये भगिनी ॥ विसरूं नको मज ठेवीं स्मरणीं ॥ हेंच सांगणें तुज शेवटलें ॥ १ ॥

मदनि०–(रडत)

पद–राग पिलु, ताल दीपचंदी.

पाया तुमच्या जरि अंतरलें ॥ प्रेम असूं द्या असेंच आपुलें ॥ ध्रु० ॥ सहज विनोदें वदतांना मी ॥ चुकलें असलें जरि का कामीं ॥ परिसावी मम विनती चरणीं ॥ क्षमा करावी जें जें चुकलें ॥ १ ॥

(वसंतसेनेच्या पायांवर डोकें ठेविते.)

वसंत०–आतां तूं वंदनीय झाली आहेस. ऊठ जा आतां, गाडींत बैस.

शर्वि०–वसंतसेने, तुझं कल्याण असो. (मदनिकेस) मदनिके, तूं बे-

ळ्येची दासी असतां शावळकाचा बा झालीस. हा लाभ वसंतसेने-च्या योगानं झाला. हें लक्षांत ठेऊन इच्या पायां पड. (जावयास निघतो.)

पडद्यांत " कोण आहे तिथं? कोतवालाची आज्ञा आहे कीं, आर्य-कनामा गोपाळपुत्र राजा होणार. असं कोणी सिद्धानं त्याल भविष्य सांगिल्यावरून पालक राजानं त्या शंकेमुळं गवळवाड्यांतून त्याला धरून आणून बंदिशाळंत कोंडून ठेविलं आहे. तर आपापल्या जागीं सर्वांनीं फार सावधपणानं रहावं "

शर्वि०-(ऐकून) काय ? पालक राजानं माझा प्रियमित्र आर्यक बद्ध करून नेला ! काय करूं आतां ? सांप्रत मी सपत्निक झालों आहें. हिला सोडून जाववत नाहीं. आणि मित्रांची उपेक्षाही करवत नाहीं. असं उभय संकट प्राप्त झालं आहे. तथापि या समयीं तर,

साकी.

कांता स्नेही पुरुषा दोन्ही, प्रियतर जगतीं असती ॥
आज लाभ हा प्रियमित्राचा, शतवनितेहुनि जास्ती ॥
वाटे हो मजला । जावें सोडविण्या त्याला ॥ १ ॥

तेव्हां इला वडील माणसांच्या स्वाधीन करून जावं हें बरं. (मद-निकेस) प्रिये तूं कांहीं काळजी करूं नको. (गाडी) अरे गाडी-वान, तुला रेभिलसावाचं घर माहीत आहे नाहीं ? तिथं हिला घेऊन जा. (मदनिकेस) प्रिये तूं भिऊं नको. जा. (मदनिका गाडींत बसून जाते) काय ? पालक राजानं माझा प्रियमित्र बंदींत टाकला काय ? ठीक आहे. पहातों आतां.

पद्—झंपा प्रबंध.

त्वरित जाउनि प्रियसखा सोडवीतों । मत्पराक्रम
नृपा दाखवीतों ॥ धृ० ॥ ख्यात शौर्यीं असे, ज्ञा-
ति बांधव व , दास भूपावरी कोपले जे ॥ देउनी-

यां तया पूर्ण उत्तेजना, एकदां सर्वही उठवीतों ॥
व्यर्थ शंका कसी धरुनियां मानसीं, शत्रुनीं धरु-
नियां त्यास नेलें ॥ राहु वदनीं शशी तंवि हा
बंधनीं, मुक्ततेस्तव पहा हाच जातों ॥ १ ॥

(निघून जातो)

(इतक्यांत वसंतसेनेची एक दासी प्रवेश करिते.)

दासी (वसंतसेने जवळ येऊन) बाईसाहेब, चारुदत्ताकडून एक ब्राह्मण कांहीं वस्तु घेऊन आला आहे.

वसंत०—वाहवा! काय सुदीन हा! जा जा त्याला लवकर घेऊन ये.

(" जी हुकूम. " ह्मणून जाऊन विदूषकासह प्रवेश करिते.)

विदू०—(पाहून) कायहो आश्चर्य हें! तपश्चर्येचा क्लेश भोगून मिळविलेल्या पुष्पक विमानांत बसून रावणराजा डौलानें जात आहे. पण आज मी ब्राह्मण तपश्चर्येचे क्लेश न भोगतां नगरनारीजन बरोबर घेऊन चालत आहें. (चालत) वाहवा, काय शोभा ही! अजून कितीसेम चौक आहेत तरी?

दासी—आतां फार नाहींत. हा शेवटला आठवा चौक. आंत चला.

विदू०—अग चेटा, भरजरी दुपेटा पांघरून अंगावर पाटीभर अलंकार घालून मोठ्या डौलानें इकडे तिकडे डुकत फिरत आहे असा हा कोणग?

दासी.—भटजीबुवा, हा माझ्या धनिणीचा भाऊ.

विदू०—वसंतसेनेचा का हा भाऊ? तिचा भाऊ होण्यास यानें किती तप केलें असेल कोण जाणे; परंतु यांत कांहीं योग्यता किंवा प्रतिष्ठा नाहीं. जरी हा नेटका सुभाणा दिसतो तरी स्मशानांतल्या चंपक वृक्षाप्रमाणें लोकांस हा असेव्य आहे. (दुसरीकडे पाहून) तें असो. बुटीदार शालू नेसून तेलानें चकचकलेला लाल जोडा पायांत घालून उंच पलंगावर बसली आहे अशी ही य कोण?

दासी.–ही माझ्या यजमाननीची मातुश्री.

विदू०–अबब. मसणांतल्या डाकिनीप्रमाणं हिच्या पोटाचा केवढा हा विस्तार! काय हिला अगोदर आंत बसवून महादेवाचे देवळा प्रमाणं मग दरवाजा बांधला?

दासी.–भटजीबावा, आमच्या मातुश्रीची अशी थट्टा करूं नका. अहो हिला चातुर्थिक हिवानं पिडलं आहे.

विदू०–(थट्टा करून) हे भगवंता चातुर्थिका अशा उपचारांनीं मज ब्राह्मणाकडेही एकवेळ कृपादृष्टि करून पहा.

दासी.–वेड्या मरशीलना?

विदू०–(हांसून) हे दासीपुत्रिके, असला सुजलेल्या पोटाचा ढेर मेला तर बरा. दारू पिऊन पिऊन माजलेली हा थेरडी अशा दशेस पावली आहे. ही जर मेली तर हजारे कोल्ह्यांची पोटं भरतील. अग अशा अगडबंब शरिराच्या तुम्हीं बायका चालतां तरी कशाग? तुम्हाला होड्या गाड्या वाहतात काय?

दासी.–नाहीं नाहीं. होड्या गाड्या कशाला पाहिजेत.

विदू०–हो इथं विचार करावयास नको. प्रेमरूप निर्मळ जल भरलेल्या महान समुद्रांत स्तन, जघन, नितंब हींच तुम्हांस सुंदर गमन साधनें आहेत. असो. अशा प्रकारचा हा वसंतसेनेचा सर्व संपत्तींनीं भरलेला आठ चौकांचा वाडा पाहून तीन्ही लोकांचा एकत्र संपत्ति असं मी समजतों. याचं वर्णन करावयास माझ्या वाणीला शक्ति नाहीं. हें गणिकागृह म्हणावं, किंवा कुबेराचं मंदीर आहे म्हणावं, असो. तुम्ही यजमानीण कुठं आहे.

दासी.–आर्या, ती बागेतल्या बंगल्यांत बसली आहे. आपण आंत जावं.

वि०–(जवळ जाऊन) नायकिणी तुझं कल्याण असो.

वसंत०–कोण मैत्रेय काय? (उभी राहून) आर्या तुझं स्वागत असो. या आसनावर बसावं.

वि०—तूंही पण खालीं बैस. (दोघे बसतात)

वसंत०—आर्या, शेटजी खुशाल आहेतना ?

वि०—आर्ये, तो खुशाल आहे.

वसंत०—आर्या, तो सज्जन तरु आतां किती तरी शोभतो ?

पद—राग पिलू ताल धुमाळी

शाखा सद्गुण विनय. पालवी विश्वासाचीं मुळें ॥
दया साउली प्रकांड वर्तन, चारित्र्याचीं फुलें ॥
पीयूषासम मधुरा वाणी उपकारादर फळें ॥
ऐशा सज्जन तरूवरि सुखें सुहृत्पक्षि राहिले ॥ १ ॥

वि०—(मनांत) ह्या धूर्त गणिकेनं ताडलं वाटतं. (उघड) हो यांत काय संशय ? तसंच आहे.

वसंत०—आर्या इकडे कां येणं झालं ?

विदू०—वसंतसेने, त्या श्रेष्ठ चारुदत्तानें हात जोडून तुला विनंती केली आहे.

वसंत०—(आपण हात जोडून) काय आज्ञा केली आहे ?

विदू०—त्याचं ह्मणणं असं आहे कीं, तूं जे सुवर्णालंकार विश्वासानें मजपाशीं ठेविले होते ते माझे असें समजून मी द्यूतांत हरविले. ज्या द्यूतकारानें ते जिंकून नेतले तो राजाचा अपराधी आहे. तो सध्या कुठं गेला समजत नाहीं.

दासी—बाईसाहेब, तुह्मी मोठ्या दैवाच्या. तुमचा यजमान जुवेबाज झाला.

वसंत०—(मनांत) काय चोरानें नेले असून द्यूतांत हरविले ह्मणतो ? शाबास चारुदत्ता ! ह्या तुझ्या गुणावरून जीव ओंवाळून टाकावा. (उघड) मग पुढं काय झालं ?

वि०—ह्मणून त्याच्या मोबदला ही रत्नमाला कृपाकरून घ्यावी.

वसंत०—(मनांत) काय, तो अलंकार याला दाखवूं ? (विचार करून) पण नको. पाहूं पुढं काय होतं तें. (उगीच बसते.)

विदू०—काय ही रत्नमाळा नको ?

वसंत०—(हांसून सखीच्या मुखाकडे पाहून) मैत्रेया, त्या सज्जनानं पाठविलेली रत्नमाला मी कशी बरं घेणार नाहीं? आणि इकडे (तो रत्नमाला देतो ती घेऊन बाजूस ठेऊन आपल्याशीं) काय आश्चर्य हें ! फुलांचा भर गेला तरी सहकार तरूपासून मकरंद बिंदू पडतातच. (उघड) मैत्रेया, तुझ्या दर्शनाकरितां मी संध्याकाळीं तुजकडे येणार आहे, असा त्या द्यूतकाराला माझा निरोप सांग.

विदू०—(मनांत) ही त्याजकडे जाऊन दुसरं कांहीं मागून घेणार आहे वाटतं. (उघड) बरं मी सांगेन (मनांत) कीं, गणिकेच्या प्रसंगापासून दूर रहा म्हणून. बरं येतों तर.

वसंत०—बरं ये हं. (तो जातो.) अग चेटी ही रत्नमाला घे.

पद.

चल गडे जाउंया प्रियसदना ॥ सलिल विनोदें गुज-
गोष्टीही करुनी रमवूं तत्सुमना ॥ ध्रु० ॥ दर्शन
घ्याया आतुर झालें, लोचनभर तें बघुं सुजना ॥१॥

दासी—बाईसाहेब, आपण जायाचं म्हणतां खरं; पण हें पाहिलंत का आभाळ किती दाट भरलं आहे तें !

वसंत०—तें कांहीं असो.

पद—रमला सांब जसा० या चा०

ठरला निश्चय मम दयित गृहा जायातें ॥
असु दे रात्र तरी, मेघ करो वृष्टीतें ॥
न गणी कांहिं चढो मी मुकि या विघ्नातें ॥
हृदयीं आस असे प्राणसखा भेटीतें ॥

(जातात.)

प्रवेश २ रा.

(उत्कंठित असा चारुदत्त प्रवेश करितो.)

चारु०–(आकाशाकडे पाहून) हें आज काय अकाळ दुर्दिन झ- वळं आहे !

पद–राग मल्हार ताल त्रिवट

पाहुन मघा हर्षित चित्तीं । होउनियां हे मयूर
नटती ॥ धृ० ॥ हंस त्यजुनी ज्याच्या पुढती ॥
क्षणभरिं नच हे उभे ठाकती ॥ अकालिं दुर्दिन
आले संप्रति । कामुका नभा सम रोधीती ॥ १ ॥

आणखी पद्य.

पद्य–राग कर्नाटकी दुंदुमीच्या चालीवर.

माहिषोदर सम कृष्ण पयोधर ॥ शंखाकृति धरिं
बकतती हार ॥ कसुनि तडिद्वा हें पीतांबर ॥ जणुं
आक्रमि नभ दुसरा श्रीधर ॥ १ ॥

पद–राग वसंत ताल त्रिवट,

मेघा मधुनी या जलधारा । येती शुचि रजताच्या
तारा ॥ धृ० ॥ विद्युत्प्रकाशें कशा झळकती ॥ क्ष-
णोक्षणीं या दिसति न दिसती । गगनपटद्वारा झ-
डुनी पडती । भूमीवरती कशा झरास ॥ १ ॥

पद–ताल धुमाळी. अमात्याच्या घरीं० या चा०

हंस कोक वा मयूर बकसे कोणी उडुं बघती ॥
कांसव सुसरी मीन नक्रसम कांहीं जलिं तरती ॥
कांहीं पर्वत तुंग शिखर तरु मंदिरसे दिसती ॥
वातें चंचल नभीं मेघ हे नानाकृति धरिती ॥ १ ॥

(चिंतन करून) माझा प्रियमित्र मैत्रेय वसंतसेनेकडे जाऊन फार वेळ झाला. अद्यापि परत कां बरं येत नाहीं ? (खालीं बसते.)

(इतक्यांत विदूषक येतो.)

विदू०–(आपणाशीं) काय आश्चर्य सांगूं ? त्या गणिकेचा केवढा लोभाविष्टपणा आणि कृपणपणा हा ! दुसरी तिसरी कांहीं गोष्ट न काढतां आणि अनादर बुद्धीनं मजशीं कांहीं न बोलतां मुकाट्यानं तिनं रत्नमाला घेतली ! तिची एवढी मोठी संपत्ती असून मला इतकं देखील झणाली नाहीं कीं, ' आर्या मैत्रेया, अंमळ बैस. तूं श्रमला असशील, भागला असशील. थोडीशी सुंठ साखर खाऊन पाणी पिऊन मग जा. ' छी ! ही तिची चाल फार वाईट ! कुणी म्हणतात तें खरं आहे. कंदावांचून कमळ, अवंचक वणिक, विश्वासुक सोनार, कलहावांचून मामसंबंध आणि निर्लोभ गणिका असं असणं हें फार विरळा. तर आतां मी आपल्या मित्राला कसं तरी करून ह्या गणिकेच्या प्रसंगापासून दूर करीन. तो पहा माझा प्रियमित्र वृक्षवाटिकेंत बसला आहे, तिकडे जावं. (जवळ जाऊन) मित्रा, तुझं कल्याण असो.

चारु०–(त्याजकडे पाहून) मित्रा आलास, बरं झालं, खालीं बैस. (तो बसतो.) मित्रा, इतका उशीर कां लागला ? बरं, ज्या कार्यास तूं गेला होतास तें कार्य कसं काय झालं ?

विदू०–मित्रा तें कार्य बिघडलं.

चारु०–काय झणतोस ? तिनं ती रत्नमाला घेतली नाहीं ?

विदू०–असं आमचं दैव कुठं आहे ? तिनं कमलासारख्या कोमल करांची अंजलि मस्तकीं धरून ती घेतली.

चारु०–मग कार्य बिघडलं झणतोस हें काय ?

विदू०–बिघडलं नाहीं तर काय झालं ? अरे ज्याचा उपभोग आपण एक दिवस देखील घेतला नाहीं. जें चोरांनीं नेलं आणि जें अल्प मोलाचें असा अलंकाराकरितां चतुःसमुद्रांतील सारभूत ही अमूल्य रत्नमाला ती पाठविली याहून नाश तो कोणता ? मला वाटतं ती गणिका त्याचा घेणार नाहीं, तुझ्या स्नेहामुळं परत देईल. पण ती कसली कोणी ! तिनं घेतली ती घेतलीच.

चारु०—मित्रा असं म्हणूं नको, पहाः—

पद. गजाननादे० या चा०

माझ्यापाशीं विश्वासानें । ठेव ठेविली होती तीनें ॥
मोल होय हें त्याचें मित्रा । मग काय असें वदसी मुखानें ॥ १ ॥

विदू०—मित्रा, आणखी दुसरं एक मला संतापास कारण झालें. ती सर्वी जनास खूण करून तोंडाला पदर लावून मजकडे पाहून खद-खदां हांसलीरे. असा तिनं माझा उपहास केला. यासाठीं मित्रा मी ब्राह्मण असतां तुला हात जोडून विनंती करितों कीं अतःपर या जन-निंद्य गणिका संबंधाचा त्याग कर. ती संध्याकाळीं तुजकडे येणार आहे. आल्यावर आणखीं काय घेऊन जाईल नकळे ? या गणिका म्हणजे जोड्यांतले खडे. निघतां निघायाच्या नाहींत आणि खुपल्या-वांचून रहात नाहींत. आणखीं पहा गणिका, हस्ती, कायस्थ, भिक्षुक चोर आणि रासभ हे जिथं रहातात, तिथं दुष्टभाव उत्पन्न झाले नाहींत असं नाहीं.

चारु०—मित्रा, ही निंदा पुरे आतां. माझ्या अवस्थेनंच मला त्या प्र-संगांतून काढलें आहे. पहा,

पद—राग झिंजोटी ताल त्रिवट. श्रीहरिच्या वेणुनादें० या चा०

बेगानें चालुं पाहे हय गमनीं तो अती ।
पारि त्याचे हतबलानें पाय न ते उचलती ।
चपल तशा पुरुष वृत्ती चोंहिकडे धांवती ।
परत पुन्हां खिन्न होतां चित्ताप्रती पावती ॥ १ ॥

मित्रा हें पहा, ज्याच्याकरितां वेडा आहे त्याची ती कांता. "कारण प्रवेश सर्व वशः" या प्रमाणें ही गोष्ट आहे. (आपल्याशीं) नाहीं नाहीं. (उघड) पण ज्या अर्थी मला द्रव्यानं सोडलं आहे त्या अर्थी तिला मी सोडलं हें उचित आहे.

विदु०—(त्याच्याकडे पाहून मनांत) हा वर पाहून दीर्घ उश्वास टाकतो. तेव्हां माझा तर्क होतो कीं, मी जो निवारण केलें असतां याची

उत्कंठा अधीकच वाढली. तस्मात् कर्माची गती वक्र आहे ह्मणतात तेंच खरं. मित्रा, मी निघालों तेव्हां आज संध्याकाळीं तुझ्या भेटीस येईन, असं तुला सांग ह्मणून ती ह्मणाली. यावरून ती रत्नमालेनं संतुष्ट न होतां दुसरं कांहीं मागावयास येणार असेल असं वाटतं.

चारु०–मित्रा येऊंदे. आली तर संतुष्ट होऊन जाईल.

(इतक्यांत कुंभिलकनामा चेट येतो.)

कुंभि०–माझी धनीन वसंतसेना तिनं आर्य चारुदत्ताकडे जाऊन आपल्या भेटीस वसंतसेना येत आहे असं कळीव ह्मणून तिनं आज्ञा केली आहे. तर त्याच्या घरीं गेलं पाहिजे. (इकडे तिकडे फिरून पुढें पाहून) तो पहा बागेंत चारुदत्त बसला आहे. आणि तो द्वाड भटही त्याच्याजवळ आहे. बागेचा झोंपा तर लावला आहे. आतां आंत कसं जावं ? असो, त्या भटाला खूण करावी ह्मणजे तो इकडे येईल. (मातीचीं ढेंकळें त्याच्या आंगावर फेंकतो)

वि०–अरे कुंपणांतील आंब्याचे झाडावर जशीं ढेंकळं मारावीं तशीं मला ढेंकळं कोण मारतो ?

चारु०–अरे बंगल्याच्या तज्यावर पारवे क्रीडा करितात, त्यांनीं माती पाडली असेल.

वि०–अरे दुष्टा, रांडलेंका पारव्या थांब थांब, या दांडक्यानं पाडाचा आंबा जसा पाडावा तसा तुला या तज्यावरून खालीं पाडतों पहा. (दांडकें उगारतो)

चारु०–(विदूषकाला धरून) मित्रा बैस खालीं. हें काय करितोस ? तो गरीब बिचारा पारवा आपल्या स्त्रीसहवर्तमान मौजेनं बसला आहे, त्याला त्रास कां देतोस ? बसूंदे त्याला.

चेट०–काय हा मूर्ख भट, त्या पारव्याकडेसच पहातो. मजकडे पहात नाहीं. असो. आणखीं ढेंकूळ मारून पहातों. (पुन्हा ढेंकूळ मारतो.)

वि०–(चोहोंकडे पाहून) आं–झोंपाकडे कुंभीलक आला आहे का-य ? आलों आलों, थांब. (जाऊन झोंपा उघडून) अरे कुंभिलका, आलास ? ये आंत.

चेट–(आंत जाऊन) भटजीमामा, तुह्माला मी वंदन करितो.

विदु०—कल्याण. अरे कुंभिलका, अशा अंधाराच्या आणि पावसा-च्या वेळेस तूं इकडे कुणीकडे ?

चेट—अरे ही ती.

विदु०—कोण ? ती ही कोण ?

चेट—अरे ती ही.

विदु०—ही ती, ती ही, असं काय करतोस? नीट बोल.

चेट—तूं तरी कोण ही ती, कोण ती ही असं काय विचारतोस ? नीट विचार.

विदु०—बरं असो. नीट सांग ही ती कोण ?

चेट—(मनांत) आतां दुसऱ्या प्रकारानं सांगावं. (उघडपणें) अरे तुला प्रश्न घालितों.

वि०—तुझ्या डोकीवर मी पाय ठेवितों.

चेट—बरं, आंब्याला मोहोर येण्याचा ऋतु कोणता ? सांग,

वि०—अरे, रांडलेका ग्रीष्म.

चेट—(हांसून) छे: नव्हे.

वि०—(मनांत) आतां इथं काय करावं. (विचार करून) असो. चारुदत्ताकडे जाऊन त्याला विचारावं. अरे अमळ उभा रहा. मी जाऊन येतों. (चारुदत्ताकडे जाऊन) मित्रा, आंब्याला मोहोर येण्याचा ऋतुरे कोणता ?

चारु०—मूर्खा, वसंत.

वि०—असं काय ? ठीक. (चेटाकडे येऊन) शतमूर्खा वसंत.

चेट—बरं, धनकनकसंपन्न राष्ट्राचं रक्षण कोण करितो ?

वि०—अरे रस्ते.

चेट—(हांसून) छी हेंही नव्हे.

वि०—आतां कसं करावं? (विचार करून) असो. पुन्हा चारुदत्तास पुसून घ्यावं. थांब अमळ. (चारुदत्ताकडे जाऊन) मित्रा, धनकनक संपन्न राष्ट्राचं रक्षण कोण करतो ?

चारु०—मित्रा सेना.

वि०—(चेटाकडे जाऊन) अरे रांडलेका सेना.

चेट-आतां दोन्ही शद्ब जोडून लवकर बोल.

वि०-सेनावसंत.

चेट-अं: फिरवून बोल.

वि०-(शरीर फिरवून) सेना वसंत.

चेट-अरे मूर्खा, पदं फिरवून बोल.

वि०-(पावलें फिरवून) सेना वसंत.

चेट-अरे अक्षरांचीं पदं फिरीव.

वि०-(विचार करून) हं-समजलों. वसंतसेना.

चेट-हीच ती आली आहे.

वि०-तर मग चारुदत्ताला सांगितलं पाहिजे. (चारुदत्ताकडे जाऊन) मित्रा, तुझा धनिक आला आहे.

चारु०-आमच्या कुळांत धनिक कुठचा ?

वि०-कुळांत नाहीं; पण द्वारांत आहेना ?

चारु०-मित्रा, नीट सांग काय तें.

वि०-अरे वसंतसेना आली आहे.

चारु०-मित्रा, मला चाळवितोस काय ?

वि०-मित्रा, माझ्या वचनावर विश्वास नसला तर ह्या कुंभिल्कास विचार. अरे रांडलेका कुंभिलका जवळ ये.

चेट०-(जवळ जाऊन) शेटसाहेब मी मुजरा करितों.

चा०-गड्या तूं आलास बरं झालं; पण खरंच का वसंतसेना आली आहे?

चेट-खरंच शेटसाहेब, मला त्यांनीं आपणांस कळविण्याकरितां पाठविलं आहे.

चा०-(हर्षानें) गड्या तूं आनंदाची गोष्ट सांगितलीस. मी प्रियवचन कधीं निष्फळ करीत नाहीं. तर हें तुला बक्षीस घे. (आंगावरचा शेला काढून त्यास देतो.)

चेट-(शेला घेऊन वंदन करून हर्षानें) हा शेला मी आपल्या यजमानीनीस दाखवितों. (जातो)

वि०-मित्रा, ही इतक्या अंधेरांत, अवसांत कां आली समजलास ?

चारु०—माझ्या ध्यानांत पुरतसं आलं नाहीं.

वि०—अरे तुझी ती रत्नमाला अल्प मोलाची आणि तिचे अलंकार बहु मोलाचे, ह्मणून असंतुष्ट होऊन दुसरं कांहीं मागावयास आली आहे समजलास ?

चारु०—फार चांगलं झालं. संतुष्ट होऊन जाईल. (वर पाहून) मित्रा, हा पाऊस आला पहा. चल तर आपण तिची आंतल्या चौकांत वाट पहात बसूं.

(तदनंतर अभिसारिकेचा उत्तम वेष घेऊन उत्कंठित झालेली वसंतसेना बरोबर तिजवर छत्री धरणारी एक दासी व एक वीट अशा येते.)

वीट—(वसंतसेनेला उद्देशून आपल्याशीं)

पद—लावणीच्या चालीवर.

सारसाहीन हा जरी। दिसतसे तरी । रूप सुंदरी। केवळ दुसरी लक्ष्मी खरी ॥ १ ॥ उज्वला स्मराला अशी । वाटते मशीं । काय ही नारी । खासचि मन्मथतरुमंजिरी ॥ २ ॥ सर्वही कुलिन कामिनी। शोकाकुल मनीं । होति अनिवार । पाहुनि भाग्यवान ही नार ॥ ३ ॥ चालली सलज्ज प्रणयिनी । ही विलासिनी । प्राणप्रिय सदना । धरुनी मनीं रतिसुख सेवना ॥ ४ ॥

(उघड) वसंतसेने, ही गम्मत पहा.

दिंडी.

गिरीं शिखरीं होउनी लंबमान ।
गर्जताती घन दुंदुभी समान ॥
ध्वनी ऐकुनि शिखि उडति पक्षवातें ।
मणीव्यजनीं वाजिताती नभातें ॥ १ ॥

पद्—राग खमाज ताल त्रिवट.

धारा जर्जर भेक प्रसरती । झर्झर पंकीं उड्या मा-
रिती ॥ धृ० ॥ नच केकावति शिखी संभ्रती । कु-
सुमित तरु हे पहा डोलती ॥ साधू चंद्रा खळ घन
झांकिती । कुलटा चपला स्थिर न वसे ती ॥ १ ॥

वसंत०—तूं फार चांगलं बोललास. ही रात्र पहा,

पद्—लाल शालजोडी० या चालीवर.

पीन पयोधर कांता मागें कांत असे हा परि मातें ॥
रमे तेथ तूं भंगाया कां आलिस या एकांतातें ॥
ऐसें वारंवार गर्जुनी काय वारितें हे मातें ॥
निशासवत ही कोपुनि कैशी रोधी माझ्या मार्गातें ॥ १ ॥

वीट—तर मग इचा निंदाच केलं पाहिजे.

वसंत०—अरे ही स्वभावच असा.

पद्—राग पूर्वी ताल त्रिवट.

गर्जुत वर्षुत मेघ परी ते । पडोत चपला भिववायातें ॥
धृ० ॥ प्रियाकडे ज्या जाया निघती । या विघ्रा त्या
युवा न गणती ॥ स्त्रिया स्वभावें ऐशा असती ।
ह्मणुनि निशाही करि या कृतीतें ॥ १ ॥

वीट—वसंतसेने, हा दुसरा चमत्कार पहा.

पद्—नाहीं कोणी० या चा०

पवन जवन नच हय हा भासे । नच जलधारा
शरौघ वर्षे । घनदुंदुभीरव गर्जति खासे । विद्युध्वज

हा शोभे वरती ॥ १ ॥ मेघराज हा नेई हरुनी ।
चंद्राचा करसमूह गगनीं ॥ निर्बल रिपूचा कर-
भार हरुनी । सबल भूप तो जैसा नेई ॥ २ ॥

वसंत०—अरे हा किती निर्दयपणा पहा,

पद—रुमक झुमक० या चालीवर.

क्षत केलें गर्जुनी । घनें या । विरह जनांच्या
अंतःकरणीं ॥ धृ० ॥ दुष्ट बक कसा प्रावट्
शद्बें । क्षतीं चालितो क्षारालागुनी ॥ १ ॥

आणखीं ही मौज पहा.

पद—राग मल्हार ताल त्रिवट.

वर्णे तमाल पल्लव ओले । ऐशा मेघें नभ झांकि-
यलें ॥ धृ० ॥ प्रासादशिरीं दिवटी जैसी । शोभे
चपला घनावरि तसी ॥ अबल नराच्या कांते
सम या । चंद्रप्रभेला मेघें हरिलें ॥ १ ॥

वीट—वसंतसेने, आणखीं हा चमत्कार पहा,

पद—बिहाग-दादरा.

विद्युद्गुण पृष्टिवरी जया बांधिलें ॥ वाउनियां जल-
धर हे वर्षु लागले ॥ धृ० ॥ इंद्राच्या आज्ञेनें र-
जत रज्जूनीं ॥ ओढुनि जणुं नेति मही हस्ति हे बळें ॥ १ ॥

वसंत०—विटा, दुसरा चमत्कार पहा.

पद—पंचकल्याणी घोडा०

मयूरें ये ह्मणुनी वाहिला ॥ केमें बकें आलिंगिला ॥

बहु त्रासें हंसें जया आजि पाहीला ॥ नभीं मेघ तो झां-
कुनी दिशा नीलांबरिं ठेला ॥ १ ॥

बीट—होय. असंच आहे पहा,

पद—पार्थी बुज देउनि वचनें या चालीवर.

झांकिलीं कमलरूप नयनें । नष्टलीं रात्र दिवस भानें ॥
धृ० ॥ जया तम ज्ञान विजेनें ॥ झांकिलीं दिशारूप वदनें
॥ मेघाच्छादित जग जाणें । भिजलें हें जल धारेनें ॥ १ ॥

वसंत०—पहा.

अंजनीगीत.

गेला तारागण हा नाशा । उपकाराचि तो दुर्जनिं जैसा ॥
कांत वियुक्ता युवती तैशा । दाहि दिशा भ्रमती ॥ १ ॥
पेटतां विद्युल्लता ज्वलन ॥ अंतरीं गेलें संतापोन ॥
विरघळलें हें वाटे गगन ॥ जळरूपें पडतें. ॥ २ ॥

आणखीं पहा,

पद—अरसिक किती हा० या चालीवर.

उतरे चढेही वर्षी । गर्जे पाडी घन तिमिरासीं ॥ धृ० ॥
प्राप्त नवश्री पुरुषा । सम धरि घन हा बहु रूपासीं ॥ १ ॥

बीट—हो असं खरं. मला तर वाटतं.

पद—डगर चलत दिमगारी० या चालीवर.

गगन जळत चपलांनीं । गमत जणुं ॥ गगन० ॥ धृ० ॥
जलधर वृष्टी प्रशांत होई । टपकति जलधारांनीं ॥ १ ॥
हालति कर्ते निस्वसती कीं । हांसति काय बकांनीं ॥ २ ॥

वसंत०—(मेघाकडे पाहून)

पद—नृपवर राजिसुता० या चालीवर.

मेघा, निर्लज्जारे जात असें मी प्रियकर सदनासी।
मेघा ॥ धृ० ॥ घोर भयंकर असें गर्जुनी । भिववुं
पहासी मज लागोनी ॥ धारा हस्तें काय ह्मणोनी ।
स्पर्श मला करिसी ॥ मेघा ॥ १ ॥

हे शका तुला हें योग्य नव्हे.

पद—अबला क्षी ही० या चालीवर.

तुला वाटतें काय बेत मम झाला तुशि याया ॥
ह्मणुनि गर्जसी काय असा तूं मजला भिववाया ॥
समज धर मनीं असें निघालें प्रियाकडे जाया ॥
योग्य मुळीं तूं नससी यास्तव मार्गा रोधाया ॥ १ ॥

पद—जय जय मदना० या चालीवर.

करी गर्जना जल वृष्टीला ॥ विजा पाड तूं भिववायाला ॥
निघाति युवा ज्या प्रियसदनाला । भोजति नच त्या तव विघ्नाला

पद—इस तन धनकी० या चालीवर.

कां न होसी तूं निष्ठुर चपले ॥ स्त्री दुःख जाणत अ-
सुनी सगळें ॥ धृ० ॥ जरि घन वर्षे वर्षो दे तो ॥
पुरुष मनानें निर्दय असतो ॥ जाणुनि मशि कां
वर्तन असलें ॥ १ ॥

वीट—इची उगीच कां निंदा करतेस?

पद–ताल त्रिवट.

कोपुं नकोगे इजवरि भामिनी । उपकृति तुजवरि
करि सौदामिनी ॥ धृ० ॥ वरचेवर ही चमकुनि
ऐसी । गाढ तिमीरीं दावी तुजसीं ॥ दयित गृहा-
च्या मार्गी लागुनी ॥ १ ॥

वसंत०–विटा हेंच तें घर ना ?

वीट–हो तेंच हें. तूं सकलकलाभिज्ञ, चतुर आहेस. तुला मी उपदेश करावा असं नाहीं. तरी स्नेहास्तव सांगितल्यावांचून रहावत नाहीं. ह्मणून म्हणतों. तूं आंत गेल्यावर फार कोपूं नको. कारण,

पद–ताल दादरा. चामराचे चालीवर.

फार कोप जाहल्यास रतीसौख्य होइना ॥
कोप वसत नाहिं तेथ काम जाण राहिना ॥
स्वल्प कोप दर्शनेंचि कोपवीव तूं प्रिया ॥
चित्ति शांति वरुनि तदा स्वयें तोषवी तयां ॥ १ ॥

वसंत०–असो, मी आलें आहें ह्मणून जाऊन सांग ?

वीट–बरं. (चारुदत्ताजवळ जाऊन)

पद–राग खमाज ताल धुमाळी. नको हरि निशिं० या चा०

जिकडे तिकडे नीप कदंबें, फुलुनी गंधें महि भरली ॥
मेघाच्छादित गगनपटातें पाहुनि तैसें या काळीं ॥ धृ० ॥
मदनें व्याकुळ हर्षित चित्तीं दयित गृहाला जी आली ॥
मेघ जलांनीं वृष्टि करोनी अंगें सारीं तीं भिजलीं ॥
गडगडाट हा घोर नभोदरीं पाहुनि हृदयीं जी भ्याली ॥
कर्दममय निजचरण धूत ती द्वारिं उभी हो राहियली ॥ १ ॥

चारु०–मित्रा, हा काय म्हणतो ऐक.

विदू०–ठीक आहे. (कुंभिलक कानांत सांगतो तें ऐकून वसंतसेनेकडे जाऊन) आलीस का? बरं झालं. तुझं कल्याण असो.

वसंत०–आर्या मी वंदन करितें. (विटाला) विटा, ही छत्रधारिका परत जातांना तुझ्या कामीं पडेल.

वीट–(आपल्याशीं) या युक्तीनं ही मला परत जावयास सुचविते. (उघड) बरं मी जातों, पण एवढं लक्षांत ठेव.

पद–राग बेहाग, ताल दादरा. अभिनवमधु लोलुप० या० चा०

कपटानृत मायेचें गेह हें असें ॥ रतिलीलेलागिं
दुजें स्थान तें नसें ॥ धृ० ॥ सुरतोत्सव सुखमंदिर।
प्रसिद्ध हें पण्य शरिर। करुनि पूर्ण मदन समर।
तोषवि तो कामुक नर । कथणें तुज याहुनिया
अधिक कायसें ॥ १ ॥

(वीट व छत्रधारिका जातात.)

वसंत०–आर्या मैत्रेया, तुमचा तो द्यूतकार कुठं आहे?

विदु०–(मनांत) वाहवा द्यूतकार कुठं आहे? ह्या शब्दांनीं हिन माझ्या मित्रास मोठाच मान दिला. असो (उघड) तो शुष्क-वृक्षवाटिकेंत बसला आहे.

वसंत०–आर्या, तुमची शुष्कवृक्षवाटिका ती कोणती?

विदू०–अग जिथं कुणी खात नाहीं की पीत नाहीं ती शु० वाटिकाच.

वसंत०–(ऐकून हांसून) असं काय?

वि०–आंत जा.

वसंत०–आंत जाऊन मी त्याशीं काय बोलावग?

चेटी–इतकंच कीं, हे द्यूतकार, हा प्रदोष समय तुम्हांला शुभ आहे ना ?

वसंत०–असं माझ्यानं कसं बोलवेल ?

चेटी–हा समयच तुम्हांकडून बोलवील.

वसंत०–(आंत जाते आणि चारुदत्ताजवळ जाऊन त्याजवर फुलें टाकून) अहो द्यूतकार, हा प्रदोष समय तुम्हांला सुखाचा आहे ना ?

चारु०–(तिजकडे पाहून) काय वसंतसेना आली ? (हर्षानें उठून) हे प्रिये, तुला काय सांगूं !

पद–राग सोहनी ताल त्रिवट.

धन्य काळ हा आज सुखाचा । पुरला हेतु मा-
झ्या मनिंचा ॥ धृ० ॥ प्रदोष जाई सुद्धा जागरीं ॥
दुःखें कंठीं काल निशेचा ॥ १ ॥ या तव दर्शन
लाभें आतां । खासचि होइल आनंदाचा ॥ २ ॥

हें आसन आहे. यावर बसावं. (सर्व बसतात) मित्रा पहा.

साकी.

उदकें भिजल्या श्रवणीं डुलत्या या कदंब कुसुमानें ॥
अभिसिंचित स्तन राज्यपदीं जसा राजपुत्र सन्मानें ॥
भिजली ही अगदीं । दुसरीं वस्त्रें दे जलदी ॥ १ ॥

विदु०–बरं (उठूं लागतो.)

चेटी.–आर्या मैत्रेया तुम्हीं बसा. मींच आणतें. (जाते व घरांतून दुसरीं वस्त्रें आणून देते.)

विदु०–(एकीकडे तोंड करून) हे मित्रा, हिला कांहीं विचारावं असं माझ्या मनांत आलं आहे. विचारूं का ?

चारु.—बरं विचार.

वि०—(वसंतसेनेस) अग तूं अशा काळोखांत आणि पावसांत कशाकरितां इथं आलीस बरं?

चेटी.—बाईसाहेब, हा ब्राम्हण अगदीं भोळा दिसतो. मी याला उत्तर देतें.

वसंत.—अग हा पक्का शहाणा आहे असं म्हण.

चेटीः—अहो भटजीबोवा, ह्या त्या रत्नमालेचं मोल किती असं विचारावयास इच्छितात.

वि०—(एकीकडे वळून) मी चारुदत्ताला मघांच सांगितलं कीं, तिचे अलंकार बहूमूल्य आणि आपली रत्नावली अल्पमूल्य म्हणून ती संतुष्ट न होता दुसरं कांहीं मागावयास आली आहे.

चेटीः—असो, सांगतें ऐका. ती रत्नावली आपली असं समजून यांनीं (वसंतसेनेकडे बोट दाखवून) द्यूतांत हरविली. ती ज्यानं जिंकली, तो द्यूतकार राजाचा अपराधी. तो कुणीकडे गेला समजत नाहीं.

वि०—ही तर आमचीच कल्पना. ही उष्टी झाली.

चेटीः—त्याचा शोध लागे तोपर्यंत हे सुवर्णालंकार तुम्हांजवळ असूं द्या. (ते अलंकार दाखविते व विदूषक अलंकार पाहून विचार करितो. ती हांसून) कां! फारशी दृष्टी लावून पहातां? काय हे तुमच्या ओळखीचे आहेत?

वि०—कारागिराची कुशलता पाहून माझी दृष्टी वांकडे लागली आहे.

चेटीः—तर तुमच्या दृष्टीनं तुम्हांला चकविलं. अहो तुम्हांपाशीं ठेविले होते तेच हे अलंकार.

वि०—(हर्षानें) मित्रा, आपल्या घरांतून चोरानं नेलेले तेच हे सुवर्णालंकार.

चारुः—मित्रा खरंच कायरे? मग असं कसं झालं?

वि०—मित्रा तेच हे, मी शपथेवर सांगतों.

चारुः—मग ही तर मोठी आनंदाची गोष्ट झाली.

विं०–(एकीकडे वळून) बरं हे अलंकार तुम्हांला कुणीकडून मिळाले म्हणून मी विचारूं?

चारु०–काय चिंता आहे. विचार.

विं०–(चेटीच्या कानाजवळ तोंड नेऊन) औं हं हं?

चेटी–(विदूषकाच्या कानीं लागून) असं असं.

चारु०–असं कानांत कां कुजबुजतां; मी कोणी परकी आहें का? मला कळूं द्या काय तें.

विदू०–(चारुदत्ताच्या कानीं लागून) असं असं ही सांगते. विचार हवं तर.

चारु०–भद्रे, खरंच का तेच हे सुवर्णालंकार?

विदु०–मित्रा याविषयीं संशय नको, तेच हे.

चारु०–(चेटीला) भद्रे, मी कुणाचं प्रियकर वचन कधीं निष्फळ करीत नाहीं, यासाठीं ही आंगठी तुला बक्षीस घे. (बोटांतील आंगठी काढावयास पहातो पण बोटांत आंगठी नाहीं पाहून लज्जित होतो.)

वसंत०–(मनांत) यासाठींच तुमच्या संगतीची इच्छा करावी ती.

चारु०–(एकीकडे वळून खेदानें) काय दुःख हें!

पद–राग असावरी ताल त्रिवट.

निर्धन जो झाला। लोकीं। जीवित असुनी व्यर्थ तयाला ॥ धृ०
प्रतीकार ते व्यर्थचि ज्याचे। कोपानुग्रह येती न फला ॥ १ ॥

पद–दारिद्र्यें लज्जा येई० या चालीवर.

पक्षशून्य पक्षी जैसे, शुष्क वृक्ष तैसे पाही ॥
जलहीन होय जी सरसी, कोणी जवळी नच जाई ॥
दंतभग्न जाहल्या सर्पा, कोणीही भीतचि नाहीं ॥ चाल ॥
शून्य गृहासे निर्धन होती। निर्मल वापी जणुं गमती ॥

आस इष्ट वंचुनि त्यजिती ॥ चाल ॥ फलहीन तोष अवघेही ॥ १
धनहीन जगीं जो झाला, ऐशि दशा त्याची होई ॥ धृ० ॥

विदु०–मित्रा, असा संताप करूं नको. तुजकडे कांहीं अपराध नाहीं. (विनोदानें) अग ज्यांत हे दागिने होते, तो माझा पडदणीचा पंचा कुठं आहे.

बसंत०–आर्या, रत्नमालेनं या जनाची तुलना करणं हें आपल्याला योग्य का ?

चारु०–(आश्चर्यानें) वसंतसेने, असं न करावं तर कसं करावं?

विदु०–वसंतसेने तूं आज इथंच निजणार काय ?

चेटी–आर्या मैत्रेया, आपणाला इतकी रिकामी उठाठेव कशाला ?

वि०–मित्रा, सुखानं बसलेल्या जनांस उठवावयासाठींच काय पुनः मोठ्यानं हा पाऊस पडूं लागला पहा.

चारु०–खरंच मित्रों, पहा हा काय चमत्कार !

पद–राग मालकंस ताल त्रिवट.

सज्जन चित्तें निर्मल जैसीं । धारा विमला जलधर वर्षी ॥
॥ धृ० ॥ अर्जुनशरसम धारा गळती । पडतांना रव कर्कश करिती । हलधरपटसम बिंदू दिसती । इंद्रकोशिच्या मुक्ता टाकिती । जणुं घेउनियां वाटे मजसीं ॥ १ ॥

प्रिये वसंतसेने, हा चमत्कार पहा.

पद–राग शंकरा ख्याल, ताल धिमा तिताला.

नीलपयोदें नभ झांकियलें । शीत सुरभियुत वातें भरलें ॥ धृ० ॥ येउनि कांता कांता जैसी । आलिंगन सुख देते तैसी । धांवुनि चपला या मेघांसी । आलिंगन तें देतसे बळें ॥ १ ॥

(वसंतसेना अभिप्राय समजून शृंगारभावानें चारुदत्तास आलिंगते, व चारुदत्त तिला आलिंगून)

पद–काय परम० या चालीवर.

आज समय हा किति मौजेचा सुखवी बहु मजला ॥ धृ० ॥
कामाग्नीनें पीडित ऐशा माझ्या या तनुला ॥
तव प्रसादें स्पर्श सुखाचा लाभचि तो घडला ॥
आतां मेघा बहु गर्जावें भीत नसे मी कांहीं तुजला ॥ १ ॥

वि०–रे दुष्टा दुर्दिना, या समयीं असं करणं तुला रास्त नव्हे. मेघ गर्जनेनं आणि विद्युल्लतेच्या स्फुरणानं हिला भिवंवितोस काय ?

चारु०–मित्रा, दुर्दिनाची निंदा करूं नको. याचा मजवर आज उपकार आहे.

ठुंबरी–राग जिल्हा, ताल त्रिवट.

दुर्दिन बहु दिन राहो असला। जलधर वर्षो स्फुरोत चपला ॥ धृ० ॥ दुर्लभ सखिनें आलिंगुनियां। आजि चुंबिलें निजवदनें या ॥ तोष बहू तो होतो हृदया। वाटे मजला सुदिन उगवला ॥ १ ॥

पद–राग बिलावल, ताल त्रिवट.

भुवरि साचचि धन्य मनुज ते। भाग्य या परी पाहि जयातें ॥ धृ० ॥ गात्रें भिजलीं मेघ जलांनीं। कामिनि घेउनि गृहिं चालोनी। आलिंगन त्या देति जयातें ॥ १ ॥

(आकाशाकडे पाहून) अहाहा !

पद्—प्रिये पहा रात्रीचा० या चा०

प्रिये पहा हरि[1] धनुची काय तरी मौज ही महा ॥ धृ० ॥
वीज जीभ लांबवूनि । जलधर हनु खालवूनि ।
धनुष्यभुज उभारोनि । जृंभतसे नाकें[2] हा ॥ १ ॥

चला आंत जाऊं.

(सर्व जातात.)

अंक २ रा समाप्त.

---

१ इंद्र. २ आकाश.

अंक ३ रा.

प्रवेश १ ला.

(वसंतसेना शय्येवर निजली आहे, इतक्यांत तिची चेटी प्रवेश करिते.)

चेटी–काय, अजून आर्या वसंतसेना जागी होत नाहीं ? असो. आतां तिला उठवावं. (तिजकडे पाहून) बाईसाहेब उठाउठा, उजाडलं पहा.

वसंत०–(जागी होऊन) काय रात्र असतांच उजाडलं ह्मणतेस ?

चेटी–आह्मांसारख्यांना उजाडलं. आपल्यासारख्यांना रात्र आहे.

वसंत०–बरं पण आतां ते द्यूतकार कुठं आहेत ?

चेटी–श्रेष्ठ चारुदत्त, वसंतसेने करितां गाडी तयार कर असं वर्धमानकाली सांगून पुष्पकरंडक जीर्णोद्यानांत गेले. तिकडे आपल्याला जावयाचं.

वसंत०–(आनंदानें) अग,

पद–भूपती खरे ते० या चालीवर.

यामिनी कालची मत्सखिशी गे झाली ॥
सहवासि प्रियाच्या हर्षे सुखें ती गेली ॥
परि नसे तृप्ति ती नयनांची जाहाली ॥
ह्मणुनिया दर्शना उत्कंठा ती जडली ॥ चाल ॥
नीटसें त्यांसि पाहावें । एकदां ॥ सुजन
संगतीं राहावें । सर्वदा ॥ प्रीतिनें त्यांसि सेवावें ।
सर्वदा ॥ घ्यावया परी तें प्रिय दर्शन या वेळीं ॥
माझिया मानसीं आस असे ही ठेली ॥ १ ॥

अग चेटी ही रत्नमाला घेऊन धूताबाईनां नेऊन दे आणि असं सांग कीं मी आर्यांच्या गुणांवर आसक्त होऊन, त्यांची दासी झाली आहे म्हणून आपली ही आहे; याकरितां ही रत्नमाला आपल्या गळ्यांत घालावी.

चेटी–असं केल्यानं चारुदत्ताचा तुम्हांवर कोप होईल.

वसंत०–तूं जा. ते तसे कांहीं करणार नाहींत.

चेटी–जशी आपली आज्ञा. (जाते.)

(तदनंतर मुलास घेऊन रदनिका येते.)

रदनि०–बाळा ये. चल आपण गाडी घेऊन खेळूं.

बालक– (तोंड वेंगाळून) अग रदनिके.

पद–राग भैरवी, ताल त्रिवट.

लौकरि तशी मला आणुन दे ॥ सोन्याची छानशी
गाडी ॥ धृ० ॥ नको नकोगे मज मातीची ॥
गाडी सोन्याची आणुन दे ॥ १ ॥ सौंगडिसंगें
जाउनि खेळिन ॥ रदनिकेगे मी आनंदें ॥ २ ॥

रदनि०– **पद**–नंदगृहाच्या० या चालीवर.

सोन्याचें तें नांव संप्रती घेशीरे बाळा । कशाला ॥
॥ धृ० ॥ नसे मुळीं तें सांप्रत सदनीं ॥
भाग्य मिळे जंव ताता फिरुनी ॥ सुवर्ण गाडी
मग घेवोनी ॥ खेळे आनंदें ॥ सुशीलारे ॥ १ ॥

(आपल्याशीं) आतां याला कुणाकडे घेवन जावं? हं वसंतसेनेकडे याला न्यावं म्हणजे हा आपला हट्ट विसरेल.

वसंत०– (त्यांना पाहून) रदनिके आलीस. ये बैस अशी.

पद–दादरा. कहाके पथक० या चालीवर.

सुकुमार कुमार हा रदनिके कुणाचा ॥ धृ० ॥

अंगीं नसुनि अलंकार । गोजराग दिसे फार ॥
वदनचंद्र सुमनोहर ॥ तोषदा मनाचा ॥ १ ॥

रदनि०–आर्ये, हा चारुदत्ताचा मुलगा. याचें नांव रोहसेन.

वसंत०–(हात पुढें करून) ये बाळा मला मुका दे. (त्याला मांडीवर घेऊन) अग याचा तोंडवळा अगदीं तिकुडच्यासारखा दिसतो.

रदनि०–तोंडवळाचसा काय! पण स्वभाव दिखित अगदीं तसाच. सांप्रत आमच्या यजमानाचा आनंद व सुखस्थल काय तें हाच.

वसंत०–असं असं. अग पण हा रडतोग कां? बाळा तुला काय हवं ?

रदनि०–आर्ये,

पद–राग झिलांवरी ताल दादरा.

किति हट्टी तरी बालक हा सांगुं मी तुला ॥ थो-
राच्या मुलांसवें खेळुनी आला ॥ धृ० ॥ सोन्याची
गाडि तयें होति आणिली ॥ जातां तो घेउनियां
परत आपुली ॥ गाडी दे मज ह्मणून । बसला हा
हट्ट धरुन । मातीची दिली करुन । नलगे ही अशी
वाण । सोन्याची दे आणून । ह्मणुनि रडूं लागला ॥
गे ॥ देउं कुठुनि याजला ॥ तसी देउं० ॥ १ ॥

वसंत०–धिःकार असो या निर्धनतेला! दुसऱ्याची संपत्ति पाहून आपणास तशी नाहीं ह्मणून याला वाईट वाटतेना!

पद—भूपाळीच्या चालीवर.

कृतांत पुरुषा असा, होसी निष्ठुर तूं बा कसा ॥
॥ धृ० ॥ कमलपर्णि जलबिंदू जैसे । पुरुष भा-
ग्य तें चंचल तैसें ॥ तयांसवें क्रीडसी कसा ॥ १ ॥

(डोळ्यांत अश्रू आणून) माझ्या लाडक्या रडूं नको. तूंही सोन्याची गाडी घेऊन खेळशील बरं.

बालक—रदनिके ही ग कोण?

रदनि०—बाळा ही तुझी आई होते.

बालक—

पद—राग सोरट, ताल त्रिवठ.

असत्य कां वदसी। रदनिके तूं ॥ धृ० ॥
माता माझी जरि इज ह्मणसी। भूषण मंडित
झाली कैसी। कुसुमित मालति जैसी ॥ १ ॥

वसंत०—(पोटाशीं धरून)

पद—राग बीभास ताल त्रिवट.

काय असें बोलसी। बाळारे ॥ धृ० ॥ करुण श-
ब्द हे कोमल वदनें। बोलुनि हृदया भेदिसी ॥ १ ॥

(दागिने काढून साश्रू) ही पहा. आतां मी तुझी आई झालें ना! तर हे घे दागिने आणि सोन्याची गाडी करून खेळ बरं.

बालक–जा जा मी नाहीं घेणार, तूं रडतेस.

वसंत०–(डोळे पुसून) बाळा मी रडत नाहीं. जा खुशाल खेळ जा. (मातीच्या गाडीवर ते दागिने भरते. रदनिका मुलासह जाते. व वर्धमानक चेट गाडी घेऊन येतो.)

वर्धमा०–रदनिके, अग रदनिके, वसंतसेना बाईसाहेबांना बुरख्याची गाडी मागील दरवाजापाशीं तयार आहे ह्मणून सांग!

रदनिका–(प्रवेश करून) आर्ये वर्धमानक बुरख्याची गाडी मागील दारीं घेऊन आला आहे.

वसंत०–अग त्याला अंमळ थांब ह्मणून सांग. मी तों पर्यंत वेणी फणी करितें. (जातात.)

वर्धमा०–अरेरे, मी गाडींतली बैठक गाडीखान्यांत विसरलों, ती घेऊन येतों. गाडीचे बैल नवे आहेत. तेव्हां ते कदाचित् बुजतील म्हणून गाडीच घेऊन गेलं पाहिजे. (जातो)

इतक्यांत दुसरी गाडी घेऊन स्थावरक चेट येतो.

स्थावरक–आमच यजमानानीं पुष्पकरंडक जीर्णोद्यानामंदीं गाडी आनाया सांगितलीया. इचे मन चलानर जाऊं तकड. (पुढें पाहून) अर हत तर गांवच्या गाड्यांचा घुमाळा उसळून गेलाया. अन ह्मोर जावं तरा कसं ? ह येऊंयाकी ल्योकांना धमकी. अर ये गाड्या करा येका अंगाला. रावाला बिगुन जायाचं हाय न्हई का समजत ? (ऐकलेंसें करून) काय इचारतां, गाडी कुनाची, कुठ न्येतो? अर ही गाडी आमचं म्हाराजांच म्हेवन हैती त्येंची. त्येंना आनाया पुष्पकरंडक जीर्णोद्यानामंदीं न्हेतुया. म्हून व्हा व्हा बाजू अगुदर. (पुढें पाहून) रस्ता सोडा. हां लाजून पळाला हा कोन? कोनबी असना. आपुन कशापाई करा पंचाती. (ऐकिलेंसें करून) ह्या गाडीमंदी वझ ले है, बर तस का न्हैना. आपुन आआपली गाडी हत बागच्या फाटकापाशींच उभी करूंया. हा मी आलों न्हाम. (जातो)

रदनि०–आर्ये, चाकांचा शब्द थांबला. यावरून गाडी आलीसें वाटतें.

वसंत०–मलाही तेंच पाहिजे होतें. चल तर.

रदनि०–ही पहा गाडी. आंत बसा.

वसंत०–बर जा तूं आतां. मी गाडींत बसतें. (रदनिका जाते.) अरे हें काय ?

पद–राग मांड ताल दादरा.

दुर्निमित्य काय मला आजि होतसें ॥
सव्य नयन माझा हा केंवि लवतसे ॥
चारुदत्त दर्शन तें होइना मला ॥
याचें ज्णुं दुश्चिन्हांचें काय हें असें ॥ १ ॥

स्थाव०–(येऊन) रस्त्यांतल्या समद्या गाड्या तर एकीकड सारल्या.

चला तर आपली गाडी घेऊन. अर इचेमन आज गाडी जड कां येतीया? हं हं चाकोरी मारली म्हून दम लागलाया. त्ये पायीं असं व्हत असल, बरं बेगी बेगी आपनास जायाला व्हव. चला तर, ह्या ह्या बाळ्या बाळ्या. पोळ्या. हैक.

पडद्यांत " अरे द्वारपालकांनो, आपापल्या चौकीच्या पहाऱ्यावर सावध असा. बंदिखान्यांत घातलेला गवळ्याचा पोर बंदीखाना फोडून पहारेकऱ्यांस मारून बिर्डी तोडून पळून जात आहे. त्याला धरा धरा. " (इतक्यांत पायांत बेडी व तोंडावर बुरखा असलेला आर्यक प्रवेश करितो.)

आर्यक—(दुःखानें) काय हा विलक्षण प्रसंग तरी! मजविषयींच्या सिद्धाच्या भाकिताचें भय मनांत धरून पालक राजानें मला गवाळ वाड्यापासून धरून आणून कैद केलं होतं. पण सुदैवानं माझा प्रियमित्र शर्विलक यानं मला सोडविलं (साश्रु) दैवगती कांहीं विचित्र आहे. असो. प्राक्तनीं लिहिलेलं कधीं चुकावयाचं नाहीं. बरं आतां मी कुणीकडे जावं? माझं रक्षण कोण करील? (इकडे तिकडे पाहून) हा कोणा साधु पुरुषाचा जुना वाडा उघडाच दिसतो, तर इथं लपून बसावं. (आंत जातो इतक्यांत " ह्या ह्या बाळ्या बाळ्या " ह्मणत वर्धमानक गाडी घेऊन येतो ती पाहून) अरे ही कुणाची गाडी इकडेसच येत आहे. वाहवा! सुदैवानं ही रिकामी आहे.

वर्धमा०—मी बैठक तर आणिली. अग रदनिके, वसंतसेनेला दाराशीं गाडी उभी आहे, तींत बसून पुष्पकरंडक जिर्णोद्यानांत चलावं ह्मणून कळीव.

आर्यकः—(ऐकून) ही गाडी गणिकेची असून बाहेर जाणारी दिसते. बरंच झालं. याच गाडींत बसून जावं म्हणजे झालं. (असें म्हणून गाडीजवळ जातो.)

वर्धमा०–(कानोसा देऊन) पैंजण वाजले. वसंतसेना गाडींत बसावयास आली वाटतं. आर्ये, बैल दुष्ट आहेत. यासाठीं मागच्य आंगानं गाडींत बैस. (आर्यक बसतो. तीच बसली असें समजून गाडी घेऊन जातो.)

(इतक्यांत वीरक व चंदनक येतात.)

वीरकः–(चंदनकास) अरे राजाचं हृदय आणि कारागृह ही दोन्हीं बरोबरच आहेत, यासाठीं फार हुशारीनं काम केलं पाहिजे.

चंदन०–अरे वीरका, बंदिखान्यांतून बंधन तोडून आर्यकाला नेतात काय? अरे हा चंदनक जीवंत असतां त्याला कोण पळवितो पहातो. (वर्धमानक गाडी घेऊन येतो. ती पाहून वीरकास) अरे ही झांकलेल्या बुरख्याची गाडी कुणाची? कुणीकडे जाते याचं चौकशी कर?

वीरकः–(गाडीजवळ जाऊन) अरे गाडीवाल्या गाडी उभी कर. ही गाडी कुणाची, जाते कुठं व आंत कोण आहे हें सांग लवकर.

वर्धमा०–(गाडी उभी करून) ही गाडी श्रेष्ठ चारुदत्ताची. यांत आर्या वसंतसेना बसून क्रीडार्थ पुष्पकरंडक जीर्णोद्यानांत त्याजकडे जात आहे. (वीरक चंदनकाला येऊन तसें सांगतो.)

चंदन०–(तें ऐकून) काय चारुदत्ताची तर मग जाऊंदे. जारे जा.

वीरकः–पाहिल्यावांचून जाऊं दे म्हणतोस हें रे काय? मी पाहिल्य वांचून कधीं जाऊं देणार नाहीं. राजकार्मी मी बापास बाप म्हणणार नाहीं; मग चारुदत्त कोण व वसंतसेना कोण?

चंदन०–अरे तूं राजाचा विश्वासू सेनापति आहेस तेव्हां तूंच जाऊन पहा. हे मी बैल धरले.

वीरकः–तूंही राज्याचा विश्वासू चाकर आहेस तेव्हां तूं पाहिलंस तरी चालेल. मीच बैल धरतों.

चंदन०–बरं. अरे गाडीवाल्या गाडीचा धूर वर उचलून धर.

आर्यकः–(आपल्याशीं) आतां कसं करावं? असो होईल तसं होवो ईश्वरावर भरंवसा ठेवावा.

चंदनकः–(आंत पाहून आश्चर्यानें) अरे हा आर्यक!

आर्यकः–(दीनपणें) आर्या, मी तुला शरण आहें.

चंदनकः–शरणागतास अभय असो. (आर्यकास पाहून व चपापून आपल्याशीं) एक तर हा निरपराधी, शरणागत, चारुदत्ताच्या गाडींत बसलेला आणि माझा प्राणदाता शर्विलक त्याचा स्नेही, तेव्हां कसं करावं? एकीकडे आड व दुसरीकडे विहीर. अस्तु. यास अभय दिलं हेंच खरं. (वीरकाकडे येऊन) पाहिला मी आर्य– (असें अर्धेच बोलून) पाहिली मी आर्या वसंतसेना. ती ह्मणते मी स्वखुषीनं चारुदत्ताकडे जात असतां असा अटकाव होणं चांगलं नव्हे.

वीरकः–अरे चंदनका इथंच मला मोठा संशय येतो.

चंदनकः–यांत संशयरे कसला?

वीरकः–तूं प्रथम ह्मणालास कीं, "पाहिला मी आर्य" मग ह्मणतोस, "आर्या वसंतसेना" इथं माझी खात्री होत नाहीं.

चंदनकः–तुझी खात्री होत नाहीं, त्याला मी काय करूं. अरे आह्मी दक्षणी मनुष्यं. भाषा बरोबर येत नाहीं. तुझ्यासारखं व्याकरणाचं ज्ञान मला कुठं आहे. पाहिला काय आणि पाहिली काय सारखंच. इथं शब्दविचार लिंगविचार कशाला पाहिजे.

वीरकः–असो. तूं पाहिलंसच. आतां मीही एकदां पहातों.

चंदनकः–काय मी अविश्वासू झालों? (आपल्याशीं) असं काय? तर इथं कर्नाटकीच कावा लढविला पाहिजे. (उघड) मी पाहिल्यावर तूं आणखीं पहाणाररे कोण?

वीरकः–तूं तरी असा कोणरे? गाडीवाल्या गाडी फिरीव (वीरक चढूं पहातो, त्यास चंदनक खालीं पाडून लाथांनीं तुडवितो. तो रागानें)

मी राजाज्ञे प्रमाणें काम करीत असतां मला लातांनीं तुडविलेंसना? या साठीं राजाकडून तुझे हातपाय न तोडवीन तर नांवाचा वीरक नव्हे. (निघून जातो.)

चंदनकः—अरे जारे, जा. अशा कुत्र्याच्या भुंकण्याला कोण भितो! (चहूंकडे पाहून) गाडीवाल्या गाडी हांक. हां पहातोस काय? चल. कुणी विचारल्यास चंदनक आणि वीरक यांणीं तपासली आहे म्हणून सांग. (आर्यकास) आर्ये वसंतसेने, ही मी कांहीं खूण देतों. (तरवार देतो.) मला विसरूं नको हं.

आर्यक—ध्यानांत कसं न ठेवीन. सिद्धाच्या भाकिताप्रमाणं गोष्ट तर होऊं दे.

चंदनक—सकल देवता तुझं रक्षण करोत आणि तुझ्या हातून तुझ्या शत्रूचा नाश होवो. (गाडीवाल्यास) हां गाडी हांक. (वर्धमानक जातो) असो. वीरक राजप्रांतांतील सेनापती आहे. त्याशीं मी तंटा केला, तेव्हां राजवाड्यांत जाणं धोक्याचं आहे. म्हणून हा आतां शर्विलक येत आहे, त्याच्या बरोबर बरच्या मंडळीस घेऊन निघून जावं. (निघून जाते.)

प्रवेश २ रा.

चारुदत्त व मैत्रेय येतात.

विदू०—या जीर्णोद्यानाची किती तरी ही शोभा

चारु०—खरोखर ही शोभा अवर्णनीय सुंदर आहे, मला तर असं वाटतं.

पद—राग वसंत ताल त्रिवट.

वणिजा परि हे तरुवर असती । विक्रेय वस्तु पुष्पें दिसतीं ॥ धृ० ॥ कर तो घ्यावा या बाजारीं । राजदूत हे मधुकर फिरती ॥ १ ॥

बरं मित्रा, वर्धमानकास इतका उशीर कां लागला ?

वि०– मी त्याला लवकर ये ह्मणून बजावलं होतं मग इतका उशीर कां केला नकळे !

चारु०–इतकं सांगितल्यावर ह्मटलं असतां उशीर लावूं नये.

(इतक्यांत आर्यक बसलेली गाडी घेऊन वर्धमानक येतो.)

आर्यकः–(आपल्याशीं) नगरापासून तर दूर आलों. आतां कसं करावं ? (विचार केलासें करून) दुसरं काय करायचं? स्वजनाचा पालक, शरणागताचा रक्षक चारुदत्त त्यालाच आपण भेटावं हें बरं.

वर्धमा०–आर्या मैत्रेया, दरवाजा उघड गाडी आली.

वि०–मित्रा, वर्धमानक हाका मारितो. त्यावरून वसंतसेना आली असावी.

चारु०–फार चांगलं झालं. जा जा लवकर. दरवाजा उघड.

वि०–(वर्धमानकास) कां रे इडलेंका ? इतका उशीर कां ?

वर्धमा०:–मैत्रेया, असा रागाऊं नको. गाडींतली बैठक गाडीखान्यांत विसरलों होतों, ती जाऊन घेऊन आलों ह्मणून उशीर लागला.

चारु०:–वर्धमानका गाडी फिरीव, मैत्रेया वसंतसेनेला उतरीव.

मैत्रेय०:–कां तिचे पाय बिडीनं बांधले आहेत वाटतं. ह्मणून तिला स्वतःला उतरायला येत नाहीं. (आंत पाहून) अरे मित्रा, ही वसंतसेना नव्हे. अबब हा वसंतसेन !

चारु०–मित्रा, अशी थट्टा काय करितोस ? थांब थांब, मीच तिला उतरवितों. (गाडींत पाहून आश्चर्यानें) अरे असा हा कोण ? कोणरे बाबा तूं ?

आर्यक–मी आर्यक नामक गोपाळदारक तुला शरण आहें.

चारु०–शरणागतास अभय असो. कांहीं चिंता नाहीं. दैवयोगानं तुझी माझी गांठ पडली आहे. तूं भिऊं नको स्वस्थ ऐस.

आर्यक–(हर्षानें) आर्या, तुझं कल्याण असो.

चारु०–अरे, वर्धमानका, याच्या पायांतली बिडी काढ अगोदर.
(तो तसें करितो.)

आर्यक–लोखंडाची बिडी निघाली पण स्नेहाची दृढतर बिडी पडली.

वि०–याच्या पायांतली निघाली; पण ती आमच्या पायांत पडते की काय नकळे !

चारु०–शिवशिव मित्रा, असं अभद्र काय बोलतोस हें ?

आर्यक–आर्या स्नेहामुळें मी तुझ्या गाडींत बसलों त्याची क्षमा कर.

चारु०–छे छे असं ह्मणूं नको. तूं होऊन मजशीं स्नेह केला त्यानं मी सुखी झालों. आतां तुझे पाय अवघडले आहेत, याकरितां याच गाडींत बसून घरीं जा. पालक राजाचा बंदोबस्त फार आहे. आणि त्याचे दूत सर्वत्र फिरत आहेत, तेव्हां तूं लवकर जा. वर्धमानका याला याच्या घरीं नेऊन पोंचीव लौकर.

आर्यक–तुझं पुन्हां दर्शन होवो.

चारु०–ईश्वर करो. (आर्यक व वर्धमानक जातात.) मित्रा, आपल्या हातून राजाचा अपराध घडला आहे तर बसून उपयोग नाहीं. या बिड्या नेऊन विहिरींत टाक. न जाणो. हें राजास कळलं तर आपल्याला घोर शासन होईल. (डावा डोळा लवलासें करून) काय?

साकी.

कांतेचें त्या न घडे दर्शन वामाक्षी फुरफुरतें ॥
कारण नसतां कैसें माझें चित्तचि बहु हुरहुरतें ॥
दर्शन भिक्षूचें ॥ होई अशिव त्यांत ऐसें ॥ १ ॥

चल जाऊं दुसऱ्या वाटेनं. (जातात.)

प्रवेश ३ रा.

(तदनंतर ओली छाटी हातांत घेऊन भिक्षु येतो.)

भिक्षु–अज्ञ जन हो समजा बरं.

पद राम स्मरावा राम० या चा०

धर्म जगीं धनधाम । खरोखर ॥
इंद्रिय तस्कर टपले धरुनी । चौर्य हेतु प्रकाम ॥ खरोखर ॥
अवन कराया जागृत राहा । ध्यान करित तें नाम ॥ सदोदित ॥

पद–केरवा० या चालीवर.

इंद्रियगण मीपण जिंकी । ममता कल्या मारुनि टाकी । सत्वर मनुजारे ॥ धृ० ॥ मत्सर मदादि षडरी जिंकुनी शरिरा जो रक्षी । मनुज परी तो साधन करितो अवश्य सुख नाकीं ॥ १ ॥

पद–राग जोगी ताल त्रिवट.

शिरोमुंडका मुंड मुंडिलें । चित्त परी तूं नाहिं मुंडिलें ॥ धृ० ॥ तो साधु जयें स्वमन मुंडिलें । मुंडुनि मुंडा जरि न मुंडिलें ॥ १ ॥

आतां ही भगवी छाटी राजशालक संस्थानकाच्या उद्यानांतील पुष्करणींत धुवून झळझळू पुढं जावं (तसें करतो.) (इतक्यांत पडद्यांत " कोण आहेरे तो! अरे दुष्टा गोशवाच्या थांब, उभा रहा")

भिक्षु:–(भिऊन) अरेरे! हा राजशालक संस्थानक आला. आतां काय करावं? पूर्वीं एका भिक्षुनें ह्याचा अपराध केला होता म्हणून कोणताही भिक्षु जिथं सांपडेल, तिथं त्याला धरून नाकांत वेसण

घालून हिंडवितो. मी तर निराश्रित, कुणाच्या शरण जाऊं? आतां बुद्धच माझं रक्षण करो.

(इतक्यांत हातांत तरवार घेऊन विटासह शकार येतो.)

शकारः–अरे दुष्ट, गोशावड्या, थांब उभा रहा. मद्यपानशमयीं तांबड्या मुळ्याचा तुकडा जशा तोडून खातात, त्याप्रमाणं तुझं डोकं तोडून टाकतों पहा. (त्याला मारतो.)

वीटः–अरे काणेलीपुत्रा, प्रपंचाला त्रासून ज्यानं भगवीं वस्त्रं धारण केलीं, त्याला मारणं योग्य नव्हे. अरे,

पद. राग कालंगडा ताल त्रिवट ठुंबरी.

पहा किती हें उपवन सुंदर । नंदनवनसम भारी सुखकर ॥ धृ० ॥ अनाथा तरु शरणप्रद हे । असुखिता जसे सुखहेतु पितर ॥ १ ॥ नगर सोडुनी वनीं रहाती । उपकारी याजनीं खरोखर ॥ २ ॥

भिक्षुः–हे उपासका, तुझं स्वागत असो. मजवर कृपा कर.

शकारः–अरे विटा, पहा हा गोशावडा माझी निंदा करतो.

वीटः–तो काय म्हणतो?

शकारः–मला उपाशक म्हणतो. तर मी काय हजाम आहे?

वीटः–तू उपासक आहेस, अशी तो तुझी स्तुति करितो. ही निंदा नव्हे.

शकारः–ऐकरे श्रवणका..

भिक्षुः–तूं धन्य आहेस, तूं पुण्य आहेस.

शकारः–अरे विटा, पाहिलंश हें? तूं धन्य, तूं पुण्य असं मला हा म्हणतो. तर मी काय श्रावक आहें किंवा कोष्टी आहेंरे?

वीटः–अरे काणेलीपुत्रा, तूं धन्य आहेस, तूं पुण्य आहेस अशी तो तुझी स्तुति करितो. ही निंदा नव्हे.

शकारः–विटा, बरं पण हा इथं कशाकरे आला?

भिक्षु:–आपला छाटी पुण्याकरितां आलों.

शकार:–अरे दुष्टा श्रमणका, शर्व उद्यानांत श्रेष्ठ असं हें पुष्पकरंडक नामक जीर्णोद्यान माझ्या बहिर्णीच्या नवऱ्यानं मला दिलं. इथं कोल्हीं कुतरीं येऊन पाणी पितात. मी प्रबळ पुरुष वरमनुष्य असूनही जींत स्नान करीत नाहीं. त्या पुष्करणींत जुन्या कुळथाच्या काढ्यांत कुजकळलेल्या शारखीं ओंगळ दुर्गंधी अशीं हीं मगवीं लुगडीं धूतोश काय? तर तुला आणखी बडवितों पहा. (त्यास मारतो.)

वीट:–अरे काणेलीपुत्रा, मला वाटतं हा थोड्या दिवसांचा संन्यासी आहे. कारण,

दिंडी.

> केंस विरहें जहाले गौर डोई।
> स्कंधिं ग्रंथी नच वसन टिकत नाहीं।
> वस्त्ररचना नच कळे अझुनि कांहीं।
> सैल यास्तव तें स्कंधिं पहा होई॥ १॥

भिक्षु:–उपासका, मी खराच थोड्या दिवसांचा संन्यासी आहे.

शकार:–तूं जन्मल्यापासूनच शंन्याशी कां झाला नाहींस? (त्याला मारतो.)

भिक्षु:–(मार सोसून) नमो बुद्धाय.

वीट:–अरे ह्या बिचाऱ्या गरिबाला, मारून काय फळ? सोड जाऊं दे त्याला.

शकार–अरे, मी कांहीं विचार करतों तोंपर्यंत उभा रहा.

वीट–कोणाबरोबर विचार?

शकार–आपल्या हृदयाबरोबर.

वीट–अरे हा अजून गेला नाहीं!

शकार–(आपल्याशीं) हे पुत्रका हृदया, ह्या शंन्याशानं जावं कीं, रहावं? किंवा जाऊंनये कीं राहूंनये? (उघड) हं मी हृदयाबरोबर विचार केला. माझं शहाणं हृदय मला असं म्हणतं.

वीट—काय ह्मणतं तुझं शहाणं हृदय?

शाकार—तें ह्मणतं ध्यानं जाऊंनये, राहूंनये, उश्वाश टाकूंनये, निश्वास टाकूंनये. इथेंच कुजत पडून लवकर मरावं.

भिक्षु—बुद्धाला नमस्कार असो. मी शरणांगत आहें.

वीट—जाऊंदेरे त्याला.

शाकार—जावयाचं तर कांहीं शंकेतानं जावं.

वीट—संकेत तो कोणता?

शाकार—शंकेत हाच कीं, ध्यानं पाण्यांत चिखल टाकावा; परंतु पाणी गढूळ होऊंनये. किंवा पाण्याचा ढीग करून त्यावर चिखलाचा गोळा ठेवावा.

वीट—काय मूर्खपणा हा!

साकी.

दुश्चरिताश्रय चालते असे, पाषाण पुत्र साचे ॥
नर नखरे हे करिती ऐसे वृक्षचि कीं मांसाचे ॥
येउनि जन्माला ॥ झाले भारभूत महिला ॥ १ ॥

(भिक्षु शाप देत निघून जातो.)

अरे काणेलीपुत्रा ही उपवन शोभा पहा.

पद—राग पूर्वी ताल त्रिवट.

पुष्पफळानें शोभित तरु हे । रसयुत वल्ली वेष्टित
पाहे ॥ धृ० ॥ राजदूत ते रक्षिति यातें ॥
युवयुवतीसम भोगिती सुख हें ॥ १ ॥

शाकार—तूं चांगलें बोललाश. हे पहा,

श्लोक.

तरु तळीं पडलीं कुशुमें अहा ।
तरुहि पुष्पभरें लवले महा ।

शकार–बरं तर या पडक्या भिंतीवरून गाडी आंत आण.

चेट–असं कसं व्हईल सरकार, बैल मरतील, गाडी मोडल, नी मीबी मरन कीं ?

शकार–अरे मी राजाचा मेव्हणा आहे. मला काय, बैल मेले तर दुसरे विकत घेईन. गाडी मोडली तर दुसरी करवीन आणि तूं मेलाश तर तुझा बाप दुसरा गाडीवान ठेवीन.

चेट–तुमचं मातुर खरं आहे सरकार. पन माझ्या जिवास मी मुकन ना ?

शकार–कांहीं चिंता नाहीं. शर्वांचा नाश झाला तरी होऊंदे; पण मोडक्या भिंताडावरूनच गाडी आण.

चेट–जी महाराज, हा निघालों बगा. (गाडीसह सुखरूप येतो) इचे भन, बैल मेले न्हायींत, गाडी मोडली न्हाई नि माज्याबी जिवास धोका न्हाई ! लईच चमत्कार झो.

शकार–कायरे गंडलेका, बैल मेले नाहींत गाडी मोडली नाहीं, आणि तूंही मेला नाहींसरे ?

चेट–आपल्या पुन्याईचा परताप ह्यो सारा.

शकार–चला आपण गाडींत जाऊंन बशूं. विटा, तूं माझा शिक्षक आणि गुरु आहेश म्हणून तुला अगोदर मान दिला पाहिजे. याशाठीं तूंच अगोदर गाडीवर चढ.

वीट–बरं कां होईना. (चढावयास जातो.)

शकार–रे, थांब थांब. ही गाडी काय तूं केलीश म्हणून तूं अगोदर बशतोश ? गाडी माझी आहे, तेव्हां मींच अगोदर बशणार. तूं हो बाजूला.

वीट–आपणच मला सांगितलं आणि आतां असं म्हणतां ?

शकार–अरे मी जरी तशं बोललों तरी महाराज आपण अगोदर बशावे अशं तूं म्हणावंश कीं नाहीं. अशं म्हणण्याचा तुझा धर्म आहे.

वीट–बरं आपण अगोदर बसावं मग मी बसेन.

शकार–हा मीच आतां बशतों पहा. पुन्हा स्थावरका चेटा गाडी फिरीव.

चेट–जी सरकार.

शकार–(गाडीवर पाहून चढून भ्याल्यासारखें करून लवकर खालीं उतरतो आणि विटाच्या गळयास मिठी घालून) अरे विटा, मी मेलों. गाडींत कोणीं राक्षशी बशली आहे किंवा कोणी चोर बशला आहे खाचित. राक्षशी अशली तर आह्मां दोघांश चोरून नेईल. आणि चोर अशला तर आपणाश खाऊन टाकील.

वीट–मित्रा भिऊं नको. या बैलाच्या गाडींत राक्षशी कशाला येऊन बसेल? दुपारच्या उन्हानं तुझी दृष्टी दिपली आहे. आणि आंग-रखा घातलेल्या स्थावरक चेटाची सांवला आंत पडली आहे. ती पाहून तुला भ्रांति उत्पन्न झाली. दुसरं कांहीं नाहीं.

शकार–पुत्रका स्थावरका चेटा जिवंत आहेशना बाबा?

चेट–व्हय सरकार.

शकार–गड्या विटा. गाडींत कोणी तरी स्त्री बशली आहे तूं पहा जा.

वीट–काय स्त्री बसली आहे? तर मग चला आपण तिला मस्तक नम्र करून जाऊन पाहूं.

वसंत०–(विस्मय पावून मनांत) काय माझ्या नेत्राला ताप देणारा हा राजशालक प्राप्त झाला! आतां माझं जीवित राहतं कीं नाहीं कोण जाणे. उखर भूमीवर बीजमुष्टी टाकावी तद्वत मज मंद-भागिनीचं इथं निष्फळ येणं झालं. आतां कसं करावं?

शकार–हा वृद्ध चेट भ्याला आहे. ह्मणून विटा गाडींत कोण आहे तें तूंच पहा जा.

वीट–काय चिंता आहे. मी जाऊन पहातों.

शकार–काय इथं कोल्हे रडूं लागले. कावळे धावूं लागले तर जों पर्यंत ह्या विटाश ते दातांनीं पहातील आणि डोळ्यांनीं खातील तों पर्यंत आपण येथून पळून जावं हें बरं.

वीट–(गाडींत वसंतसेनेला पाहून खिन्न होऊन) अरेरे फार वाईट गोष्ट झाली! काय?

पद–राग बिहू, ताल धुमाळी.

वसंतसेना हरिणी कशिही या व्याघ्रा अनुसरली ॥
नवलाचे याचें वाटे मजला गोष्ट कशीही झाली ॥

शरच्चंद्र शुचि जो मृदु पुलिनीं आनंदें करि केली ॥
हंसा त्यजुनी हंसि कशी ही काका जवळी आली ॥१॥

(उघड) वसंतसेने हें तुला योग्य नव्हे.

पद–राग भैरवी, ताल त्रिवट.

नेतां तुजला आर्जव करुनी । वंचिलें तया हट्ट धरोनी ॥ ध्रु० ॥ ऐकुनि जननी उपदेशातें । मानसिं धरुनी वित्ताशेतें ॥ सेवाया तूं आलिस यातें ॥ वेश्यपणासी जणुं अनुसरुनी ॥ १ ॥

मी तुला पूर्वीं सांगितलेलं आठवत असेलच.

वसंत०–नाहीं नाहीं मी त्यावर अनुरक्त होऊन आलें असं नाहीं. गाडींची अदलाबदल झाल्यामुळं मी चुकून इकडे आलें. तर आतां मी शरणागत आहें. तूं माझं रक्षण कर.

वीट–भिऊं नको, स्वस्थ ऐस. (मनांत) असो, मी याला ठकवितों. (शकाराजवळ जाऊन) अरे काणेली पुत्रा खरंचरे खरं या गाडींत कुणी राक्षसी बसली आहे.

शकार–अरे राक्षशी आहे ह्मणतोश तर तिनं तुला कशं चोरलं नाहीं? अथवा चोर अशला तर त्यानं तुला कशं खाल्लं नाहीं?

वीट–अशी भलतीच कल्पना कशाला करतोस. चल आपण बागाबागांतून दाट झाडांच्या सावली मधून पायांनीं चालत उज्जयनी नगरांत जाऊं.

शकार–अशं केल्यानं काय होईल?

वीट–असं केल्यानं आपणास व्यायाम होऊन बैलांस विसावा सांपडेल.

शकार–बरं तशं कां होईना. स्थावरक चेटा गाडी घेऊन जा. आह्मी पायांनीं चालत येतों. देवा ब्राह्मणांपुढं पायांनीं चालावं अशं आहे. पण नाहीं नाहीं थांब गाडींतच बशून गेलं पाहिजे. मी गाडींत अशलों ह्मणजे दुरून लोक मला पाहतील आणि ह्मणतील कीं, हा राजाचा मेव्हणा शंश्थानक थोर मनुष्य चालला आहे.

चीट-(मनांत) आतां कोणता उपाय करावा? विषाचं औषध करणं कठिण आहे. असो आतां काय होईल तें होवो. सांगावं हेंच बरं (उघड) अरे काणेली पुत्रा, राक्षसी गाडींत आहे, असं मी थट्टेनं बोललों; परंतु वसंतसेना तुझ्याशीं रमण्यासाठीं आली आहे.

वसंत०-(तें ऐकून) शिव शिव! काय हें भलतंच बोलला हा.

शकार-(हर्ष पावून) काय मी प्रबळ पुरुष वर मनुष्य वाशुदेव शमजून मजकडे आली!

चीट-होय यांत काय संशय.

शकार-वाहवा, तर मग ही अपूर्व श्री मला प्राप्त झाली. त्या वेळेश मीं हिला कोप आणिला होता. पण आतां पायां पडून हिला शुप्रशन्न करीन.

चीट-चांगलं बोललास. तसंच करावं.

शकार-हा मी पायां पडतों पहा. (वसंतसेनेजवळ जाऊन) हे अंबिके देवी, हे शुंदरी विशालनेत्रे मी नम्र होऊन तुझ्या पायांवर मश्तक ठेवितों. तर पूर्वीच्या अपराधाची क्षमा करून माझी इच्छा पूर्ण कर.

वसंत०-(रागानें) दूरहो मूर्खा, (त्याला पायांनीं लोटते.)

शकार-(रागानें) कायगे दांडगे, मला लाथा मारतेश?

श्लोक.

जें अंबांनीं प्रीतिनें चुंबियेलें ॥
देवांलाही जें नशें नम्र झालें ॥
तें पायांनीं ताडिलें उत्तमांग ॥
जैसें रानीं दुशृंगालें मृगांग ॥ १ ॥

अरे श्थावरका चेटा हीं तुला कुठेरे शांपडली?

चेट-महाराज रस्त्यामंदी वज्याच्या गाड्याची कशी धुमाकुळ उडून गेली व्हती तवा त्यो सावकार पुतर चारुदत्त त्येच्या बागेच्या फाटकाशी जरा गाडी उभी केली नि मंग दुसऱ्या गाडीस चाकोरी दिली. इतक्या मंदी ही बाई गाडी मंदी बसूनशेन हिकडं आलीसी दिसते. गाडीच्या अदलाबदलीन असं झाल असल.

शकार–तर काय गाडीची अदलाबदल झाल्यामुळं ही इकडे आली? माझ्याशीं रमण्याकरितां आली नाहीं? तर अग ए गर्भ दाशी, उतर माझ्या गाडींतून. तूं त्या दरिद्री शावकाराच्या पोराला अनुसरणार आणि माझ्या गाडींत बशून माझे बैल खराब करणार, हें पाहिजे कशाला? चल उतर, खालीं उतर.

वसंत०–(आपणाशीं) आर्या चारुदत्ताला अनुसरणार, हे याचे शब्द कानाला फार गोड लागले. आतां पुढं काय होईल तें होवो.

शकार–लौकर उतर नाहींतर पहा. वेणी धरून खालीं ओढीन. (जवळ जातो.)

वीट–छे, छे, हें काय?

पद–राग भैरवी, ताल त्रिवट.

काय असें करसी ॥ मित्रारे ॥ धृ ॥ नच ओढावें
गुणवंतेच्या कधिंही केंशांसीं ॥ १ ॥ नच तोडावें
उपवन लतेच्या। कदा पल्लवासीं ॥ २ ॥

(जवळ जाऊन) वसंतसेने खालीं उतर.

वसंत०–(गाडींतून खालीं उतरून एकीकडे उभी रहाते.) आतां काय गती होईल कोण जाणे.

शकार–(मनांत) मागं हिनं माझ्या वचनाचा अवमान केल्यामुळं जो कोपाग्नी धुमसत होता तो आज हिच्या पादप्रहारानं पेटला आहे तर हिलाच्या वेळेश ठार मारल्यावांचून तो अग्नी शांत होणार नाहीं. याशाठीं हिला मारून टाकतो. (उघड) अरे विटा.

श्लोक

जरी इच्छिशी लांब आणी विशाला ॥
गुलेनार बारीक ऐशी दुशाला ॥
जरी पाहिजे मांशही खावयाला ॥
कुचू कुचु कुचू कुचु चावयाला ॥ १ ॥

वीट-मग पुढं काय म्हणतोस ?

शकार-विटा, माझं प्रिय कर.

वीट-तुझं प्रिय खचीत करीन; पण तें अकार्य नसलं तर.

शकार-अरे ह्यांत अकार्याचा लेशही नाहीं आणि राक्षशीचंही भय नाहीं. ह्या वसंतसेनेला मारून टाक.

वीट-(कानावर हात ठेवून) शिव शिव !

पद राग लीलांबरी, ताल धुमाळी.

स्त्री जाती ही केवळ बाला नगरविभूषा खाशी ॥
वेश्या असुनी मर्यादेनें सत्कुलयोषा जैसी । धृ० । अप-
राधाचा लेशहि नसतां वधिन जरी मी इजसी ॥
परलोकनदी पार जावया नाव कोणती मजसी ॥ १ ॥

शकार-मी तुला उडूप देईन. एकीकडे ह्या बागेंत एकांतीं हिला मारलं तर तुला कोण पहावयाश आला आहे ?

वीट-कोणी मनुष्य पहाणार नसला तरी;

दिंडी.

दिशा दाही देवता चंद्र सूर्य ।
सतत पाहाती कळे न हें काय ॥
धर्म आत्माही गगन पवन साक्षी ॥
सुकृत दुष्कृतितें मही तसी लक्षी ॥ १ ॥

शकार-तर मग हिच्यावर वस्त्रांचं झांकण घालून आड करून मार.

वीट-अहारे मूर्खा, तूं केवळ नष्ट आहेस.

शकार-(आपणाशीं) हा म्हातारडा कोल्हा अधर्मभिरू आहे. आतां मी स्थावरक चेटाला अनुकूल करून घेतों. (उघड) अरे स्थावरका, चेटा, पुत्रका, तुला सोन्याचीं कडीं देईन.

चेट-तीं मी हातामंदी घालीन.

शकार–तुझी बैठक किनखापाची करीन.

चेट–मंग मी त्येचेवर बसन.

शकार–तुला शर्व चेटांचा नाईक करीन.

चेट–मी त्येंचा धनी होईन.

शकार–तर मी शांगतों तें ऐक.

चेट–वंगाळ कामाशिवाय सांगाल त्यें सारवी ऐकन.

शकार–अरे अकार्याचा लेशही नाहीं.

चेट–तर मंग चिंता न्हायीं.

शकार–दुशरं कांहीं नाहीं. ह्या वशंतशेनेला मारून टाक.

चेट-शिव शिव शिव ! असं वंगाळ काम करनं नगं. मेल्यो तरी बेहत्तर.

शकार–अरे चेटा, अशं काय ह्मणतोश, तुझ्यावर देखील माझी शत्ता नाहीं काय ?

चेट—आपला सत्ता माज्या शरिरावर हाये, पन माज्या मनावर न्हायीं. म्हून हें काम मला सागूं नगा.

शकार–अरे चेटा, तूं माझा शेवक अशून भितोश कोणाला ? अरे, ऐकत नाहींश ना ? तिला मारीत नाहींश ना ? शंभाळ तर आतां (त्याला लाथा बुक्यांनीं मारतो.)

चेट–महाराज, तुम्हीं मला हाणा मारा व्हव तें करा. हें काम करायचा न्हायीं. आपल्या जन्माच्या पापानच अगुदर मी गर्भदास झालों हाये तेवढ पुर. नग नगर बा जास्ती पाप, अगुदरचं पाप न्हायींस हाया मला वगाय व्हव.

शकार–(मनांत) हा वृद्ध कोल्हा पापभिरू आणि हा गर्भ दाश परलोकभिरू, हे दोघेही भित्रे. मी राजशाल पुरुशश्रेष्ठ. मी कोणाला भीणार नाहीं कीं, मला कोणाचं भयही नाहीं. मीच श्वतः हें काम करीन. (उघड) अरे गर्भदाशा चेटा, तूं जा येथून. अग वशंतशेने, तूं आडोशाला जाऊन एकीकडे बैश. मी तुला मारणार नाहीं.

चेट–आज्ञा महाराज. (वसंतसेनेकडे जाऊन) बाईसाब एवढंच माझं सामर्थ्य नि पुन्य. (जातो.)

शकार—(कांचा घालून कंबर बांधतो) वशंतशेने, इकडे माझ्या शमोर उभी रहा. मी तुला मारतों.

वीट–चल हो एकीकडे, मूर्खा माझ्या समक्ष तूं हिला मारशील काय ? (त्याची गचांडी धरून त्याला ढकलून देतो)

शकार—(भुईवर पडतो) अरे वीटा तूं मला राजशालकाला मारतोश काय ? मी आजपर्यंत तुला दुधाचा, तुपाचा, शाखरेचा, मांशाचा रतीब लावला अशतां एवढ्याशा कामा करितां तूं माझा शत्रु होणार ? (विचार करून) ठीक ठीक. ह्या वृद्ध शृगालानं डोकं हालवून त्या चेटाला काहीं खूण केली. तर याला दुशरी कडे पाठवून वशंतशेनेला मारून टाकावं. (उघड) अरे विटा, वशंतशेनेला मार झटलं तें काहीं खरं नव्हे. मेरुच्या पत्रावळी शारख्या विश्तीर्ण कुलांत मी उत्पन्न होऊन अशं भलतं काम करीन काय ? हिनं भय पावून मला वश व्हावं म्हणून मी तशं बोललों.

वीट–बरं मग आतां काय म्हणतोस ?

शकार–विटा, ही तुला पाहून लाजते. माझा अंगिकार करीत नाहीं. ह्या शाठीं तूं जा. आणि मी मारल्यामुळं स्थावरक चेट पळून जात आहे, तर त्याला धरून इकडे घेऊन ये.

वीट–(मनांत) कदाचित् असंहीं असेल (उघड) बरं तर मी जातों.

वसंत–(विटाचा पदर धरून) मी शरणागत आहें असं सांगितलं असून, मला सोडून चाललास ना ?

वीट–वसंतसेने, भिऊं नको, स्वस्थ ऐस. अरे काणेला पुत्रा, ही वसंतसेना ठेव तुजपाशीं असूं दे. संभाळ बरं मी आल्यावर माझी मला परत दे.

शकार–बरं बरं. मी शंभाळतों हं.

वीट–(कांहींसा दूर जाऊन मनांत) अथवा मी गेलों असतां कदाचित हा घातकी तिचा घात करील. ह्यासाठी अंमळ अडोशास उभं

राहून, याच्या मनांत काय कर्तव्य आहे तें पाहूं. (एकांतीं जाऊन उभा रहातो.)

शकार-ठीक झालं. आतां हिला मारावं, अथवा हा वृद्ध शृंगाल मोटा कपटी ब्राह्मण आहे. तो आडऊड उभा राहून खरंच कोल्ह्या प्रमाणं कपट करील तर यालाही ठकविण्याश कांहीं युक्ति करतों. (फुलें वेंचून त्यांनीं आपणास शोभवून) हे बाले, हे शुंदरी वशंतसेने इकडे ये.

वीट-हा कामातुर झाला. आतां कांहीं चिंता नाहीं. (जातो.)

शकार-(आर्जवानें) मी तुला पुष्कळ शोनें देतों. मी तुझ्याशीं प्रिय भाषण करितों. आणि आपल्या पागोट्यासुद्धां हें मस्तक तव-पदीं नम्र करितों, तर हे शुंदरी माझे मनोरथ तूं पूर्ण कर.

वसंत०-(खालीं तोंड करून क्रोधानें.)

पद—राग सवाई, रामासि अनुकूल या चा०

मूर्खा हि अशिवा वाणी कैसी, काढिशी मुखांतूनि तरी तूं॥
देऊनि धन मज भुलवूं पहासि नीच चांडाळ असासि तरी तूं॥
विगलतनूधरा जाण हि नारी अशुद्ध देही असासि तरी तूं॥
त्या तूजला मी पाविन कैसी, दुर्जन निश्चयि असासि खरा तूं॥ १॥

पद—भूपती खरे ते या चा०

श्रीमंत तो जरी पसंत आम्हां नाहीं ॥ सेवितों प्रयत्नें कुलवंत नरा पाही ॥ वेश्येसि मार्ग हा सुरम्य शोभा देई ॥ सदृश्य जनाश्रयें काम पुरा तो होई ॥ चाल ॥ गुण लागति ते प्रीतीतें ॥ जाणरे॥ जबरीनें कांहिं नच होतें ॥ जाणरे ॥ सर्वत्र रीत

ही दिसते ॥ जाणरे ॥ चाल ॥ मधुकरी कवण ती,
अम्रवृक्ष जी सेवी ॥ सेवील पलश तो असें कधीं
कां होई ॥ १ ॥

शकार–अग ए बटकीचे पोरी, त्या भिकारी चारुदत्ताला आम्रवृक्ष म्हणतेस आणि मी राजशालक, वरमनुष्य मला पळश म्हणतेस काय? शुक देखील म्हणत नाहींस ग! अशी तूं मला शिव्या देतेस काय?

वसंत०–निरंतर तो माझ्या हृदयांतच आहे मग त्यांचे स्मरण, वर्णन कसें न करीन?

शकार–अद्यापि तो तुझ्या हृदयांत आहे? तर थांब तुझ्या हृदयगताला आणि तुला बरोबरच मोक्ष देतों. अग, दरिद्र शार्थवाह मनुष्याची इच्छा करणारे मजपुढें उभी रहा.

वसंत०–तींच अक्षरें पुन्हा बोल. मला तीं फार आवडलीं.

शकार–आतां दासीपुत्र चारुदत्त तोच तुझें रक्षण करील?

वसंत०–इथें असून ते मला पहाते तर माझें रक्षण खचित करते.

शकार–अं काय म्हणतेस? तो रक्षण करता?

श्लोक.

तो कोण वालिशुत शुक्र महेंद्र विष्णू ॥
कीं द्रोणपुत्र यमनंदन भीम जिष्णू ॥
कुंभश्रुती दशशिरा अथवा जटायू ॥
कीं कालनेमि मुचकुंद बली श्रुतीयू ॥ १ ॥

अथवा हेही तुझें रक्षण करूं शकणार नाहींत.

श्लोक.

चाणक्यानें जशी शीता मारिली भारती युगीं ॥
तशी तूतें मारिन मी द्रौपदीनें जटायुशा ॥ १ ॥

वसंत०--(भयानें) अग आई तूं कुठं आहेस? हाय! हाय!

पद—व्यर्थ मी जन्मलें० या चालीवर.

कायती होईल माझि गती ॥ लागली मनाला हीच भिती ॥ धृ० ॥ पूर्ण मनोरथ झाल्या वांचुनि ॥ काय तरी मज येइ मृती ॥ १ ॥ काय करावें जाऊं कोठें । सुटली मनिची सर्व धृती ॥ २ ॥ प्रियकर नाथा चारुदत्त हा । शेवटची तुज करित नती। ३।

शकार-ही गर्भदाशी अद्यापि त्याच दुष्टाचं नांव घेते. (तिचा गचांडा धरून) अगे गर्भदाशी कर कर त्या भिकाऱ्याचं स्मरण कर.

वसंत०-आर्या चारुदत्ताला माझं नमन असो.

शकार०—मर तर आतां रांडेचे पोरी मर.. (तिचा गळा दावतो आणि तिला मारून लोटून देतो. वसंतसेना मूर्छित पडून निचेष्ट होते) (हर्षानें) वाहवा ! काय माझं शौर्य! हिनं माझा अपमान केला ह्मणून रागानं इला मारून टाकली ! रावणाशारखा माझा बाप आणि द्रौपदी शारखी माझी आई अशा या पुत्राचा पराक्रम पाहून शंतुष्ट कशे होणार नाहींत? अशो आपलं काम झालं. आतां तो म्हातारा कोल्हा येईल. याशाठीं येथून दूर जाऊन बशावं हें बरं.

वीटः-हा स्थावरक चेट मी समजावून माघारा आणिला आतां काणेलीपुत्रास जाऊन भेटावं. (इकडे तिकडे फिरून पाहून) अरे हा तर पाय पसरून मार्गांतच पडला आहे, तेव्हां यानं स्त्रीवध केला असं त्यास वाटतं. (शकाराजवळ जाऊन) अरे काणेलीपुत्रा तूं सांगितल्याप्रमाणं मी स्थावरक चेटास समजाऊन आणिलं.

शकारः—विटा आलाश? तुझं स्वागत असो. पुत्रा स्थावरका चेटा, तूं आलाश? तुझंही स्वागत अशो.

चेट—जी सरकार.

वीट—माझी ठेव तुजपाशीं आहे ती माझी मला दे.

शकार—कोणती ठेव ?

वीट—वसंतसेना.

शकार—गेली.

वीट—कुठं ? (तर्क करून) ती या दिशेनं गेली नाहीं.

शकार—तूं कोणत्या दिशेनं आलाश ?

वीट—पूर्व दिशेनं.

शकार—ती दक्षिण दिशेनं गेली.

वीट—मी दक्षिण दिशेनं आलों.

शकार—ती उत्तर दिशेनं गेली.

वीट—अरे तूं असं संदिग्ध भाषण काय करतोस ? खरं असेल तें सांग.

शकार—खरं शांगूं ? मारली.

वीट—अजून मला खरं वाटत नाहीं. खरं असेल तें सांग.

शकार—तुझ्या डोक्यावर मी पाय ठेवून शपथ करितों. मग तर तुझा खरं वाटेल ना ? ही मी मारली. माझं बोलणं खरं वाटत नसेल तर हें प्रत्यक्ष पहा राजशालकाचं शंस्थानकाचं शूरत्व. (दाखवितो.)

वीट—(पाहून) हाय हाय ! मी मंदभाग्य झालों (मूर्च्छित होऊन पडतो.)

शकार—अरे ! माझा मित्र विट शांत झाला !

चेट—अरे विटा सावध हो सावध. मीच तिला गाडींत मदन आणली तवा मीच मारली अन् काय ?

वीट—(सावध होऊन) हाय वसंतसेने, तुझा असा परिणाम व्हावा काय ?

*पद-राग जोगी, ताल धुमाळी. (जाते कीं मन या वा०)

गेली गेली रति विलासिनी निज देशा त्यजुनी ॥
औदार्यनदी गेली कैशी जन्मभूमी सोडुनी ॥ ध्रु० ॥

वस्त्राभरणें भूषित सुशीले चारुमुखी तरुणी ॥
लावण्यलते पंकजनयने चतुरे केलिखनी ॥
आश्रयदाते करीगामिनी स्मरविक्रय अवनी ॥
सुंदर वपु तव नाश पावलें कैसें आज दिनीं ॥ १ ॥

(शकारास)

पद–ज्यां बघ जातें या० चा०

कसा तरि झाला । येणें लाभचि तो तुजला ॥ धृ० ॥
घोर कर्म तूं जें हें केलें । नगरविभूषण हरुनी
नेलें ॥ करुनि पापाला ॥ वाट रौरव साधीला ॥ १ ॥

(मनांत) कदाचित् हा दुष्ट आपलें दुष्कर्म मज गरिबावर घालील तर आतां आपण इथें राहूं नये. (जाऊं लागतो.)

शकार–(जवळ जाऊन त्याला धरून) अरे जातोश कुठं ?

वीट–मला सोड सोड, जाऊं दे. तुझी संगत पुरे.

शकार–अरे वशंतशेनेला आपण स्वतः मारून मला दोष लावून पळून जातोश कुठं ? शांप्रत मी अनाथ आहे अशें तुला वाटतं काय ?

वीट–तूं केवळ नष्ट आहेस.

शकार–(हंसतो) ही ही ही. अरे विटा रागावूं नकोश. चल आपण तळ्यांत क्रीडा करूं, चल.

वीट–नको रे बाबा तुझी क्रीडा.

साकी.

अपातित जन जो पतिता संगें राहतसे या लोकीं ॥
पतित तयातें सर्व मानिती तुज संगें मन कीं ॥
अनुसरूं तुज कैसा । स्त्रीघातकि तूं ऐसा ॥ १ ॥

(करुणायुक्त) वसंतसेने! हाय हाय!

पद. बाई तूं या आम० था० चा०

पुढच्या जन्मीं नच या जन्मा । घेउनि येई गणि-
कायामा ॥ सुंदरनयने हे शुभशीले । ख्यात विमल
कुलिं यावें जन्मा ॥ १ ॥

शकार–(रागावून) अरे माझ्या पुष्पकरंडक जीर्णोद्यानांत वसंत-शेनेला मारून आतां पळून जातोश? चल माझ्या मेव्हण्या पुढं. मी तुजवर फिर्याद करितों (त्याला धरतो)

चेट–ओं काय म्हणतोस? दुरा थांब तुला दाखवितों. (असें म्हणून तरवार काढतो)

शकार–(भिऊन मागें सरून) कायरे तूं भ्यालाश होय? तर जा जा.

चेट–(मनांत) आतां इथं राहणं योग्य नाहीं. असो. आर्य शर्विलक, चंदनक प्रभृति या आपल्या सोबत्यांना जाऊन मिळावं हेंच बरं. (निघून जातो.)

शकार–ना मूर्ख एकदांचा. गेलाश पिडा चुकली. अरे पुत्रा स्थावरका चेटा मीं कशं कार्य केलं?

चेट–महाराज, आपुन लई चंगाळ काम केलं.

शकार–चेटा काय, मी वाईट काम केलं म्हणतोश? बरं झालं तें झालं. (आंगावरचे अलंकार काढून) हा अलंकार मी तुला देतों हा घे.

चेट–नग नग मला धनी साब. आपनच ठेवा म्हंजी झालं.

शकार–बरं तर हे बैल घेऊन जा. आणि माझ्या वाड्याच्या समोरच्या गल्लींत उभा रहा. इतक्यांत मी येतों.

चेट–आज्ञा महाराज. (गाडी घेऊन जातो.)

शकार—आपलं रक्षण करण्याकरितां विट निघून गेला तो नाहींसा झाला न्‌ ह्मणा. आतां चेटाला बाबाच्या शमोरच्या गच्चींत उभं राहावयास शांगितलं आहे. तिथंन त्याला बिडी घालून अडकवून टाकावं ह्मणजे आपली मसलत गुप्त राहील. चला तर. ही पण एकदां ती मेली कीं जिवंत आहे तें पहावं. जिवंत असली तर पुन्हा ठार करावी. (तिला पाहून) काय ही तर खचीत्‌ मेली. असो, शेल्यानं हिला झांकून ठेवतों. पण नको. कां कीं हा शेला नामांकित आहे. ह्मणून कोणा श्रेष्ठ पुरुश याला ओळखील. असो. वाऱ्यानं गोळा झालेल्या शुष्कपर्णांनीं हिला झांकून टाकावं. (तसें करतो.) आतां द्रव्यलोभास्तव शावकारपुत्र चारुदत्तानं माझ्या पुष्पकरंडक नामक जीर्णोद्यानांत वशंतशेना बलात्कारानं नेऊन ठार मारिली अशी राजशभेंत जाऊन फिर्याद करावी. हं हं ही नवीन कपट युक्ति नामी. चला तर. (थोडें चालून व पुढें पाहून भीतीनं) मी जातों त्याच वाटेनं हा दुष्ट गोशावडा ओलं भगवं वस्त्र हातीं घेऊन येत आहे. याच्या नाकांत वेशण घालून याला मीं रश्त्यांत फिरविलं. त्या मुळं याचं माझं वैर पडलं आहे. न जाणों कदाचित्‌ हा मला इथं पाहून ह्यानंच वशंतशेना मारिली असं शांगेल. तेव्हां आतां आपण ह्या पडक्या भिंतीवरून चढून जावं.

(तदनंतर संवाहक भिक्षु येतो.)

भिक्षु—मी आपली छाटी तळ्यांत धुतली. आतां झाडाच्या खांदीवर घालून ती वाळवावी. पण इथें वानरांना उपद्रव फार आहे, त्यांनीं खालीं पाडली तर धुरळ्यानं मरेल यासाठीं खालींच कुठं तरी पसरून वाळवावी ह्मणजे माती न लागतां ही वाळेल. (तसें करून "नमो बुद्धाय" असें ह्मणून खालीं बसतो आणि आपणाशीं) आतांच काय बसावं. धर्माक्षरांचा पाठ तरी करावा. (" इतिव मग मीपण० " इत्यादि पूर्वोक्त ह्मणतो व पुनः विचार करून) जों पर्यंत बुद्धोपासिका वसंतसेनेचा प्रत्युपकार मजकडून घडला

नाहीं तों पर्यंत स्वर्ग मला नको. दहा मोहोरा देऊन मला द्यूतकरापासून सोडविलं त्या दिवसापासून तिनं मला विकत घेतलं असंच मी समजतों. (पुढें पाहून) हें काय ! या पानांच्या आंत हालतं काय? सुस्कारा कोण टाकतं ? (वसंतसेना सावध होऊन हात बाहेर दाखविते तो पाहून चपापून) हा काय चमत्कार! उत्तम अलंकारांनीं भूषित असा स्त्रीचा हात पानांतून बाहेर निघाला ! (तो निरखून पाहून) अरे हा हात तर ओळखीचा दिसतो. खचीत मला अभय दिलेला तोच हा हात. (वरचीं पानें एकीकडे सारून व पाहून) हो तीच ही बुद्धोपासिका ! हिची अशी दशा कशानं झाली ?

वसंत०–(खोल शब्दानें) मला थोडं पाणी.

भिक्षु–काय ही पाणी मागते ? येथून बावडी तर दूर आहे, आतां कसं करावं ? असो माझी ही छाटी अजून बरीच ओली आहे. हीच हिच्या आंगावर घालावी. (तसें करतो. वसंतसेना सावध होऊन उठून बसते. भिक्षु तिला वस्त्राच्या पदरानें वारा घालतो) आतां पाणी आणून देऊं काय ?

वसंत०–आर्य तूं कोण आहेस ?

भिक्षु–बुद्धोपासिकेनं मला ओळखिलं नाहीं काय ? दहा मोहरा देऊन विकत घेतलेला तो हा.

वसंत०–होय मी ओळखलं; पण तुम्ही ह्मणतां तें मला स्मरत नाहीं. मी अगदीं मेलें असतें तर बरं होतं.

भिक्षु–बुद्धोपासिके तुझी अशी अवस्था कशानं झाली?

वसंत०–(दुःखानं) वेश्यापणास जें योग्य तें झालं.

भिक्षु–हे बुद्धोपासिके, ऊठ ऊठ. मला स्पर्श करतां नये ह्मणून या जवळच्या झाडाच्या फांदीला धरून ऊठ. (झाडाची फांदी वांकवितो. तिला धरून वसंतसेना उठते.)

वसंत०—ह्या समयीं तूं मला जीवदान दिलंस असं मी मानतें.

भिक्षु—अम्मा, येथून जवळच त्या मठांत माझी धर्म भगिनी रहाते तिथं हळूहळू चल आणि विसावा घेऊन स्वस्थ चित्त हो; मग आपल्या घरीं जा.. (दोघे जातात.)

(पडदा पडतो.)

तिसरा अंक समाप्त.

अंक ४ था.

प्रवेश १ ला.

(शकार प्रवेश करतो.)

शकार--(आपणाशीं) मी थंड पाण्यांत आंघोळ करून बागेंत बशून कशा शांत झालों आहें. तशंच नायकांबरोबर क्रीडा करून व मित्रांबरोबर गाऊन मजा मारिली. क्षणांत शेंडीला गांठ देतों. क्षणांत शोडून टाकतों. आतां मी राजशालक शंस्थानक कशा दिशतों? (विचार केल्याशें करून) विषाच्या किड्याप्रमाणें मी दुशन्याच्या नाशाविषयीं जागा करून ठेविली आहे. त्यांत कुणाला बरं घालावं ? (स्मरण करून) हो मला श्मरलं! त्या दरिद्र चारुदत्तावर ह्या कर्माचं श्थापन केलं अशतां शजायाजोगं आहे. तेव्हां त्यावरच बालंट घ्यावं लागले झालं. आतां न्यायशभेंत प्रथम हीच फिर्याद करावी कीं, चारुदत्तानं द्रव्यलोभास्तव वशंतशेना बाहुपाश घालून मारिली. चला तर न्यायशभेंतच अगोदर जावं. (इकडे तिकडे फिरून) हीच न्यायशभा, आतां आत जावं.

न्याया०--अरे शोधनका, बाहेर कोणी फिर्यादी आहे काय पहा.

शोध०--आज्ञा. (बाहेर येऊन मोठ्यानें हाक मारून) फिर्यादी आहे!

शकार-(हर्षानें) न्यायाधीश आले कायरे ? (डौलानें इकडे तिकडे फिरून) आले अशल्याश त्यांना राष्ट्रीय राजशालक वरपुरुष मनुश्य वाशुदेव आला आहे म्हणून कळीव. शमजलाश?

शोध०-(घाबरून) काय ! आज पहिल्यानेंच राजशालक फिर्यादी आला ? (त्यास उद्देशून) महाराज अंमळ उभे रहा, जाऊन न्यायाधिशांस कळवितों. (न्यायाधिशाजवळ जाऊन) महाराज आज राजशालक संस्थानक फिर्याद घेऊन आला आहे.

न्याया०–काय ? आज पहिल्यानंच राजशालक फिर्याद घेऊन आला आहे ? सूर्योदय समयींच ग्रहण कुणा तरी महा पुरुषाचा घात सुचवित. शोधनका आज न्यायाचें कांम बरोबर चालणार नाहीं त्या करितां त्याला जाऊन आज तुझी फिर्याद पहाण्यास अवकाश नाहीं, तूं उद्यां ये, असें सांग.

शोध०–आज्ञा, (शकाराकडे जाऊन) महाराज न्यायाधीश ह्मणतात कीं, आज तुमची फिर्याद पहाण्यास अवकाश नाहीं; तुह्मी उद्यां या.

शकार–(रागानें) काय माझी फिर्याद न्यायाधीश पहात नाहीं ? कांहीं चिंता नाहीं. जर तो पहात नाहीं तर माझा मेव्हणा भगिनीपति पालकराजा ह्यास विनंती करून तशीच बहीण आणि माता यांची भीड घालून ह्या न्यायाधिशाला काढून दुसरा न्यायाधीश आणवितों पहा. (जावयास निघतो.)

शोध०–महाराज, जरा थांबा. (न्यायाधिशाकडे जाऊन) तो राजशालक रागावून माझी फिर्याद न्यायाधिशांनीं आज पाहिली नाहीं तर राजाला सांगून दुसरे न्यायाधिश आणवीन असें ह्मणतो.

न्याया०–ह्या मूर्खाचे ठायीं सर्व कांहीं संभवतें. असो, शोधनका त्याला सांग कीं, आंत ये तुझी फिर्याद पहातों.

शोध०–आज्ञा. (शकाराकडे जाऊन) तुम्हांला न्यायाधीश बोलावतात चला.

शकार–(मनांत) पहिल्यानें ह्मणाले पहात नाहीं. मग ह्मणतात पहातों. यावरून न्यायाधीश मला भ्याले खचित. तर जें मी सांगेन तें त्यांस खरं मानणें प्राप्त पडेल. (आंत जाऊन न्यायाधिशाजवळ बसतो.)

न्याया०–(मनांत) फिर्याद करणाराचें काय धारिष्ट आणि काय वर्तन हें ! (उघड) अहो तुह्मी या ठिकाणीं बसा.

शकार–ओं काय ह्मणतां ? अहो ही सर्व भूमि माझी आहे. मला पाहिजे तिथें मी बसेन. (श्रेष्ठीकडे पाहून) हा मी बसलों पहा.

(शोधनकास) नाहीं मी तिथंच बशेन. न्यायाधिशाच्या चौकी-वर हात ठेवून हा मी इथं बसतो पहा. (खाली बसतो.)

न्याया०–आपण फिर्यादी आहां काय ?

शाकार–होयण्यांत काय शंशय !

न्याया०–काय फिर्याद आहे बोला.

शाकार–मी तुमच्या कानांत शांगेन. मी मोठ्या भगवंत कुलांत झालों आहे. माझा बाप राजाचा शाशरा आणि राजा माझ्या बापाचा जांवई. मी राजाचा मेव्हणा आहे. राजाची बायको ती माझी शख्खी बहीण शमजा !

न्याया०–हें सर्व खरं आहे; परंतु उत्तम कुल असलं तरी महत्व येण्याला शीलच कारण आहे. नाहीं तर रानांत कांटेरी झाडं आपापच उगवतात. असो तुमचं कार्य तरी बोला.

शाकार–मी म्हणतों, जरी मी अपराध केला तरी माझं कोण काय करणार आहे. हें पहा माझा मेव्हणा भगिनीपती पालकराजा यानं संतुष्ट होऊन मजला क्रीडावयाश म्हणा कीं खेळावयाश म्हणा. सर्व उद्यानांत श्रेष्ठ पुष्पकरंडक जीर्णोद्यान दिलं आहे, तें उद्यान पहावयाश, पुष्ट करावयाश, शुष्क करावयाश, स्वच्छ करावयाश किंवा छिन्न करावयाश मी प्रति दिवशीं जात अशतों. तिथं पडलेलं स्त्रीचं मृत शरीर दैवयोगानं पहातों किंवा नाहीं पहात. हो हो मी काल पाहिलं.

न्याया०–ती स्त्री कोणाची कोण हें तुम्हाला ठाऊक आहे ?

शाकार–हो ती ठाऊक कशी नाहीं अशणार. अहो ती या नगरीचं भूशण आणि शुवर्णालंकार भूशित वशंतशेना गणिका कोणी कुपुत्रानं धनलोभास्तव पुष्पकरंडक उद्यान शून्य पाहून तिथं नेऊन बलात्कारानं बाहुपाश घालून मारिली. मी नाहीं हो– (असें अर्धे बोलून तोंड झांकतो.)

न्याया०–नगरांतील रखवालदाराची फार सुस्ती ही. अहो श्रेष्ठी कायस्थ " मी नाहीं हो " हेंच व्यवहाराचं प्रथम पद लिहून ठेवा.

श्रेष्ठी.[redacted]–आज्ञा महाराज. (तसें करते.)

शकार–(मनांत) काय हें आश्चर्य! बोलण्याच्या घाईंत मी भलतंच बोलून आपला नाश करून घेतला. अशो आतां शेपादणी केली पाहिजे. (उघड) अहो न्यायाधीश, मी बोललों तें तुह्मीं समजलां नाहीं. मीच पाहिली अशं मी बोललों. उगींच गलबला काय करितां? (लिहिलेलें पायानें पुसून टाकितो)

न्याया०–धन लोभास्तव बाहुपाशांनीं मारली, हें तुह्मांला कशावरून समजलं?

शकार–यांत काय कठीण! अहो अलंकार घालण्याची जितकीं स्थानं तितकीं सारीं रिकामीं आहेत. यावरून माझा तर्क.

श्रे० का०–हो हो तसं असल तर हा तर्क खरा आहे.

शकार–दैवानं मला वांचविलं हें मोठं आश्चर्य?

श्रे० का०–आता हा खटला कोणावर जाईल बरं.

न्याया०—खटल्याचे प्रकार दोन आहेत. एक वाक्यानुसार निर्णय आणि दुसरा अर्थानुसार निर्णय. वाक्यानुसार निर्णय हा वादी प्रतिवादी यांच्या बोलण्यावरून केला पाहिजे आणि अर्थानुसार निर्णय हा न्यायाधिशाच्या बुद्धिकौशल्यावर आहे.

श्रे० का०–तर मग हा खटला वसंतसेनेच्या आईकडे जाईल.

न्याया०–होय, तिजवरच. यांत काय संशय. शोधनका तूं वसंतसेनेच्या आईकडे जा आणि तिचं मन न दुखावितां इकडे घेऊन ये.

शोधन०–आज्ञा महाराज, (बाहेर जाऊन वसंतसेनेच्या आईला घेऊन येतो.) म्हातारे, इकडून या वाटेनं.

म्हातारी–(आपणाशीं) माझी मुलगी तर यौवनसुखाचा अनुभव घेण्याकरितां आपल्या मित्राच्या घरीं गेली आहे. आणि हा बाबा म्हणतो "चल तुला न्यायाधीश बोलावतात" यावरून मला भीति

वाटते. कांहीं सुचत नाहीं. माझं हृदय थरथर कांपतं. काय असेल तें असो. बाबारे मला न्यायसभेची वाट दाखीव.

शोध०-बाई इकडून या वाटेनं अशी ये. (पुढें जाऊन). हीच न्यायसभा. बाई तूं आंत चल. (दोघे आंत जातात.)

झातारी-(न्यायाधीशाच्या पुढें जाऊन) दादांनो तुम्हांला उदंड आयुष्य असो.

न्याया०-म्हातारे ये, बैस.

म्हातारी-बरं दादांनो (खालीं बसते)

शकार-(तिरस्कारानें) आली का बुड्ढी थेरडी कुंटीण. ठीक झालं.

न्याया०—म्हातारे तूं वसंतसेनेची आई होय ?

म्हातारी-होय महाराज.

न्याया०—बरं या वेळेस वसंतसेना कुठं आहे ?

म्हातारी—ती आपल्या मित्राच्या घरीं गेली आहे.

न्याया०—तिच्या मित्राचं नांव काय ?

म्हातारी— हाय हाय ! ही मोठी लज्जेची गोष्ट आहे. (उघड) महाराज हें लोकांनीं विचारावं. आपणासारख्यांनीं विचारूं नये.

न्याया०—इथं लाज कशाची. हा न्याय आहे, तोच तुला प्रश्न करितो.

श्रे० का०—न्याय प्रश्न करितो यांत कांहीं दोष नाहीं. सांग त्याचं नांव.

म्हातारी—मग माझा नाइलाज आहे. ऐका तर. विनयदत्त शेटीचा नातू आणि सागरदत्त शेटीचा पुत्र जगत्प्रसिद्ध चारुदत्त हा माझ्या मुलीचा मित्र, त्याचा वाडा माणिकचौकांत आहे. तिथं त्याजकडे माझी कन्या यौवनसुखाचा अनुभव घेण्याकरितां गेली आहे.

शकार—(आवेशानें उठून) ऐकलंत कां हें भाशण शभाशदांनो ? हीं अक्षरं लिहून ठेवा. आत चारुदत्तावर माझी फिर्याद आहे.

श्रे० का०—चारुदत्त तिचा मित्र आहे. यांत कांहीं दोष नाहीं.

न्याया०—असो, हा खटला चारुदत्तावर जातो यांत संशय नाहीं. अरे धनदत्ता, हीं अक्षरं लिहून ठेव. या खटल्याचा मुद्दा हाच. आतां चारुदत्ताला बोलावून आणलं पाहिजे. अथवा व्यवहार बोलावतो. आम्हांकडे काय! शोधनका त्या श्रेष्ठ चारुदत्ताकडे जा आणि कांहीं कामाकरितां न्यायाधीश आपले दर्शनाची इच्छा करीत आहेत, असं सांगून न दुखवितां सत्कारपूर्वक त्याला घेऊन ये.

शोधनक—आज्ञा महाराज. (बाहेर जाऊन चारुदत्तास घेऊन पुनः येतो.) आर्या इकडून असा ये.

चारु०--(मनांत चिंतन करितो) माझं कुळ शील राजाला माहित असून मला कां बरं बोलाविलं आहे? कीं आर्यकाला दूर पाठविलं हें त्याला कळून शिक्षा देण्याकरितां बोलाविलं? (सावकाश चाहून पुढें पाहून)

पद.

किती रुक्षरवा करिती हे वायस तरी पाही ।
दटाविती राजदूत मजला तरी पाही ॥ धृ ॥
सव्य नेत्र बाहु तेवि पावतसे स्फुरणातें ॥
अशुभ शकुन कथती हे मरणा तरी पाही ॥ १ ॥

लावणीचे चालीवर.

भूमि भाग हा ओला नसतां स्खलन होई का मच्चरणीं । वाम बाहु का कंपा पावे स्फुरण तेवि ये या नयनीं ॥ धृ ॥ दुःशब्दानें हृदयाब्जातें भेदिती का तरी हे शकुनी ॥ भीतीदायक दुर्निमित्तें होतीं आजि हीं का ह्मणुनी ॥ चाल ॥ जिव्हा हलवी

लळलळा कशी मजकडेस पाहुनी। वरचेवरही फुगवी उदरा वक्रगती होउनी । असा भुजग हा पडला माझ्या मार्गातें रोधुनी ॥ चाल ॥ पाहुनि ऐसें वाटे मजला बरि नसे गती आजदिनीं । कथिति खचित तो मृत्यु ठाकला न्याया सत्वर ओढोनी ॥ १ ॥

(उघड) अधिकाऱ्यांचं कल्याण असो.

न्याया०–(आदरानें) आर्या, तुझं स्वागत असो. शोधनका आर्यास बसावयास आसन दे.

शोधनक–आज्ञा. (आसन देऊन) हें आसन, ह्यावर बसावं.

चारु०–ठीक आहे. (आसनावर बसतो.)

शकार–(क्रोधानें) आलाश कायरे स्त्री घातक्या, आलाश ? (गर्वानें) वाहवारे न्याय ! वाहवारे व्यवहार ! काय अधर्म हा ! श्त्री घातक्या अपराध्याश आशन बशावयाश देतात ! अशो, देऊं द्या. पहातों आतां !

न्याया०–आर्या चारुदत्ता हिच्या लेंकीबरोबर तुझी मैत्री, प्रीति, स्नेह, ओळख कांहीं आहे ?

चारु०–कुणाच्या ?

न्याया०–ह्या म्हातारीच्या. (वसंतसेनेच्या आईकडे बोट दाखवितो.)

चारु०–(म्हातारीला पाहून) आर्ये, तुला अभिवंदन करितों.

म्हातारी–वत्सा, तुला उदंड आयुष्य असो. (मनांत) ह्राच तो चारुदत्त ज्याला माझ्या मुलीनं आपलं नवयौवन अर्पिलं.

न्याया०–आर्या ती गणिका तुझी मित्र आहे ? (लाजल्यासारखें करतो.)

शकार–लाजेनं किंवा भयानं आपलं दुष्टकर्म झांकतोश ? द्रव्यलोभाशाठीं श्वतः श्त्रींचा वध करून आतां मौन धरतोश काय ? हा राजशाळ तशं करणारा नव्हे !

श्रेष्ठी का०–आर्या चारुदत्ता हा न्याय आहे. इथं लज्जा काय कामाची. सांग काय असेल तें.

चारु०–(लज्जेनें) अधिकाऱ्यांनो, ती गणिका माझी मैत्रीण आहे असं मी कसं बोलावं? अथवा हा यौवनाकडे अपराध, चारित्र्याकडे काय आहे.

न्याया०–इथं ब्राम्हण सभासद आहेत. अधर्मशंका मनांत आणूं नको. लज्जा सोडून दे. हा व्यवहार तुला प्रश्न करितो.

चारु०—अहो न्यायाधीश, माझा कुणाबरोबर व्यवहार. मजवर फिर्यादी कोण?

शकार–अरे, माझ्या बरोबर आहे. मी फिर्यादी.

चारु०–तुझ्या बरोबर माझा व्यवहार दुर्घट आहे.

शकार–अरे स्त्री घातक्या, सुवर्ण रत्नमय अलंकारांनीं भूषित गणिका जी वसंतसेना तिला धनलोभाशाठीं मारून आतां कपटानं शाधूचं शोंग घेऊन छपवितोश काय?

चारु०–(रागानें) काय भलतंच बोलतोस हें?

न्याया०–आर्या असूं दे. त्याच्याशीं कशाला बोलतोस? आम्ही विचारतों तें सांग. ती गणिका तुझी मित्र आहे कीं, नाहीं?

चारु०–होय आहे खरी.

न्याया०–बरं तर आतां ती कुठं आहे?

चारु०–ती आपल्या घरास गेली.

श्रे० का०–ती घरास कशी गेली, केव्हां गेली, तिच्या बरोबर कोण होतं सांग.

चारु०–(मनांत) ती लपून छपून गेली ह्मणून सांगूं कीं काय सांगूं? (विचार करीत उगीच बसतो.)

श्रे० का०–आर्या सांग सांग लवकर.

चारु०–घरास गेली हें मी जाणतों. याशिवाय मला कांहीं माहीत नाहीं.

शकार–अरे माझ्या पुश्पकरंडक जीर्णोद्यानांत तिला नेऊन बाहुपाश घाऊन ठार मारून आतां ती घराश गेली अशा बहाणा करतोश काय?

चारु०–(रागानें) अँः असं असंबद्ध भाषण करणाऱ्या तुझ्या तों-

इकडे पाहून मला संशय येतो. कां कीं, गुप्तपणें खोटें कर्म करणाऱ्या प्रमाणं तुझे ओंठ काळे दिसतात आणि हेमंत ऋतूंतल्या कमळाप्रमाणं तुझं तोंड निस्तेज दिसतं.

न्याया०–हा चारुदत्त असं दुष्ट कर्म कसं करील ?

शकार–हा न्याय पक्षपातानं होत आहे बरं ?

न्याया०–(रागावून) चल हो एकीकडे मूर्खा ! असं बोलावयास शंका कशी नाहीं वाटत. चारुदत्तावर हा दोष लावतांना तुझी जिव्हा कशी नाहीं झडली ?

शकार–पक्षपातानं न्याय होत आहे बरं.

म्हातारी–अरे दुष्टा, ज्यानं ठेव म्हणून ठेवलेला सुवर्णालंकार चोरांनीं नेला असतां त्याचे मोबदला चतुःसमुद्रसारभूत रत्नमाला दिली तो या समयीं धनलोभास्तव असं अकार्य करील काय? कोणा दुष्टाचं कर्म असेल तें असो. हाय हाय! अग माझे लाडके मुली! कुठं गेलीस बये. येग लवकर. (रडूं लागते.)

न्याया०–आर्या चारुदत्ता, ती पायांनीं गेली किंवा गाडींत बसून गेली?

चारु०–खरं विचाराल तर माझ्या देखत गेली नाहीं म्हणून पायांनीं किंवा गाडींतून गेली हें माझ्यानं सांगवत नाहीं.

वीरक–(प्रवेश करून आपणाशीं) तर आतां मी न्यायसभेंत जातों (सभेंत जाऊन) मी सर्व अधिकाऱ्यांस प्रणाम करितों.

न्याया०--कोण हा नगररक्षकाचा नायक वीरक ? वीरका इकडे कां आलास ?

वीरक–आर्यक बंदिशाळेंतून बंधन तोडून पळाला, त्याला मी शोधित असतां एक झांकलेली गाडी चालली होती. ही कुणाची कुणीकडे जाते अशी विचारपूस करीत असतां, "तूंच पहाणार कोण, मी ही गाडी पाहीन." असा तंटा करून चंदनकानं मला लाथा मारिल्या. हा त्यानं माझा अपराध केला. तो तुम्हांस कळविला. यावर काय करावयाचं तें तुम्ही पहा.

न्याया०–बरं ती गाडी कुणाची होती हें तुला कांहीं समजलं ?

वीरक–ही चारुदत्ताची गाडी. कशावरून म्हणाल तर ही चारुदत्ताची

गाडी आंत वसंतसेना बसून पुष्पकरंडक जीर्णोद्यानांत क्रीडावयास जात आहे, असं गाडीवाला ह्मणाला.

शकार–अहो हें पुन्हा ऐकून घ्या. ह्यावरून माझं बोलणं खरं कीं खोटं हें तुमच्या ध्यानांत आलंच असेल?

न्याया०–(मनांत) शुद्ध चंद्राला ग्रासणारा राहूच होय. (उघड वीरकास) वीरका तुझा न्याय मागाहून पाहूं. अगोदर तूं पुष्पकरंडक जीर्णोद्यानांत जाऊन तिथं कुणी स्त्री मेलेली पडली आहे कीं काय हें पाहून ये.

वीरक–बरं आहे. (बाहेर जाऊन माघारा येऊन) मी जीर्णोद्यानांत जाऊन पाहिलं. तिथं एक स्त्रीचं कलेवर पडलं आहे. पण तें श्वापदांनीं खाल्लं आहे.

न्याया०–पण तें स्त्रीचंच कलेवर कशावरून?

वीरक–तिथं वेणी आणि हातपाय तुटून पडले आहेत, त्यावरून.

न्याया०–शिवशिव! लोकांच्या दुर्वर्तनास धिक्कार असो.

चा०–(आपल्याशीं)

पद–ताल दादरा. यामिनी कालची० या चालीवर.

जेधवां सुमें तीं प्रथमतांचि हो फुलतीं ॥
सेवण्या रसातें मधुप जसे कीं येती ॥
दैवेंचि दुर्दशा भोगण्यासि जैं येती ॥
पाहूनि छिद्र तें बहु अनर्थ त्या घडती ॥ १ ॥

न्याया०–आर्या चारुदत्ता, आतां खरं सांग. राजशालक संस्थानक म्हणतो ही गोष्ट तुजपासून घडली का?

चा०–आतां इथं मी काय सांगूं? राजशालक संस्थानकाच्या बोलण्यावरूनच तुह्मी मला हें विचारतांना? पण या दुष्टाच्या भाषणांत सत्य किती आहे त्याचा अगोदर पूर्ण विचार करा.

पद–राग कर्नाटकी ताल त्रिवट. (मम जिवाची० या चा०)

मी वधिन कसा प्रिय रमणी । साश्रुलोचना धन
लोभानें, दीर्घ कृष्ण कच बळेंचि धरुनी ॥ धृ० ॥

फुलार्थं कधिं नच संचय केला, कुसुमित वल्ली
आकर्षोनी ॥ १ ॥

शाकार–अधिकाऱ्यांनो, अद्यापि तुह्मी पक्षपातानं न्याय चालवितां अँ! चारुदत्त धडधडीत दोषी अशतां त्याला तुह्मी आशनावर बशूं देतां हें काय!

न्याया०–अरे शोधनका, तसं करीनाका. (शोधनक चारुदत्तास आसनावरुन खालीं उतरावयास सांगतो.)

चारु०–विचार करा बरं अधिकाऱ्यांनो, विचार करा. (आसनावरून उतरून खालीं बसतो.)

शाकार–(मनांत हर्ष पावून) वाहवा मी केलेलं पाप दुशऱ्याच्या डोकीवर कशं पडलं पहा! तर आतां ज्या आशनावर चारुदत्त बशला होता, त्या आशनावर मी बशतों. (तसें करतो) अरे चारुदत्ता मजकडे पहा तर खरा, आणि मीच मारली अशं बोल.

चा०–अहो अधिकाऱ्यांनो विचार करा. (श्वासोश्वास टाकून मनांत.)

पद—राग बागेसरी ताल त्रिवट.

मजवरि हें जें संकट आलें। मित्रा कैसें अजुनि न
कळलें ॥ धृ० ॥ माझी ऐसी दुस्थिति बघुनी। रो-
हसेन बा! दुःख न मानी॥ निर्मल वंशीं कांते तव-
जनीं। त्वद्गति कैशी होइल नकळे ॥ १ ॥

(चिंतन करून) वसंतसेनेकडचं वर्तमान समजण्यासाठीं मी मैत्रेयाला तिजकडे पाठविला आहे. आणि मुलास गाडी करतां ह्मणून तिनं जे सुवर्णालंकार दिले होते तेही तिचे तिला परत देण्यासाठीं त्याजपाशीं दिले आहेत. तो अजून कां बरं येत नाहीं? इतका उशीर त्याला कां लागला?

(इतक्यांत अलंकारांची गांठोडी कांखेस मारून विदूषक येतो.)

विदू०—माझा मित्र आर्य चारुदत्त ह्यानं मला वसंतसेनेकडे जावयास सांगितलं आहे. मैत्रेया माझा पुत्र रोहसेन रडूं लागला ह्मणून वसं-

तसेनेनं त्याचे आंगावर अलंकार घालून त्यास त्याच्या आईकडे पाठविलं. "ते अलंकार माघारे घेऊं नयेत असा जरी तिचा अभिप्राय आहे तरी मला तिचे अलंकार कशाला पाहिजेत ? हे तिचे तिला नेऊन परत दे" असं सांगून माझ्या हातीं हे अलंकार दिले आहेत. ते वसंतसेनेला नेऊन द्यावे. (इकडे तिकडे फिरून आकाशाकडे कान देऊन) कोण हा रेभील काय ? अरे रेभिला तूं असा उद्विग्न कां दिसतोस बाबा ? (ऐकलेंसें करून) काय ह्मणतोस ? माझा मित्र चारुदत्त यास न्यायाधिशांनीं न्यायसभेस बोलावून नेलं. मग ह्याचं कांहीं मोठं कारण असेल. (विचार करून) असो. वसंतसेनेकडे मग जाईन. अगोदर न्यायसभेकडे जाऊन मित्राची चौकशी केली पाहिजे: (पुढें जाऊन पाहून) हीच ती न्यायसभा, चला तर आंत. (सभेंत प्रवेश करून) अधिकाऱ्यांनो तुमचं कुशल असो. माझा मित्र चारुदत्त कुठं आहे ?

न्याया०–तो बसला आहे पहा.

विदू०–मित्रा कुशलं आहे ना ?

चा०–झालं तर होईल.

विदू०—क्षेम तरी.

चा०–तें ही तसंच

विदू०–अरे मित्रा, तू असा अगदीं उद्विग्न कां दिसतोस ? तुला इथं कशासाठीं बोलावलं ?

चा०—मित्रा काय सांगू ?

साकी.

परलोक भीति मनीं न धरितां म्यां स्पष्ट नृशंसानें ॥
प्रत्यक्ष रतिस्त्री—बोलावें तें याच्या पुढलें त्यानें ॥ १ ॥

विदू०—काय काय ?

चा०–(कानांत) या या प्रमाणं.

विदू०—असं कोण ह्मणतो ?

चा०–(शकाराकडे बोट करून) हे राजश्री म्हणतात. आणि माझी अशी दशा होण्याला हेच कारण बरं.

वि०—(एकीकडे तोंड करून) अरे ती आपल्या घरास गेली असं तुं कां सांगत नाहींस ?

चा०—मी बोललों पण माझं ऐकतो कोण ? दैव फिरलं म्हणजे सर्व फिरतं.

वि०-(उभाराहून) अहो अधिकाऱ्यांनो. तुम्हीं सुज्ञ आहां हें मी सांगावं असं नाहीं. अहो ज्या पुरुषानं लोकोपकारार्थ आणि धर्मार्थ पुष्कळ धर्मकृत्यं करून या उज्जयनी नगरीला शोभा आणिली आणि ज्यानं उदारपणानं बहुतांस विपुल धनधानं दिलीं तो पुरुष सांप्रत दरिद्री झाला म्हणून धनलोभानं असं भलतंच काम करील काय ? हें तुम्हालां खरं कसं वाटतं ? (क्रोधानें शकारास) अरे कुलटा पुत्रा, राजशालका, संस्थानका, रे सज्जनदूषका, दोषभांडारा ! आंगावर सोन्याचे दागिने घालून मर्कटासारखा नटून प्रतिष्ठा मिरवितोस काय ? बोल बोल माझ्या पुढं फिरून. अरे, माझा हा प्रियसखा चारुदत्त किती दयाळू, किती उदार, किती निस्पृही आहे. याची योग्यता तुला पाकडाला काय ठाऊक ! अरे जो लतेचं पान तुटेल या भयानं पुष्पाकरितांही लतेला ओढून वांकवीत नाहीं, तो असं उभयलोक विरुद्ध अकार्य कसं करील ? अशा पुरुषावर तूं बालंट घेतोस, तर थांब. तुझ्या हृदयासारख्या ह्या कुटिल दंडानं तुझं मस्तक शतखंड करतों.

शकार-(क्रोधाविष्ट होऊन) ऐकाहो तुम्हीं न्यायाधीश ऐका. चारुदत्ता बरोबर माझा वाद किंवा व्यवहार चालला असतां हा दुष्ट बटुक मध्येंच बोलणार कोण ? आणि हा माझं मस्तक शतखंड करतो काय ? अरे दासी पुत्रा, दुष्ट बटुका, थांब तुझी खोड मोडतों. (दोघांची झुंपते. विदूषकाच्या काखेंतून अलंकारांची गांठोडी खालीं पडते. ते अलंकार उचलून घेऊन पाहून) पहा हो हा मुद्दा. हेच त्या बिचाऱ्या गणिकेचे अलंकार. ह्यानं आपल्या सोबत्यापाशीं दिले. ह्याच अलंकारांच्या लोभाशाठीं तीं बिचारी ह्याजकडून मारली गेली.

(सर्व अधिकारी तें पाहून खालीं तोंड घालून बसतात.)

चा०—(एकीकडे तोंड करून) हरहर ! असं कसं झालं ?

साकी.

नच यावा परी याच समयिं हा भूषण संघहि आला ॥
शोकार्णी मज जाळायास्तव दुर्दैवानें पडला ॥
दैवचि मम खोटें । जाया मृत्युमुखीं थाटें ॥ १ ॥

वि०–मित्रा मागं झालेला सर्व खरा वृत्तांत कां सांगत नाहींस ?

चा०–मित्रा सांगून काय फळ?

पद–राग दरबारी कानडा ताल त्रिवट.

जेथ तत्व तें पहावयातें ॥ शक्ति नसे ती नृपनयनातें ॥ ध्रु०
दैन्यचि तेथें ये वक्त्यातें ॥ निंद्य मरण वा गांठीं त्यातें ॥ १ ॥

न्याया०–अरेरे, ही फार वाईट गोष्ट झाली.

श्रे० का०–(वसंतसेनेच्या आईला हांक मारून) म्हातारे, तुझं लक्ष इकडे आहेना? हें दागिने पहा. हे तुझ्या मुलीचे आहेत कीं नाहींत ओळख.

म्हातारी–(दागिन्यांकडे पाहून) त्यासारखे दिसतात खरे; पण हे ते नव्हत.

शकार–ए थेरडे, कुंटिणी, डोळ्यांनीं बोलतेश तशी वाचेनं पहात कां नाहींश ?

म्हातारी–मोठा शहाणा, हो पलीकडे.

श्रे० का०–बाई, पुरतं पाहून विचार करून बोल. तेच हे दागिने होत कीं नव्हत.

म्हातारी–महाराज, कारागिरांची कुशलता दृष्टीला भ्रांति देते. त्यांसारखे दिसतात पण ते नव्हत.

न्याया०–तर हे दागिने कुणाचे तूं ओळखतेस?

म्हातारी–महाराज मी सांगितलंच आहे कीं, ते नव्हत. कारागीर लोकांनीं तसे घडविले असतील, कोणाचे म्हणून सांगूं?

न्याया०–हे श्रेष्ठी, हे कायस्थ, म्हातारी म्हणते तेंही खरं आहे. वस्तूसारख्या वस्तु असतात. कारागिराच्या कौशल्यानं असं होतं.

श्रे० का०—हे चारुदत्ता, हे दागिने तुजकारितां केलेले तुझे आहेत?

चा०—नाहीं नाहीं.

श्रे० का०—तर कुणाचे हे?

चा०—इथं जी म्हातारी बसली आहे तिच्या कन्येचे.

श्रे० का०—तर मग हे तिजपासून वेगळे कसे झाले?

चा०—हे दागिने तिच्या आंगावर केव्हां होते आणि केव्हां वेगळे झाले हें सांगवत नाहीं. पण सध्यां माझ्या घरापासून आले इतकं मात्र मी जाणतों.

शकार—प्रथम जीर्णोद्यानांत तिला नेऊन मारतोश, तिच्या आंगावरचे दागिने काढून घेतोश आणि आतां कपटानं शाधुपणाचा ढौल करून आंगापाशून केव्हां वियुक्त झाले हें माझ्यान शांगवत नाहीं, अशी छपावणी करतोश काय? तुला ठाऊक नाहीं तर हे तुझ्या घरीं कशेरे आले?

न्याया०—आर्या काय खरं असेल तेंच सांग. नाहीं तर फार कठीण जाईल.

चा०—होणारापुढं उपाय नाहीं.

साकी.

विमलकुलीं मी जन्मा आलों, शुद्धाचरणी तैसा ॥
पापलेशाही नसतां माझा लावितां मला दोषा ॥
उपाय मुळिं नाहीं। होइल असेल जें दैवीं ॥ १ ॥

(मनांत) आतां वसंतसेनेशिवाय मला वांचून तरी काय करावयाचं? हा प्रिये कुठेग गेलीस? (उघड) काय सांगूं? " परलोक भीति " इ० पुनरोक्त

शकार—मी बोलतों मारली. तूं आपल्या तोंडानं बोल मी मारली म्हणून.

चा०—तें तूंच बोल.

शकार–(टाळी वाजवून) ऐकाहो ऐका शर्व अधिकाऱ्यांनो, यानं मारली हें याच्याच बोलण्यावरून शिद्ध झालं. आतां ह्या दरिद्री चारुदत्ताला काय शिक्षा करावयाची अशेल ती करा.

न्याया०—शोधनका, राजशालक ह्मणतो तसं केलं पाहिजे. दूतांनो धरा चारुदत्ताला. बांधा. (राजदूत तसें करितात.)

म्हातारी–महाराज न्यायाधीश प्रसन्न व्हा, कृपा करा. अहो वसंतसेनेची ठेव चोरांनीं नेली असतां ती ज्यानें भरून दिली तो पुरुष असं अकार्य कधीं करणार नाहीं. माझी मुलगी कुणीही मारली तरी मारलीच. तिचं आयुष्य संपलं; परंतु हा श्रेष्ठ पुरुष दीर्घ काल वांचावा. आणखीं विनंती करतें कीं, न्याय हा वादीप्रतिवादी यांचा आहे. तर माझा कांही दावा या पुरुषावर नाहीं यासठीं आपण याला सोडावं.

शकार–अग गर्भदाशी कुंटिणी दूर हो. निध येथून. तुझा याचा काय शंबंध आहे. याशी तुला काय करावयाचं आहे !

न्याया०—बाई हें बोलून कांहीं उपयोग नाहीं. आतां तूं जा. दूतांनो ह्याला बाहेर काढा.

म्हातारी०—हा बाळा, पुत्रका, हा सत्पुरुषा, हा श्रेष्ठा, चारुदत्ता ! तुझा असा परिणाम व्हावा काय? हाय हाय ! (रडत रडत निघून जाते)

शकार–(मनांत) मला जें कर्तव्य होतं, तें मी माझ्याशारखं केलं. चला आतां (जातो.)

न्याया०—आर्या हा राजाच्या घरचा व्यवहार आहे. न्याय करणं आह्मांकडे. पुढची गोष्ट राजाकडे. तथापि शोधनका, पालक राजास आमची विज्ञापना सांग कीं, ब्राम्हण अपराधी असला तरी मारूं नये तर त्यास सहकुटुंबवैभव हद्दपार करावा.

शोध०—आज्ञेप्रमाणं महाराजांस कळवितों. (जातो आणि पुन्हा माघारा येऊन डोळ्यांस पाणी आणून.) महाराज मी आपल्या आज्ञेप्रमाणं मजकूर कळविला; परंतु महाराज आज्ञा करितात कीं, द्रव्यलोभास्तव ज्यांन स्त्री मारिली तो ब्राह्मण असला तरी त्याच्या गळ्यांत तीं आभरणं बांधून त्याची धिंड काढून ज्या ठिकाणीं ती मा-

रली त्याठिकाणीं त्यास मार देऊन दक्षिण स्मशानांत सुळावर चढवावं, किंवा शिरच्छेद करावा. आणि जो कुणी असा अपराध करील त्याला या प्रमाणंच शासन होईल असं जाहीर करावं.

चा०—काय हो अविवेक ! पालक राजास कांहींच विचार नाहीं अथवा त्याजकडे तरी काय दोष?

पद–राग मांड ताल धुमाळी.

ऐशा व्यवहाराच्या डोहीं मंत्री जयाला ढकलीती ॥
त्या भूपाच्या हस्तें सहजचि अविचार असे हे घडती ॥
श्वेत काकसे राजशासना दूषक सत्यचि हे होती ॥
निरपराधि जन यांच्या हस्तें असंख्य मृत्युमुखीं पडती ॥ १ ॥

(मैत्रेयाच्या गळ्यास मिठी मारून)

पद–मजवरि हें आलें० या चालीवर.

प्रणता मातेला सांगुनि आधीं । शांतवि तूं तिजला
मित्रारे ॥ धृ० ॥ पति वियोग हा नच होऊंदे ।
समजवि माझ्या प्रियकांतेला ॥ मित्रा कुलशीला ।
दयाळा । बंधु स्नेहाला ॥ १ ॥ रोहसेन मम बाळ
धाकुटा ॥ प्रेमें पाही मजसम त्याला ॥ २ ॥

वि०—मूळ तुटल्यावर वृक्षाचं प्रतिपालन कोठून होणार?

चा०—मित्रा, तूं काय ह्मणशील तें ह्मण; परंतु माझ्या बाळा रोहसेनाला तरी आणून मला एकवेळ भेटीव.

वि०—बरं आहे. काय करावं. इतकं करितोंच. (निघून जातो.)

न्याया०—शोधनका, ह्या अपराध्याला दूर एकीकडे ने.

शोध०—आज्ञा. (तसें करतो.)

न्याया०—कोण आहेरे तिकडे! चारुदत्ताला घेऊन जाऊन राजा-

ज्ञेप्रमाणं करा म्हणून मांगाला सांग. (चारुदत्ताला चांडाळाच्या स्वाधीन करून न्यायाधीश उठून जातात.)

शोध०—श्रेष्ठ चारुदत्ता, ये इकडे माझ्यामागून.

चा०—(करुणायुक्त होऊन) काय करूं?

पद—राग झंपा ताल प्रबंध.

दुष्ट अधमाधमा पापमूर्ते ॥ आग लागो तुझ्या न्याय रितितें ॥ धृ० ॥ व्यर्थ छळणें मला हेतु होता जरी। अग्निजलविषतुला आधिं तनुतें ॥ देउनी वांचतां मग तरीं करवतीं। यास द्यावें असें इष्ट होतें ॥ १ ॥ सोडुनी मार्ग हा शत्रुवचनें कसा मारितोसी मला ब्राह्मणातें ॥ यांहि कृत्यें नृपा कुलासह नरकिं तूं पाडिसी खचितरे आपणातें ॥ २ ॥

चौथा अंक समाप्त.

अंक ५ वा.

प्रवेश १ ला.

(दोन चांडाळ चारुदत्तास घेऊन येतात.)

दोघे चांडाळ–(लोकांस) दूर व्हा, लोकहो दूर व्हा. या श्रेष्ठ चारुदत्ताच्या गळ्यांत कण्हेर पुष्पांच्या माळा घालून वधस्थानाकडे चालविलं आहें. तेल सरलेल्या दिव्याप्रमाणं आमच्या संगें हा प्रतिक्षणीं क्षीणायू होत आहे.

चारु०–(विषादानें)

पद–राग परज ताल त्रिवट.

लोचनांबुधारांनीं । गेली माझी तनु भिजुनी ।। धृ० ।।
स्मशानमाळा घातल्या गळां । लाल रंग या तनुस माखिला ।।
काक मानिती बलिसे मजला ।। याहि परी बघुनी ।। १ ।।

(आपल्याशीं) ' दैवी विचित्राः गति ' ह्मणतात तेंच खरं.

पद–राग भूप ताल दादरा.

रंगवुनी सर्व देह रक्तचंदनीं । मज पुरुषा पशु केलें असें सजवुनी ।। धृ० ।। मत्कुदशा ही बघून । दुःखाश्रू ढाळिति जन ।। मर्त्यत्वा धिक्कारुन । कष्टती मनीं ।। १ ।। रक्षा या अबल ह्मणुन । वदती मज प्रणति करुन । पाव सुखें स्वर्ग भुवन । निंद्यही जनी ।। २ ।।

१ चांडाळ–लोकहो दूर व्हा. इंद्रधनू आणि गोप्रसूती, नक्षत्रपात आणि सज्जनाचा प्राणनाश हीं पाहूं नयेत.

२ चांडाळ–अरे हा वध्य नेत असतां हे लोक पहा कसे रडताहेत.

चारु०–(त्यांच्याकडे पाहून दुःखानें)

पद्–राग तोडी ताल त्रिवट.

सौधावरि या बसुनी युवती । गवाक्षांतुनी मला पहाती ॥ धृ०
चारुदत्त हा ! मजला ह्मणतीं । जेवि अंतरीं लाह्या जळती ।१।

१ **चांडाळ**–चारुदत्ता ये इकडे, इथं उभा रहा. (सोबत्यास) हा चव्हाटा आहे. दवंडी पिटण्याचं हेंच ठिकाण. तूं मोठ्यानं अपराध बोल. मी दवंडी वाजवितों.

२ **चांडाळ**–(मोठ्यानें ओरडून) लोकहो ऐका. विनयदत्तशेटीचा नातू, आणि सागरदत्तशेटीचा पुत्र, हा चारुदत्त. यानं उज्जनी नगरांतील नामांकित गणिका वसंतसेना धनलोभास्तव पुष्पकरंडक जीर्णोद्यानांत नेऊन बलात्कारानं बाहुपाशांनीं जिवी मारली, त्याचा हा मुद्दा सांपडला असून हा स्वतां कबूलही झाला आहे. ह्मणून पालक राजानं याला मारण्याविषयीं आज्ञा केली आहे. जर दुसरा कोणी उभय लोकांविरुद्ध अकार्य करील तर त्यालाही पालकराजा हेंच शासन देईल हो.

चारु०–(खिन्न होऊन) हाय हाय ! काय दैव हें !

दिंडी.

यज्ञकर्मी विख्यात गोत्र माझें ।
असे विप्रांही योग्य वदाया जें ॥
मरण समयीं तें, नीच बोलताती ।
दुष्कृताचा संबंध लाविताती ॥ १ ॥

(वर पाहून कानांत बोटें घालून दुःखानें) हरहर ! मी असं करीन काय ?

पद्–राग ललत ताल त्रिवट.

बिंबाधरिगे शशिशुचिरदने । करीगामिनी सुहास्यवदने ॥ धृ० ॥ अधरसुधा तव पान करोनी । अयशोविष तें टाकिन पिउनी । कैसा सांगग वसंतसेने ॥ १ ॥

संकटकाळीं कुणी कुणाचा नव्हे हेंच खरं. हरहर !

पद-वर वर कां० या चालीवर.

दुरदुरुनी पाहुनि मातें । जाती माझे सकल मित्र हे झांकुनि वदनातें ॥ धृ० ॥ विभवकालिं बहु मित्रचि होती ॥ विषम दशेला जवळि न येती । त्यजिती सकल तयातें ॥ १ ॥

१ चांडाळ-लोकांची दाटी मोडली. मार्ग मोकळा झाला. चारुदत्ता पुढं चल लौकर.

चारु०-(दुःखानें) " मजवरि हें जें संकट आलें " इ०

अंजनीगीत.

" पडद्यांत- हा ! हा ! ताता कोठें जासी ।
तुजविण बालक हा परदेशी ।
इतुकी घाई कां तरि करिशी ।
कीं जड झालों मी ॥ १ ॥

हा प्रियवत्सा "

चारु०-(शब्द ऐकून करुणायुक्त होऊन) चांडाळहो ! तुम्हीं पालकराजासारखे अविचारी नव्हत. म्हणून प्रार्थना करितों कीं, मी परलोकीं जाण्यापूर्वी मला एकवेळ माझ्या पुत्राचं मुख पाहूं द्या. (पुन्हा शब्द होतो तो ऐकून) या दाटींतून मला जाववत नाहीं. तर कृपा करून एकवेळ त्याला पाहूं द्या.

चांडाळ-लोकहो, क्षणभर एकीकडे होऊन वाट सोडा. या चारुदत्ताला आपल्या पुत्राचं मुख पाहूं द्या. (पडद्याकडे पाहून) अरे आर्या इकडे ये. अरे मुला पुढं ये. आपल्या बापाला भेट दे.

(इतक्यांत विदूषक मुलास घेऊन येतो.)

विदू०-हे प्रिय वयस्या आतां मी तुला कुठं पाहूं ?

बालक-बाबा कुठं जाता हो ?

चारु०-(दोघांस पाहून) हा बाळा रोहसेना ! हा सख्या मैत्रेया, (दुःखानें)

पद–(स्वर्गी सर्वहि० या चालीवर)

माझी तृष्णा अक्षय शांत न होइल परलोकीं ॥
०आतां तेथें मिळेल स्वल्पचि तर्पण जल याकीं ॥ धृ०॥

मी या समयीं बाळाला काय देऊं. (आपल्याकडे पाहून) यज्ञोपवीत काढून) हां हेंच काय तें माझ्या सत्तेचं.

सुवर्ण मौक्तिक विरहित भूषण विप्रा या लोकीं ॥
देवां पितरां याच्यायोगें भाग मिळे नाकीं ॥ १ ॥

(यज्ञोपवीत देतो.)

बालक–चांडाळांनो माझ्या बाबाला कुणीकडे नेतां?

चारु०–बाळा मीच सांगतों.

पद–राग पिलू ताल दादरा.

कंठिं रक्त पुष्पहार अजि घालुनी ॥
तेवि स्कंधिं लोहशूल त्यांहिं ठेउनी ॥
वध्यस्थळिं नेति मला असें बांधुनी ॥
जेवि नेति बोकडासि याज्ञिं ओढुनी ॥ १ ॥

चांडाळ–बाळा आह्मीं चांडाळ नव्हे. आमची जात मात्र चांडाळांची. साधूंचा छळ करणारे ते खरे चांडाळ.

बालक–मग माझ्या बाबाला कां मारतां?

चांडाळ–बाळा, यास राजाज्ञा मारते. आह्मीं मारीत नाहीं.

बालक–तर मग दादांनो!

पद–राग भैरवी ताल दीपचंदी.

कर जोडुनि मी विनवि तुह्मांतें । मारुं नका हो
मत्तातातें ॥ धृ० ॥ सद्गुण मंडित धीर मनाचा ।
मान्य असे हा जगतीं साचा । घोरकृती ही करील
कैसा । याच्याठायीं मारा मातें ॥ १ ॥ ॥

चांडाळ–(गहिंवरून) बाळा कशीरे तुझ्या तोंडून हीं अक्षरं आ-लीं ? असं बोलणारा तूं चिरकाळ वांच्.

चारु०–(रोहसेनाच्या गळ्यास मिठी मारून.)

पद –(लावणीच्या चालीवर.)

स्नेहरसाचें आगर केवळ पुत्ररत्न भूवरी ॥ राजा
रंकासम तें तरी ॥ चंदनाहुनी शीत उटी तीं हृदया-
लागीं असे ॥ भाषणीं अमृत त्याच्या वसे ॥ चाल ॥
पुत्र पित्याची प्रतिमा ऐसें ग्राह्य वचन हें जना ॥
पावन करुनी उभयकुलांला दावि स्वर्गभूवना ॥
त्याच्या प्राप्तीस्तव जन करिती व्रत नवस साधना ॥
चाल ॥ कवण गृहस्था पुत्रविरह कीं सोसवेल तो
परी ॥ दैवहि तेंचि बळें मज करी ॥ १ ॥

विदू०–अरे दादानों, माझ्या या प्रियमित्रास सोडा आणि त्याच्याब-द्दल मला मारा.

चारु०–(दुःखानें) शिवशिव ! मित्रा असं बोलूं नको.

चांडाळ–लोक हो चला, व्हा एकीकडे. या साधु पुरुषाची जीवाशा दैवानंच नष्ट झाली आहे.

चारु०–(करुणा युक्त) " बिंबाधरिगे शशि " इ.

चांडाळ–अरे हें दवंडी पिटविण्याचं दुसरं ठिकाण, तर तूं मोठ्यानं ओरड आणि मी दवंडी वाजवितों. (तसें करतात)

चारु०–(दुःखानें) हरहर.

पद–राग सोहनी ताल त्रिवट.

विषमदशा ही कैसी आली । माझि जिवाशा नष्ट
जहाली ॥ धृ० ॥ मृत्यु येइल येउ सुखानें । म्यां
तिज वधिलें जन या दुषणें । विंधिति हृदया या
दुःखानें । सकल तनू ही पोळुनि गेली ॥ १ ॥

(इतक्यांत पायांत बिडी असलेला स्थावरक चेट येतो.)

स्थावरक–(दवंडी ऐकून दुःखानें) काय हें आश्चर्य ! अपराधाविण या बिचाऱ्या चारुदत्ताला मारतात ! मी बद्ध आहें म्हणून उपाय नाहीं. तथापि लोकांना ऐकूं जाईलसं ओरडून सांगावं. लोक हो, वसंतसेना वश्य होत नाहीं म्हणून राजश्यालकानं पुष्पकरंडक जीर्णोद्यानांत तिला बाहुपाश घालून मारलं. चारुदत्तानं मारलं नाहीं. लोकांना ऐकूं जात नाहीं. आतां कसं करावं ? (विचार करून) हां, या मोडक्या खिडकींतून उडी मारावी. मेलों तरी बेहत्तर; पण चारुदत्त वांचो. (तसें करतो) अरे मी मेलों नाहीं. पण पायांतली बिडी मात्र तुटली. आतां ते चांडाळ काय बोलतात तें ऐकूं. (जवळ जाऊन) लोक हो दूर व्हा. एकीकडे व्हा. मला जाऊं द्या.

चांडाळ–दूर व्हा, एकीकडे व्हा, असं हा कोण म्हणतो ?

स्थावर०–मी स्थावरक चेट आहें. माझं म्हणणं ऐका ? (लोक हो इ. पूर्वोक्त.)

चारु०–(पाहून व ऐकून) काय हो हें आश्चर्य !

अंजनीगीत.

कोण येइं हा या समयाला ॥
यमपाशचि मज असतां पडला ॥
अनावृष्टीनें सुकता आला ॥
द्रोण मेघसा सैंतीं ॥ १ ॥

अहो तुम्हीं सर्वांनीं ऐकलंना ?

चांडाळ–अरे स्थावरक, हें तूं खरं बोलतोस ?

स्थावर०–अगदीं शब्दशः खरं आहे. मी हें उघड करीन या भीतीनं त्यानं माझ्या पायांत बिडी घालून मजला तिमजल्यावर कोंडून ठेविलं होतं.

(इतक्यांत शकार येतो.)

शकार–(हर्षानें) वाहवा ! काय मौज !

श्लोक.

आम्ल तिक्त मृगमांश आयतें ।
शाक शूपशह मत्स्य रायतें ॥
भक्ष्य भोज्य नवपेय रक्षिलें ।
आपुल्या वरींच सर्व भक्षिलें ॥ १ ॥

(कानोसा घेऊन) हीं हीं त्या दरिद्री चारुदत्ताला वधस्थानाकडे नेत आहेत, त्याचा हा गलबला. चला तर आपण आपल्या वाड्याच्या तिसऱ्या मजल्यावर बसून मौज पाहूं. शत्रुविनाश पाहून मला मोठा आनंद होतो. व शत्रूला मारतांना जो पाहील त्याला नेत्ररोग मुळींच होत नाहींत, म्हणून ऐकिलं आहे. (तसें केलेंसें करून) या भिकारी चारुदत्ताला मारायाला नेत असतां इतके लोक जमले आहेत. मग आमच्या सारख्या श्रेष्ठ पुरुषाला नेतांना किती दाटी होईल! बरं पण इतक्यांत दवंडी बंद कां पडली? अरे खरंच इथं स्थावरक चेट ही दिसत नाहीं. रांडलेकानं पळून जाऊन मसलत तर फोडली नसेलना! चला त्याचा आपण शोध करावा. (त्यांच्या जवळ येऊन) अरे वाट सोडा. एकीकडे व्हा. (स्थावरकास पाहून) अरे पुत्रका स्थावरका चेटा, इथं कशालारे आलास? चल आपण जाऊं.

स्थावर०–अरे अनार्या, निर्दया, त्या वसंतसेनेचा प्राण घेऊनही तूं संतुष्ट न होतां सज्जन कल्पतरु चारुदत्त याला मारवितोस? तुला पुढचं भय नाहीं ना!

शकार–नाहीं नाहीं. मी रत्नकुंभासारखा श्रेष्ठ असून स्त्रीला कशा मारीन.? तुह्मीं याचं काय खरं मानितां? त्यानंच मारिली.

लोक–(पडद्यांतून) नाहीं नाहीं. चारुदत्तानं मारली नाहीं. तुह्मींच मारिली असं हा साधु पुरुष सांगतो.

शकार–(दचकून आपल्याशीं) हें असं कसं झालं? मी या चेटाला बळकट बांधून टाकलं नव्हतं काय? हा गुलाम माझ्या दुष्कर्माचा साक्षी आहे खरा! यानंच मसलत फोडली. असो. आतां दुसरी युक्ति काढावी. (विचार करून) लोक हो हा खोटं बोलतो.

याचं तुह्मीं काय खरं मानितां ? यानं माझ्या घरचं शोनं चोरलं ह्मणून याला बांधून घालून खूब मार दिला. त्या द्वेशामुळं हा अशं बोलतो. (एकीकडे वळून सोन्याचें कडें त्यास देऊन) अरे स्थावरका चेटा, तूं हें कायं करतोश ? हें कडं घे आणि गोष्ट फिरवून बोल.

स्थाव०–(कडें घेऊन) पहाहो सारेजण. सोन्याचा लोभ दाखवून खोटं बोलावयास सांगतो.

शकार–(त्याच्या हातांतील कडें हिसकावून घेऊन) अहो, यानं चोरलेलं हेंच तें शोनं. याशाठींच याला बांधून खूब मार दिला होता. हे तुह्मांला खरं वाटत नशेल तर याची पाठ पहा.

चांडाळ–(तसें करून) अहो खरंच. याचे पाठीवर माराचे वण आहेत. ह्मणून याचं बोलणं खरं नव्हे. राजशालक सांगतो हेंच खरं. चला.

स्थाव०–धिःकार असो या दास्यत्वाला ! त्याचं खरं भाषण ही खोटं ओं ! असो. दैवापुढं नाइलाज आहे. (गहिंवरून चारुदत्ताच्या पायावर डोकें ठेवून) आर्या चारुदत्ता, माझा प्रयत्न कायतो एवढाच.

चा०–(गहिंवरून)

भूपाळी.

उठीरे उठी साधूपाळा, दयाळा । झालासी तूं सहजचि बांधव मज धर्मशीला ॥ धृ० ॥ सोडाया मज यत्न बहुत तूं सखयारे केला । दैवा परि तो रुचला नाहीं निःष्फल सारा झालारे ॥ १ ॥

चांडा०–अरे, या स्थावरकाला मार देऊन हांकून द्या.

शकार–चल निघ लुच्चा. (त्याला ढकलून) अरे चांडाळांनो, आतां उशीर कां करिता ? याला मारा लवकर.

चांडा०–तुह्मांला घाई असेल तर तुह्मींच मारा.

शकार–अरे या पोराशुद्धां याला मारून टाका.

चा०–(त्याला मिठी मारून)

पद–राग कालंगडा ताल दादरा.

वदिल तोंचि सर्व खरें । कराया न मागें सरे ॥ धृ० ॥
ह्मणुनि जाइ त्वरित घरा । राहुं नको उभा जरा ॥
मूर्ख नीच अशा नरा ॥ कींव मुळीं न लेंकरा ॥
रोहसेन बाळारे । जननिकडे जाइ त्वरें ॥ १ ॥

मित्रा याला घेऊन जा बाबा.

बालक–

पद–राग कालंगडा ताल दीपचंदी.

काय जाउनी करुं मी सदनीं । या स्थितिमाजी तुह्मां त्यजुनी ॥ धृ० ॥ तुह्मांविणें मज काय जिणें हें । जननिस दावूं वदन कसें हें । बाहुं कुणाला ताता ह्मणुनी ॥ १ ॥

विदू०–मित्रा, तुझ्याशिवाय मी वांचेन असं तुला वाटतं का?

चा०–मित्रा, तुझं जीवित तुझ्या हातीं आहे. प्राणत्याग करणं योग्य नव्हे.

विदू०–(आपल्याशीं) हें खरं; तथापि हें माझ्या हातून कसं होणार? यासाठीं मुलाला त्याच्या आईच्या स्वाधीन करून आपण मित्राच्या भेटीस त्याच्या मागोमाग जावं. (उघड) याला घेऊन जातो बरं. (चारुदत्तास मिठी मारतो.)

शकार–अरे या पोराशुद्धां चारुदत्ताश मारा ह्मणून तुम्हांला शांगितलं ना? मग शुंभाशारखे उभेरे कां?

चां०–बाबारे तूं ह्मणतोस तशी आह्मांस राजाज्ञा नाहीं. तूं आपल्या वाटेनं जा कसा?

(मुलासह विदूषक जातो.)

शकार–(आपल्याशीं) अजून यांना खरं वाटत नाहीं. (चारुदत्तास) अरे भिकाऱ्या अजून लोकांश खरं वाटत नाहीं. यास्तव मी वशंतशेना मारली ह्मणून म्हण. (तो उगीच राहतो.) हा भिकारडा बोलत नाहीं याश मार देऊन बोलवा.

चां०-(चाबूक उगारून) बोलरे चारुदत्ता बोल. मी मारली असं ह्मण.

चा०—(गहिंवरून.)

दिंडी.

पावलों मी या दुःखसागरातें ॥
खेद त्याचा किमपिही नसे मातें ॥
दुःख मोठें हें मला वदूं कैसें ॥
मारिली म्यां प्रियसखी आज ऐसें ॥ १

अहो पौर जनहो, " परलोक भीति इ० "

शकार—मारली हेंचना? मारली.

चा०—बरं तसंच कां द्दाईना?

१ **चां०**—अरे आज तुझी पाळी.

२ **चां०**–नाहीं नाहीं. तुझीच.

१ **चां०**—बरं चिठ्या टाकूं. (तसें करतात.)

२ **चां०**—हें पहा तुझं नांव. तुझीच पाळी.

१ **चां०**–जर माझी पाळी आहे तर मला दोन घटका थांबलं पाहिजे. कारण मला बापानं मरते वेळीं असं सांगितलं आहे कीं, वध करण्याची तुझी पाळी आली तर तूं दोन घटका थांब. कारण कोणीं साधु पुरुष द्रव्य देऊन वध्याला सोडवितो. कदाचित् राजाला पुत्र लाभ झाला, तर त्या आनंदांत तो वध्याला सोडतो. कदाचित् मत्तहत्ती अनावर झाला तर त्या गडबडींत वध्य मुक्त होतो. किंवा एखादे वेळीं राज्याची उलटा पालट झाली तर सर्वच बंदिवान् मुक्त होतात. ह्मणून ह्मणतों.

शकार–काय ह्मणतोश, राज्याची उलटपालट?

१ **चांडा०**–हा उगीच तर्क आपला. असं कधीं कुठं झालं असेल.

शकार–अरे याला लवकर मारा. (चेटासह निघून जातो.)

चांडा०–आर्या तुला राजाज्ञा मारते. आह्मी मारीत नाहीं. आतां तुला कुणाचं स्मरण करावयाचं असेल तर कर.

चा०–या समयीं धर्मावांचून कुणाचं स्मरण करूं?

पद–राग बहार ताल त्रिवट.

धर्मसखा जरि लया न जावो । दुष्टासह मज
आतां पावो ॥ धृ० ॥ प्रियसखि येउनि भेटो
मजला । कलंक धुवुनी नेउं लयाला ॥ रक्षक
मज तो साचचि होवो ॥ १ ॥

चांडा०–आर्या हें पहा दक्षिण स्मशान, हें पाहून वध्य प्राण सोडतात. इथं लांडगे कोल्हे कशीं प्रेतं फाडतात पहा.

चा०–हाय हाय!

पद–राग मांड ताल धुमाळी.

मंदभाग्य मी ठरलों । विपन्नासही आलों ॥ धृ० ॥
सर्वांलागीं मुकलों । आतां खासाचि मेलों ॥ १ ॥

(खालीं बसतो.)

शकार–(पुन्हा प्रवेश करून) मी जाणार होतों पण नाहीं जात. या भिकारड्या चारुदत्ताला कशं मारतात तें पहातों. (पाहून) काय चारुदत्त खालीं बशला.

चांडा०–आर्या चारुदत्ता भ्यालास होय?

चा०–(झटकन उठून)

पद–राग कर्नाटकी ताल बिलंदी. आधीं सुरवर० या चा०

मूर्खा नच भी मी मृत्युला ॥ धृ० ॥ कीर्तिदूषित
दुःख होई । अंतरीं । बहुपरी । निरपराधि या
मला । मृत्यु तो ये जरी । नंदकारी सुतजन्मसा,
मानितों मी त्याजला ॥ १ ॥

चांडा०–आर्या चारुदत्ता, गगनांगणांत वास करणारे चंद्र सूर्यही विपत्ति पावतात. मग मनुष्याची ती कथा काय? याचा तूं मुळींच खेद करूं नको. धीर धर. अरे हें दंवडीचं दुसरं ठिकाण. बोल मोठ्यानं (तसें करितात.)

चा०–(आवेशयुक्त दुःखानें)

पद–सखी मंदनिका० या चालीवर.

कसी करिन मी ही करणी ॥ बिंबाधरिगे शशि-
शुचिरदने । सुहास्यवदने प्रियकरणी ॥ धृ० ॥
अधरसुधा तव पान करोनी । सांग कसा मग
चारुमुखी । अयशोविष तें । टाकिन पिउनी ॥ १ ॥

(इतक्यांत वसंतसेना व भिक्षु गडबडीनें येतात.)

भिक्षु—हे उपासिके, आतां तुला कुणीकडे नेऊं सांग.

वसंत०—आर्या मला सज्जन चारुदत्ताच्या घरीं ने.

ठुंबरी.

दर्शन होऊंदे ॥ तसें प्रियाचें ॥ धृ० ॥
चंद्रदर्शनें कमलिनी जसी । भरे प्रमोदें ॥ १ ॥

भिक्षु—या राजमार्गानं जावं हेंच बरं. उपासिके इकडून या राजमार्गानं समोरं चल. (पुढें पाहून) अरे शहराच्या मध्यभागीं ही इतकी गर्दी कशाची ?

वसंत०—आर्या भिक्षो, तें काय आहे याचा शोध करा पाहूं.

भिक्षु—बरं.

चां०—हें दवंडीचं शेवटचं ठिकाण. तर पुनरावृत्ति होऊंदे. (पहिल्या प्रमाणें करतात) चारुदत्ता आतां तुझं मरण जवळ आलं.

चा०—देवतांची इच्छा. हे देवी भगवती !

भिक्षु—(घाबरून) चल उपासिके चल लौकर तुला चारुदत्तानं मारलं म्हणून त्यास मारावयास नेत आहेत, चल.

वसंत०—(घाबरून) हाय हाय ! काय दुर्दैवी मी! आर्या मजसाटीं चारुदत्ताला मारतात काय ? चला चला.

भिक्षु–(गडबडीनें) उपासिके, चारुदत्त जीवंत आहे तों पर्यंत त्याला भेटून आश्वासन दे. चल. लोक हो दूर व्हा. वाट सोडा

चां०–(तरवार उपसून) आर्या ताठ उभा रहा. एका घावानं तुझा शिरच्छेद करितों. पण तत्पूर्वी तुला कुणाचं स्मरण करावयाचं असेल तर कर.

चारु०–(ताट उभा राहून) धर्मावांचून दुसरं कोणाचं स्मरण करायचं?

पद–पांडु नृपति० या चालीवर.

धर्म सखा असे जरी । पावो सरिपु मला तरी ।
येउनियां प्रिय सुंदरि । धुवो डाग हा ॥ १ ॥

चां०–(तरवार उपसतो व ती खालीं पडते.) अरेरे! हें काय झालं! धिःकार असो आमच्या कसबाला! या वरून मला वाटतं कीं, चारुदत्त मरत नाहीं. हे भगवती, सह्याचलवासिनी देवी रेणुके कृपा करून या चारुदत्ताची सुटका करशील तर आमच्या चांडाळ कुलावर अनुग्रहच केला असं होईल.

२ चां०—राजाज्ञेप्रमाणं आपणास केलंच पाहिजे.

१ चां०—हो तर आतां याला शूलारोपण करूं. (तसें करूं पहातात.)

चा०— साकी.

असेल माझा धर्म सखा जरी, दुष्टासह मज पावो ।
प्रिय सखि येउनि तारो मजला कलंक विलया नेवो ॥ १ ॥

वसंत०—(पुढें पाहून भिक्षूसह पुढें येऊन) अहो थांबा हो थांबा, जिच्या करितां तुम्ही या साधु पुरुषाला मारतां ती मंदभाग्या वसंतसेना जिवंत आहे. हा आर्या चारुदत्ता! (चारुदताचाच्या आंगावर पडते, तो तीस धरितो.)

चां०—(आश्चर्यानें) काय ही वसंतसेना? बरं झालं कीं, हा साधु आम्हीं मारला नाहीं. वसंतसेने तूं जिवंत आहेस!

भिक्षु०—चारुदत्त वांचत आहे ना?

चां०—आतां शंभर वर्षं वांचत आहे.

वसंत–आतां जिवांत जीव आला बाई.

चां०–राजा यज्ञमंटपांत आहे, त्यास हें वर्तमान कळवूं या चला. (जाऊं लागतात.)

शकार—(वसंतसेनेस पाहून दुःखानें) अरे ही गर्भदाशी जिवंत कशी झाली? आतां माझे पंचप्राण जाऊं पाहतात. अशो, आपण पळावं हेच बरं (तसें करतो.)

चां०—(मागें परतून) अरे आम्हांला राजाज्ञा अशी आहे कीं, वसंतसेनेला ज्यानें त्रास दिला, त्याला मारावें. चला तर त्याला हुडकूं. (जातात.)

चा०—(विस्मयानें.)

पद–राग सिंधभैरवी ताल त्रिवट. संमपूर्ण जाहल्या बारा० या चा०

ही कोण आली या वेळे । ओढुनि मजला कादा-
यास्तव, गिळिलें असतां काळें ॥ धृ० ॥ अनावृ-
ष्टिनें सुकल्या सेतीं ॥ सुवृष्टि जशि ती व्हावी ।
तशी सुंदरी कवण असे ही, भ्रांत चित्त मम झालें ॥१॥

(तिला पाहून)

पद–राग हिंडोल ताल दादरा.

काय दुजी आली ही प्राणमोहिनी ॥
वांचविण्या मजलागिं स्वर्गभूहुनी ॥ धृ० ॥
कीं जिवंत पाहि तीच भ्रांति ही मनीं ॥
कीं आली रूप धरुनि देवभामिनी ॥ १ ॥

वसंत०—(साश्रु)

पद–हजारा मारा कानका मोती० या चालीवर.

आर्या तीच असे ही दासी हो ॥ धृ० ॥ कुदशा येण्या ऐशा परिची । झाली कारण पापिणि साची ॥ क्षमा करावी अपराधाची । विनती या चरणासी ॥ १ ॥

(पडद्यांत " आश्चर्य ! आश्चर्य ! ! वसंतसेना जीवंत आहे ! वसंतसेना जिवंत आहे ! !)

चा०—(सद्गदित होऊन) प्रिये वसंतसेने तीच का तूं ?

वसंत०—आर्या तीच ही मंदभाग्या.

चा०—(निरखून पाहून हर्षानें) हो खरंच.

पद–तों तननन वाजवि वेणु. या चा०

ही नयनसलिलधारांनीं । भिजवीत कुचा लागोनी ॥ मी असतां मृत्यु वदनीं । केवल संजिवनी । होउनि मजला रक्षायातें । जणुं आलीसे झटधांवोनी ॥ रमणी ॥ १ ॥

आणखीं हें पहा

पद—राग कालंगडा ताल दादरा.

तुजसाठिं सखे देहचि हा बंध पावला ॥
आगमनें केलें तूं मुक्त त्याजला ॥ धृ० ॥
अनुभव प्रिय संगतिचा मिळाला मला ॥
गेलेला प्राण पुन्हा प्राप्त जाहला ॥ १ ॥

प्रिये आणखीं आजची शोभा पहा.

पद—राग बिभास ताल दादरा.

ममदैवानें चित्रखेळ करोनि दाविला ॥
वाटे मज आज खचित सुदिन उगवला ॥ धृ० ॥
लाल वसन लाल हार अंगिं घातले ॥
लग्नाचा नवरदेव असें सजविलें ॥
वध्यपटहनाद जे कि होउं लागले ॥
लग्न वाद्य गजर जणूं वाटती मला ॥ १ ॥

वसंत०—आर्या, आपण अतिदक्ष अतिचतुर असतांही गोष्ट कशी झाली ?

चा०—प्रिये,

साकी.

जन्मांतरिचा बलिष्ठ वैरी दुर्दैवें उद्भवला ॥
आपण पडतां नरकीं त्यानें होउनि स्पर्शचि केला ॥
तुजला मी वधिलें ॥ ह्मणुनी ऐसें हें झालें ॥ १ ॥

वसंत०—(कानांवर हात ठेवून) शिव शिव ! असं कसं होईल ? त्या मेल्या राजशालकानं मला मारलं; पण या सत्पुषाच्या साह्यानं व आपल्या पुण्याईनं वाचलें.

चा०—(भिक्षूस) कारणावांचून बंधुत्व करणारा असा धर्मात्मा तू कोण ?

भिक्षु—आपण मला ओळखलं नाहीं काय ? ज्याणं आपलं चरण संवाहन केलं, ज्याला द्यूतकारानीं धरलं असतां आपला आत्मीय समजून ज्या उपासिकेनं अलंकार देऊन सोडविलं—छे छे, विकत घेतलं, तोच मी. तेव्हांपासून द्यूतकर्माचा तिरस्कार करून शाक्य श्रमणक आश्रम घेऊन भिक्षु झालों आहें. गाडीची आदलाबदल झाल्यामुळ आर्या वसंतसेना नकळत चुकून भलत्याच गाडींतून पुष्पकरंडक जीर्णोद्यानांत गेली. तिथं राजशालक होता त्यानं त्याला ही वश झाली नाहीं ह्मणून बलात्कारानं बाहुपाशानं मारली होती. ती मी स्वतः डोळ्यांनीं पाहिली. मग हिला मजकडून होण्याजोगं साहाय्य दिलं आहें.

चा०—दुर्जनाचे ठिकाणीं सर्व संभवतं. आपलं दुष्कर्म मजवर घालून मला प्राणसंकटांत पाडलं होतं; पण समयास तुह्मां उभयतांच्या आगमनानं निवारण झालं.

“ **पडद्यांत**—आर्यक राजाचा जयजयकार असो.

श्लोक.

दक्षाध्वरा मथुनियां जय शंकराचा ।
कीं क्रौंच दानव विदारुनि षण्मुखाचा ॥
जंभास मारुनि जसा जय वासवाचा ।
झाला तसाच अरि मर्दुनि आर्यकाचा ॥ १ ॥ ”

(इतक्यांत शर्विलक येतो.)

दिंडी.

मारुनी त्या दुर्नृपा पालकातें ।
बैसवूनी तत्पदीं आर्यकातें ॥
आतां त्याची स्थापिली सर्व सत्ता ।
सोडवीतों मी पहा चारुदत्ता ॥ १ ॥

शर्वि०—होणारं कधीं चुकत नाहीं. हा जनसमूह इथं जमला आहे, यावरून चारुदत्त जिवंत आहे कीं नाहीं नकळे. चारुदत्ताच्या जीवित रक्षणानं आमच्या आर्यक राजाचे हेतु सफल होतील काय? (पाहून) आहाहा! चारुदत्त जिवंत आहे. वसंतसेनाही जिवत आहे. मग आमच्या स्वामीचें मनोरथ सत्वर पूर्ण झाले. वाहवा!

पद—रामकली ताल त्रिवट.

व्यसनाब्धींतुनि हा दैवानें । काढिला करें या गुण-
वर्तिनें ॥ धृ० ॥ तिजसहवासें बघतों याला । राहू
मुक्ता रजनीपतिला ॥ कवटाकुनि जैं धरी चांदणें ॥ १ ॥

मी तर याचा अपराधी आहें, तेव्हां जवळ कसं जावं? अथवा अर्जवानं सर्व वश होतं. आणि त्यांत हा साधुपुरुष, तेव्हां कसची भीति. (जवळ जाऊन) आर्या चारुदत्ता,

साकी.

त्वद्गृह फाडुनि ज्यानें केलें न्यासवस्तुचें हरण ॥
महापराधी मी तो आलों तुजला विनयें शरण ॥
अभय असो यातें ॥ विनती ही या चरणातें ॥ १ ॥

चारु०—मित्रा असं म्हणूं नको. तूंच हा लाभ जोडून दिलास. (दोघे भेटतात.)

शर्वि०—आर्या, आणखीं आनंदाचं वर्तमान सांगावयाचं आहे. तें हें

कीं, आर्यवृत्त आर्यकनामा गोपाळदारक जो बुध्या गाडींत बसून तुम्हाला शरण आला, त्यानं दुष्ट पालक राजाचा वध केला आणि–

चारु०–शर्विलका मागं पालकराजानं गवळवाड्यांतून धरून आणून बेडी घालून बंदींत ठेविला होता आणि ज्याला तूं सोडविलंस तोच आर्यक ना?

शर्वि०–होय, तोच आर्यक. त्यानं राज्यपदावर बसतांच आपले उपकार फेडण्या करितां उज्जनी प्रांतांत वेणानदीचे कांठीं कुशवती नगरीचं स्वामित्व आपल्याला दिलं आहे. ही सुहृद्भावाची प्रथम देणगी होय. इचा आपण स्वीकार करावा, अशी त्याची इच्छा आहे. (इकडे तिकडे पाहून) कोण आहे रे तिकडे? त्या दुष्ट राज्यशालकाला धरून आणा. (पडद्यांत–'आज्ञामहाराज') आर्या आणखी त्याची अशी विज्ञापना आहे कीं, हें आपल्या गुणांनीं संपादिलं आहे. तर त्याचा उपयोग आपण पाहिजे तसा करावा.

(इतक्यांत राजसेवक शकाराच्या मुसक्या बांधून आणितात.)

शकार–(दुःखानें) काय करावं, मला चोहींकडून राजकीय प्रतिबंध उपस्थित झाला! आतां मी निराधार कुणाला शरण जाऊं. (विचार करून) असो. शरणागत प्रतिपालनाविषयीं प्रख्यात पुरुष इथंच आहे! त्याशच शरण जावं. (चारुदत्ता जवळ जाऊन) आर्या चारुदत्ता मी शरण आहें. माझं रक्षण कर. (म्हणून त्याच्या पायांवर डोकें ठेवतो.)

चारु०–(दयेनें) शरणागतास अभय असो. स्वस्थ हो. भिऊं नको.

शर्वि०–(आवेशानें) हां, याला एकीकडे ओढून न्या. आर्या याला सोडावयाचं नाहीं:—

प्रबंध.

अतां या करूं कोणत्या शासनातें । सांग झडकरि तरी हेंच मातें ॥ धृ० ॥ करीपदा बांधुनी ओढवूं यास कीं ॥ श्वानिं फाडोनियां काय खावें ॥ घालुं शूलावरी कर वतीं वा तरी । काय कापूं बळें या खलातें ॥ १ ॥

चारु०–मी सांगेन तसं करशील ना ?

शर्वि०–हो हो यांत काय संशय. सांग सांग लौकर.

शकार–हे पुण्य पुरुषा मी शरण आहें. माझं रक्षण कर. तुझ्या थोरपणाला शाजेलशं कर. मी पुन्हां अशं कर्म करणार नाहीं.

वसंत०–(रागानें) मेल्या तुझा सत्यनाश होवो. (चारुदत्ताच्या गळ्यांतील माला काढून त्याला मारते.)

शकार–अगे गर्भदाशी, मजवर प्रशन्न हो. मी तुला पुन्हा मारणार नाहीं. माझं रक्षण कर.

शर्वि०–आर्या, सांग सांग लौकर याला कोणतं शासन करूं तें ?

चारु०–असं कर तर याला लौकर–

शर्वि०–काय ठार मारूं ?

चारु०–छे छे. सोडून दे.

शर्वि०–कशासाठीं ?

चारु०–असं आहे.

साकी.

मंतु करोनी चरण धरोनी, अरि ह्मणेल तारावें ॥
शस्त्रानें नच तया वधावें–

शर्वि–शस्त्रानं वधूं नये तर कोल्ह्या कुत्र्याकडून खाववावं ?

चारु०– उपकारें मारावें ॥
मान्याचि हें जगतीं ॥ याहुनि नच कथणें जास्ती ॥

शर्वि०–हें मोठंच आश्चर्य ! आर्या चारुदत्ता खरंच सांग काय करूं तें ?

चारु०–खरंच याला सोडून द्या.

शर्वि०–तू ह्मणतोस तर हा सोडला पहा.

शकार–(आनंदानें) वाहवा ! काय मौज झाली. मी मेलेला पुन्हां जीवंत झालों. (राजसेवकांसह निघून जातो.)

" **पडद्यांत**–अहो ही चारुदत्ताची धर्मपत्नि, आर्या धूता, पायावर लोळण घेणारा आणि पदर धरून ओढणारा असा रोहसेन यास ए-

कीकडे लोटून सर्व लोक तिचं निवारण करीत असतांही अग्निप्रवेश करीत आहे."

चारु०–(ऐकून) प्रिये,

पद–राग पिलु ताल गज्जल.

हाय हाय काय असें करिशि तूं तरी ॥ कांत तुझा मी जिवंत असुनि सुंदरी ॥ धृ० ॥ कीर्ति तुझी जाय स्वर्गी ह्मणुनि मागुनी ॥ जाशि काय एकटीच इथें टाकुनी ॥ नको नको सोडुं मला प्राण मोहिनी ॥ पतीविणें सौख्य नसे सतिस अंबरीं ॥ १ ॥

(मूर्च्छित होतो)

वसंत०–आर्या, सावध व्हा. सावध व्हा. असं कां घाबरावं? तिथं जाऊन त्या बाईस वांचवा लौकर. नाहींतर अधीरपणानं भलतंच एखादं होईल.

चा०–(सावध होऊन) हाय हाय! प्रिये तूं कुठं आहेस? माझ्यापाशीं एकदां तरी बोल कीं ग!

सर्व–आर्या चला. आम्हीं दाखवितों. (नंतर धूताबाई अग्निप्रवेश करीत आहे, तिचा पदर रोहसेन ओढीत आहे. आणि जवळ मदनिका व विदूषक आहेत. असा प्रवेश होतो.)

धूता–(साश्रु)

पद.

ओढुं नको रे [illegible] बाळा । चल जाऊं दे उशीर झाला ॥ धृ० ॥ प्राणपतीची अशिवा वार्ता । ऐकुनि झालें दुःखाचि चित्ता ॥ राहववेना मुळीं जिवाला ॥ १ ॥

(पदर ओढून घेऊन अग्नीपुढें पहते.)

बाळ– अंजनीगीत.

हाय हाय गे प्रियकर जननी ।
जाशी कोठें मज सोडोनी ॥

वांचिन कैसा तुजवांचोनी ।
रक्षी कोण तरी ॥ १ ॥

(रडत जाऊन पुन्हा पदर धरतो.)

धूता-(साश्रू मुलास कवटाळून) रदनिके आतां तूं या बाळाला संभाळ. येतें बरं. (इतक्यांत चारुदत्त वगैरे येतात.)

मद०-(दुःखानें) मी बाळाला संभाळूं आणि आपण जातां काय? नाहीं नाहीं मी ही आपल्या मागून येणार.

धूता-आर्या मैत्रेया तूं तरी बाळाला संभाळ.

विदू०-(आवेशानें) स्वेटसिद्धीस जो कोणी प्रवृत्त होतो, त्यानं ब्राह्मण पुढं करावा असं आहे, तेव्हां मीच तुमचा पुढारी होतों.

धूता-काय? दोघांनींही याचा संभाळ करणं नाकारलं काय? असो. (मुलाचा मुका घेऊन.)

पद-भूपाळीच्या चालीवर

रक्ष रक्ष आपणा ॥ बाळा ॥ धृ० ॥ सोपान
पंक्ति तूं बा असशी । निजस्वर्गारोहणा ॥ १ ॥
ह्मणुनी राहुनि पावन करिरे । ऐकें मद्भाषणा ॥ २ ॥

(उसासा टाकून) आतां तुझा पिता तुला कोठून संभाळणार?

चारु०-(सरसावून) हा मी आहें मीच आपल्या बाळाचं रक्षण करीन. (मुलाला उचलून कडेवर घेतो.)

धूता-काय आश्चर्य हें! प्राणनाथाच्या शब्दासारखे शब्द ऐकूं आले (निरखून पाहून हर्षानें.)

पद-सुविहित जाहलें या चा०

अद्भुत वर्तलें । काय असें हें सुदैवें अहा मत्प्रिय
केलें ॥ धृ० ॥ जागृत आहें कीं स्वप्नीं मी कांत
पाहतें उघडुनि डोळे ॥ १ ॥

बालक–आई तूं दैवाची–मला बाबा संभाळतील. बाबा तूं आलास, आतां बग आईला नको जाऊं देऊं.

चारु०– .

पद–(पूर्वी सखिच्या० या चा०)

कांते करिसी निष्ठुरता कां नसतां नष्टचि पति हा झाला ॥
गेली कोठें सदयहृदयता साहस कां हें करिसि जिवाला ।धृ०।
अस्ताचलि तो दिनपति अजुनी आक्रमुनी नभ नसतां गेला ॥
कैसी झांकी कमलिनी तरी सांग सखेगे निज नयनाला ।१।

विदू०–(आनंदानें) काय आश्चर्य हें! याच डोळ्यांनीं मी आपला प्रियमित्र पुन्हां पहातों आँ! हा त्या पतिव्रतेचाच प्रभाव होय! मित्रा तुझा जयजयकार असो. (ते दोघे भेटतात)

धूता–हें माठं दैवच कीं माझी भगिनी खुशाल आहे. (दोघी भेटतात.)

शर्वि०—तुमच्या सुहृद्वर्यासह तुम्हांला क्षेम कुशल पाहून आनंद होतो

चा०–(आनंदानें) सर्व आनंद तर झाला आहे आतां आपळा प्रियमित्र आर्यक यास भेटावयास जाऊं चला.

(इतक्यांत आर्यक प्रवेश करितो.)

आर्यक–(आपल्याशीं) अरे शार्वलक गेला तो तिकडेसच. चारुदत्ताचं कांहींच वर्तमान समजलं नाहीं. त्याचे जिवास घातपात तर झाला नसेलना? त्याला पहाण्यासाठीं माझं मन फार उत्सुक झालं आहे. चला तर वधस्थानाकडे जाऊं. (थोडा चालून व पुढें पाहून) अरे ही गर्दी कशाची! हां तो पहा चारुदत्त शर्विलक वगैरे मंडळीसह इकडेसच येत आहे. ठीक झालं. (जवळ जाऊन) मित्रा क्षेम आहेना? (असें म्हणून त्यास भेटतो.)

चा०–(आलिंगून) सर्व क्षेम आहे. मित्रास राज्यपदारूढ पाहून फार आनंद वाटतो. आतां माझे सर्व हेतु पूर्ण झाले.

शर्वि०–पण ह्या भिक्षूचे काय करावयाचं हें सांगितलं नाहीं.

चा०–हे भिक्षो, तुला काय प्रिय आहे.

भिक्षु–हें सर्व जग अनित्य क्षणभंगूर आहे असं पाहून मला दुप्पट वैराग्य

प्राप्त झालं आहे, तर ह्याच आश्रमांत सत्कालक्षेप करावा हेंच मला प्रिय आहे.

चा०—सख्या, शार्विलका, ह्या भिक्षूचा वैराग्याविषयीं दृढनिश्चय दिसतो. यासारखा महंत दुसरा कोणी नाहीं. यासाठीं पृथ्वीवर जितके भिक्षूचे मठ आहेत, तितक्यांचा अधिपति यास करावं असं मला वाटतं. तसंच तो स्थावरक चेट दास्यत्वापासून मुक्त करावा. व ते चांडाल सर्व चांडालांचे नायक असोत. चंदनक हा सर्व राष्ट्राच्या पालनाचा अधिकारी असो. आणि आमचा आदिमित्र जो राजशालक संस्थानक तो पहिलं जें काम नगररक्षणाचं करीत होता, [illegible] करो.

आर्यक—तूं म्हणतोस त्याप्रमाणंच सर्व असो. आणखी मी तुझं काय प्रिय करावं तें सांग?

चा०—याहून आणखीं काय प्रिय राहिलं आहे?

पद—राग जोगी ताल दादरा.

कीर्ति शुद्धि होय शरण शत्रु मुक्त केला ॥ प्राण मित्र आर्यक मम भूपपदा आला ॥ धृ० ॥ पुनरपि ही प्राणप्रिया प्राप्त जाहली ॥ प्रियकर ही मैत्रि तसी तुझी लाभली ॥ याहुनिया अधिक काय मागुं तरी तूला ॥ १ ॥

तथापि

पद—राग भैरवी ताल दादरा.

धेनु दुग्ध विपुल धान्य तृणहि धान्य देवो ॥ सौख्य कारि वायु सुटुनि कालिं वृष्टि होवो ॥ धृ० ॥ धर्मनिष्ट शूर भूप रिपु खला वधोनी ॥ भूमिमाय रक्षुं देत अहर्निशी जपोनी ॥ रत असोत जन स्वधर्मि नयपथा धरोनी ॥ विद्या श्री एकिं वसो दुरित लया जावो ॥१॥

पांचवा अंक समाप्त.

ईश स्तवन.

व्यांडच्या चालीवर

काहिर्स साग साग० या प्रमाणें

ब्रह्मानंदा शंभो पशुपति । त्वद्भजनीं राहो अनुरत मति ।
गौरीप्राणा भवहरणा स्मरहर कलिमददमना वीरा ॥ धृ० ॥
सद्गुरुनाथा धीमंता सुरनुत भगवंता ।
अंधकहंता वेदांता अंत न अनुपम आकारा ॥
तापा हरुनि त्रितापा करि अनुकंपा अघभय संहारा ॥
ईशा जननजरा नाशा, कामादि षडरि विध्वंसा ॥
आद्या मुनिजनवंद्या, श्रुतिशिरवेद्या स्थितिलय आधारा ।२
अर्पी कविता कुसुमांजलि ही नत दत्तात्रय सुमनें रुचुं तुज
अभयद सुवरद मदहर पदरजिं सततचि दे थारा ॥ ३ ॥

संमाप्त.

